**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 179/2007.**

श्री शरदकुमार हनुमानप्रसाद तिवारी,
जवाहर कॉलनी गुंजखेडा, पो. पुलगाव
ता. देवळी जि. वर्धा 442302 ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.)
जिल्हा परिषद वर्धा

2) जन माहिती अधिकारी तथा
कक्ष अधिकारी (ग्रा.पं.)
जिल्हा परिषद वर्धा ..... **उत्तरवादी**

<u>वि वे च न</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक 16/6/2006 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दिनांक 20/12/2005 रोजी माहिती मिळण्यासाठी अर्ज केलेला होता. सदरच्या अर्जाचे संदर्भामध्ये माहिती अधिकारी ग्रामपंचायत विभाग जिल्हा परिषद वर्धा यांनी क्र./जिपव/ग्रापं/स्था–8/वशि–2906/2005 दि. 31/1205 चे पत्र दिनांक 6/1/2006 रोजी पाठवलेल्याप्रमाणे अकृषक खाली प्लॉटवर ग्राम

पंचायतला वेगळा जमीन कर आकारण्याचा अधिकार आहे किंवा नाही त्याबाबत शासन निर्णयाची प्रमाणित प्रत मिळणेबाबत. यावर आपण मागवलेल्या प्रमाणे शासन निर्णयाची झेराक्स प्रत आपणास देण्यात येईल त्या अगोदर आपण नियमाप्रमाणे रु. 10/– फक्त सामान्य प्रशासन विभागामध्ये रोखपाल यांचेकडे जमा करुन पावती घ्यावी त्यानंतर आपणास आपण मागणी केल्याप्रमाणे शासन निर्णयाची झेरॉक्स प्रत देण्यात येईल याची नोंद घ्यावी असे कळविले होते. त्यानंतर अपीलकर्ता यांनी रु. 10 चा भरणा न करता 13 फेब्रुवारी 2006 रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. सदर प्रथम अपीलाच्या संदर्भात दि. 27/2/2006 रोजी सुनावणीकरीता बोलावण्यात आले होते. परंतु अपीलकर्ता हे सुनावणीस हजर न राहिल्यामुळे दि. 13/3/2006 रोजी क्र./जिपव/ग्रापं/ वशि/ 87/2006 दि. 13/3/2006 प्रमाणे अपीलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) जिल्हा परिषद वर्धा यांनी अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती अधिकारी यांनी संबंधित माहितीच्या झेरॉक्स प्रतींचा खर्च भरुन माहिती घेवून जाण्यासंबंधाने दि.6/1/2006 रोजी पत्रान्वये कळविले होते परंतु आजपर्यंत ते कार्यालयात उपस्थित झाले नाही व माहितीही प्राप्त करुन घेतली नाही व त्यामुळे पुन्हा झेरॉक्सचा खर्च भरुन माहिती घेवून जाण्याबाबत कळविण्यात येवून देखील अद्याप रक्कम न भरल्याने माहिती पुरवण्यात आलेली नाही यात माहिती अधिकारी यांचेकडून कोणताही विलंब झालेला नाही त्यामुळे अपीलकर्त्याचे अपील याद्वारे खारीज करण्यात येत आहे श्री शरदकुमार हनुमानप्रसाद तिवारी रा. जवाहर कॉलनी, गुंजखेडा यांनी विहित रक्कम चलानद्वारे 0070–इतर प्रशासनिक सेवा, 60 इतर सेवा, 800, इतर जमा रकमा, (18) माहितीचा अधिकार अध्यादेश 2002 (0070–016–1) या लेखाशिर्षात जमा केल्यावर माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती पुरवावी असे कळविले होते. त्यानंतरसुध्दा अपीलकर्ता यांनी रु.10/– भरले नाहीत व माहिती घेवून गेले नाहीत मात्र सदरचे द्वितीय अपील दाखल केले आहे.

3. अपीलकर्ता यांनी माहितीच्या करीता रु. 10/— चा खर्च कां भरला नाही हे विचारले असता त्यांनी दि. 31.12.2005 (6/1/2006) चे पत्र त्यांना (मिळाले नाही) दि. 3.3.2006 रोजी मिळाले व म्हणून त्यांनी प्रथम अपील सादर केले. प्रथम अपीलातसुध्दा सुनावणीचे पत्र त्यांना मिळाले नाही व म्हणून ते सुनावणीस हजर राहु शकले नाही मात्र प्रथम अपीलीय अधिकारी यांचे दिनांक 13/3/2006 चा निर्णय त्यांना दि. 14/3/2006 रोजी मिळाला हे त्यांनी मान्य केले आहे परंतु एकतर्फी निर्णय आहे म्हणून त्यांनी 10 रु. भरुन माहिती न घेता द्वितीय अपील केले आहे. वास्तविक अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही कोणत्याही प्रकारची वादग्रस्त नसल्यामुळे व त्यांनी स्वतः रजिस्टर पोष्टाने माहिती घेईन असे माहितीच्या अर्जात लिहुन दिलेले असल्यामुळे व त्यांना जर दि. 31/12/2006 चे पत्र मिळाले नाही, 27/2/2006 च्या सुनावणीचे पत्र दि. 3.3.2006 ला मिळाले तरीसुध्दा दि. 14/3/2006 रोजी प्रथम अपीलाचा निर्णय मिळाल्याच्या नंतरसुध्दा रु. 10/— भरुन त्यांना माहिती घेता आली असती यावरुन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्याचे टाळाटाळ केलेले आहे किंवा नाकारलेले आहे किंवा विलंब केलेला आहे असे म्हणता येत नाही. अपीलकर्ता यास दिलेले उत्तर हे विहित मुदतीत दिलेले आहे तसेच प्रथम अपीलाचा निर्णयसुध्दा अपीलकर्ता यांना मिळालेला आहे व त्यानंतरही त्यांनी 10 रु. भरुन माहिती घेतली नाही त्यामुळे त्यांना माहिती मिळणेस विलंब झालेला आहे असे म्हणता येत नाही. जोपर्यंत माहिती मिळणेसाठीचा खर्च अर्जदार भरत नाही तोपर्यंत माहिती पुरवण्याचे माहिती अधिका—यावर बंधनकारक नाही. अपीलकर्ता यांस अजूनही माहिती हवी असल्यास त्यांनी 10 रु. भरुन माहिती अधिकारी यांचेकडून माहिती उपलब्ध करुन घेणे हे संयुक्तीक होईल म्हणून त्यांना रजिस्टर पोष्टाने घ्यावयाची असल्यास त्यांनी रजिस्टर पोष्टाचा खर्च भरावा लागेल, प्रत्यक्ष घ्यावयाची असल्यास माहिती अधिकारी यांचेकडून 10 रु. भरुन घेता येईल. त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## <u>नि र्ण य</u>

1) अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहितीच्या बद्यल रु. 10/- खर्च भरुन कळविलेले असल्यामुळे व प्रथम अपीलातसुध्दा तसेच कळविलेले असल्यामुळे व त्यानंतरसुध्दा त्यांनी रु. 10/- खर्च भरलेला नसल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.
2) तरीसुध्दा अपीलकर्ता यांना माहिती हवी असल्यास त्यांनी रु. 10/- माहितीचा खर्च व रजिस्टर पोष्टाने हवी असल्यास रजिस्टर पोष्टाचा खर्च हा माहिती अधिका-याकडे भरल्यास माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती पुरवावी.
3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 2/7/2007

(विलास पाटील)

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 180/2007.**

श्री प्रकाश मंगल कांबळे
द्वारा श्री मोहन विश्वनाथ शेवळे, विक्रमशिला नगर,
बुध्दविहाराच्या मागे, श्री हजारे यांच्या घराजवळ,
ता. जि. वर्धा ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपसंचालक,
सामाजिक वनिकरण विभाग, वर्धा

2) जन माहिती अधिकारी तथा
सहा. संचालक,
सामाजिक वनिकरण विभाग, वर्धा ..... **उत्तरवादी**

**वि वे च न**

अपीलकर्ता यांनी दिनांक 29/7/2006 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दिनांक 8/5/2006 रोजी माहिती मिळण्यासाठी अर्ज केलेला होता. सदरच्या अजाच्या संदर्भामध्ये दि. 20/5/2006 रोजी पत्र क्र. 206 व पत्र क्र. 207 प्रमाणे माहिती दिली होती. अशाप्रमाणे अपीलकर्ता यांनी एकुण 7 अर्ज केलेले

आहेत. दि. 30/5/2006 रोजी प्राप्त झालेल्या अर्जावर तारीख नाही परंतु पत्र क्र. 6 प्रमाणे दि. 8/6/2006 रोजी माहिती दिलेली आहे. दि. 12/6/2006 च्या पत्रास पत्र क्र. 8 दि. 21/6/2006 रोजी माहिती दिलेली आहे. दि. 23/6/2006 च्या प्रत्राप्रमाणे पत्र क्र. 16 दि. 10/7/2006 रोजी माहिती दिलेली आहे. दि. 14/7/2006 पत्र क्र. 18 प्रमाणे दि. 2/8/2006 रोजी माहिती दिलेली आहे, दि. 19/7/2006 च्या पत्राप्रमाणे पत्र क्र. 19 दि. 7/8/2006 व पत्र क्र. 20 दि. 16/8/2006 प्रमाणे माहिती दिलेली आहे. सदरच्या मिळालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे दि. 14/6/2006 रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. प्रथम अपीलाच्या सुनावणीच्या संदर्भात दि. 30/6/2006 रोजी सुनावणी घेतली होती. त्यास अपीलकर्ता हजर होते व त्यास पत्र क्र. 5 प्रमाणे दि. 10/7/2006 रोजी प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला आहे. प्रथम अपील दाखल केल्याच्या नंतरसुध्दा व प्रथम अपीलाचा निर्णय झाल्यानंतरसुध्दा अपीलकर्ता यांनी वेगवेगळया प्रकारे माहिती मागण्याकरीता अर्ज केले आहे. व ती त्यांना माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत दिलेली दिसून येत आहे. असे असले तरी पुन्हा त्यांचे समाधान झाले नाही म्हणून सदरचे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी दि. 8/5/2006 चा माहिती मिळणेसाठीचा अर्ज त्यास विहित मुदतीत दिलेली माहिती व त्यांचे आणखी 6 अर्ज व त्यांना विहित मुदतीत दिलेली माहिती व दि. 30/6/2006 रोजी प्रत्यक्ष सुनावणी अपीलकर्ता यांना दिलेली माहिती यावरुन कोणत्याही प्रकारे माहिती देण्याची टाळाटाळ केलेली नाही किंवा विलंबाने माहिती दिलेली नाही किंवा चुकीची माहिती दिलेली दिसून येत नाही. यामुळे अपीलकर्ता यांना त्यांना आतापर्यंत जी जी माहिती मागितलेली आहे ती माहिती माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत दिलेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## <u>नि र्ण य</u>

1) अपीलकर्ता यांना त्यांचे दिनांक 8/5/2006, (12/6/2006, 23/6/2006, 14/7/2006 व 19/7/2006) या अर्जाच्या अनुषंगाने माहिती ही विहित मुदतीत मिळालेली असल्यामुळे सदरचे अपील निकाली करण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 2/7/2007

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 181/2007.**

श्री अशोक व्यंकय्या किर्तीवार
वार्ड क्र. 17, चरखा संघाचे मागे, श्री नामेवार
यांचे घराजवळ, मूल ता. मूल जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपिलीय अधिकारी तथा
प्रकल्प अधिकारी,
एकात्मिक आदिवासी प्रकल्प कार्यालय
चंद्रपूर.

2) जन माहिती अधिकारी तथा
सहा. प्रकल्प अधिकारी,
एकात्मिक आदिवासी प्रकल्प कार्यालय
चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

## वि वे च न

अपीलकर्ता यांनी दिनांक 2/8/2006 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाच्या सुनावणीस आज अपीलकर्ता गैरहजर आहेत. परंतु प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी प्रकल्प हे खाजगी कामानिमित्त रजेवर असल्यामुळे त्यांनी सुनावणी पुढे ठेवण्याची विनंती केलेली आहे. जन माहिती अधिकारीसुध्दा गैरहजर आहेत. परंतु प्रथम अपीलीय अधिकारी यांनी

दिनांक 18.6.2007 रोजी सदरच्या अपीलाच्या संदर्भामध्ये माहिती देण्याबद्यलचा खुलासा दाखल केलेला आहे. अपीलकर्ता यांनी दि. 12.4.2006 रोजी माहिती अधिकारी तथा सहा. प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प चंद्रपूर यांचेकडे माहिती मागण्यासाठी अर्ज केला होता. सदरच्या अर्जाच्या संदर्भामध्ये दि. 8.5.2006 चे पत्रान्वये माहितीचा अधिकार अधिनियम 2005 मधिल कलम 8 (ज) नुसार माहिती पुरवता येत नसल्याचे कळविले होते. सदरच्या निर्णयाने व्यथित होवून अपीलकर्ता यांनी दि. 22.5. 2006 रोजी प्रथम अपील सादर केले व प्रथम अपीलाच्या संदर्भात देखील दि. 29.6.2006 रोजी माहिती अधिकारी यांनी दिलेला निर्णय योग्य आहे व माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 8 (ज) अन्वये नाकारण्यात येत आहे असे कळविलेले आहे. सदरच्या निर्णयाने व्यथित होवून पुन्हा अपीलकर्ता यांनी सदरचे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

2. सदरच्या द्वितीय अपीलाच्या संदर्भात प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिनांक 18.6.2007 रोजी खुलासा सादर केलेला आहे. त्यामध्ये ''प्रकल्पांतर्गत अनुदानित प्राथमिक/माध्यमिक आश्रमशाळा सरडपार विषयी केलेल्या तक्रारीचे अनुषंगाने केलेल्या चौकशी अहवालाची प्रत चौकशी करणा–या अधिका–याच्या नावासह मागीतली. दरम्यानचे काळात हीच माहिती संस्थाप्रमुख श्री बंडू पोचन्ना पुटटावार यांनी सुध्दा माहितीचे अधिकाराखाली त्यांचे दिनांक 17.4.2006 चे पत्रान्वये मागीतली.

सदरची चौकशी ही अनुदानित आश्रमशाळा सरडपार येथील गैरव्यवस्थापनाबाबत व बोगस पटनोंदणी बाबत असल्याने या कार्यालयाचे श्री डी. आर. मडकवाडे, सहा. प्रकल्प अधिकारी (शिक्षण) यांचे नतृत्वात श्री साठे केंद्रप्रमुख शासकीय आश्रमशाळा,बोर्डा, श्री डी.बी.हस्तक, कनिष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी व कार्यालयाचे श्री वेले,कनिष्ठ लिपीक यांचेवर सापविण्यात आलेली होती. व त्याचेंकडून प्राप्त चौकशी अहवालात ब–याच बाबी गंभीर स्वरुपाच्या असल्याने प्राप्त चौकशी अहवाल कनिष्ठ कार्यालया पुढील कार्यवाहीस्तव सादर करण्यात आला होता.

3. मुळातच श्री बंडू पोचन्ना पुटटावार,संस्थाप्रमुख व श्री अशोक व्यंकया किर्तीवार संस्थेतील कर्मचारी यांच्यात आपसी मतभेदामुळे बरीच प्रकरणे न्यायप्रविष्ट असून चौकशी अहवालाचा गैरवापर करुन न्यायालयीन प्रकरणात वापर होवू नये या हेतुने व चौकशी अहवालाचे गांभीर्य लक्षात घेता माहितीचा अधिकार अधिनियम 2005 मधील कलम 8 (ज) च्या आधारे कार्यालयाचे दि. 29.6.06 चे चे पत्रान्वये माहिती नाकारण्यात येत असल्याचे श्री किर्तीवार यांना कळविण्यात आले. कारण यापूर्वी सुध्दा संबंधित दोघांनीही 15 ते 20 वेळा वेगळी वेगळी माहिती मागविली होती'' असा खुलासा सादर केलेला आहे.

4. वरीलप्रमाणे खुलाशावरुन असे दिसून येते की सदरची संस्था अनुदानित आहे व सदरच्या संस्थेमध्ये बरेच गैरव्यवहार झालेले असल्यामुळे त्याबाबत चौकशी झालेली आहे परंतु चौकशी अहवाल हा पूर्ण झालेला नसल्यामुळे व संस्थाप्रमुख श्री पुटटावार व अपीलकर्ता हा संस्थेतील कर्मचारी यांच्यातील आपसातील मतभेदामुळे प्रकरणे जरी न्यायप्रविष्टे असतील तरी चौकशी अहवालाचा गैरवापर करुन न्यायालयीन प्रकरणावर त्याचा परिणाम होवू शकतो. त्यामुळे प्रकट न करण्याच्या संदर्भात अधिनियमाच्या कलम 8 (ज) अन्वये माहिती मागण्यात येत असल्याचे माहिती अधिकारी यांनी कळविले होते. तसेच यापूर्वी सुध्दा दोघांनीही वेगळी वेगळी माहिती मागविली असली तरी चौकशीच्या अहवालाच्या संदर्भामध्ये कार्यवाही जोपर्यंत अहवालाच्या आधारे होत नाही तोपर्यंत सदरचा अहवाल प्रकट करणे हे संयुक्तिक होणार नाही. द्वितीय अपील जरी दि. 2.8. 2006 रोजी केलेले असले तरी सुध्दा दि. 18.6.2007 च्या प्रथम अपीलीय अधिका–याच्या खुलाशाप्रमाणे सदरच्या न्यायप्रविष्ट प्रकरणाच्या संदर्भात किंवा अहवालाच्या संदर्भात हीच परिस्थिती कायम आहे असे दिसून येते. व त्यामुळे आज सुध्दा सदरची माहिती ही प्रकट करणे योग्य होणार नाही म्हणून जन माहिती अधिकारी यांनी दिलेले कारण हे योग्य असून द्वितीय अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## निर्णय

1) अपीलकर्ता यांना माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय हे योग्य असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
दिनांक 3/7/2007

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 183/2007.**

श्री छगनलाल काशिराम शरणागत,
गणित चित्रकला निदेशक, शासकिय औद्योगिक
प्रशिक्षण संसथा, आवी, ता. आर्वी जि. वर्धा 442201 ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी
शासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे परिसर, भंडारा
जि. भंडारा.

2) जन माहिती अधिकारी तथा
प्रचार्य, शासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, तुमसर
जिल्हा भंडारा. ..... **उत्तरवादी**

<u>वि वे च न</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक 2/8/2006 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 14.3.2006 रोजी माहिती मिळण्यासाठी अर्ज केलेला होता. सदरच्या अर्जामध्ये 4 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. सदरच्या अर्जामध्ये मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये माहिती पुरवण्यासाठी अतिरिक्त शुल्क रु. 871/- हे

कार्यालयाकडे प्रदान करावे किंवा मनिऑर्डर पाठवावे किंवा शासकिय कोषागारात भरणा करावा आणि या कार्यालयास चलानची एक प्रत पाठवावी आणि माहिती घेवून जावी असे दि. 5.4.2006 रोजी अपीलकर्ता यांस कळविले होते. अपीलकर्ता यांनी सदरचे शुल्क न भरता प्रथम अपील दाखल करुन सदरच्या शुल्काबद्यल सुध्दा अवाजवी म्हणून तक्रार करुन, माहिती दिली नाही तसेच मागितलेल्या माहितीच्या संदर्भात अभिलेख्याच्या किती प्रती होतील याबद्यलचेसुध्दा विवरण प्रथम अपीलात दिलेले असून शुल्क रु. 871/– त्यामुळे मान्य नाही असे नमुद केले होते. प्रथम अपीलात कोणत्याही प्रकारची कार्यवाही झाली नसल्यामुळे त्यांनी सदरचे द्वितीय अपील दाखल केले आहे.

3. अपीलकर्ता यांनी त्यांच्या माहिती मिळण्याच्या सदर्भामध्ये जी माहिती मागितलेली आहे त्या माहितीच्या बद्यल रु. 871 ची आकडेवारी ही माहिती अधिकारी यांना विचारले असता त्यांनी मुद्या क्र. क व ड मधील सन 2002 पासून कर्मचा–याच्या प्रवास भत्त्याच्या प्रती पुरवायच्या असल्यामुळे अंदाजे 400 च्या आसपास प्रती माहिती होते असे सांगितले व त्यामुळे रु. 871/– ही शुल्क आकारण्याचे कळविले होते. त्यावर अपीलकर्ता यांचे असे म्हणणे आहे की मुद्या क्र. क व ड मधील माहिती ही अभिलेख्याच्या प्रतीत अपेक्षीत त्यांना नाही तर फक्त नाव व त्याबद्यलची माहिती अशी काढून द्यावी अशी त्यांची अपेक्षा होती. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 2 मधील ''माहिती'' व ''माहितीचा अधिकार'' या संज्ञेच्या व्याख्येमध्ये माहिती सार्वजनिक प्राधिकरणात ज्या साहित्याच्या स्वरुपात उपलब्ध असेल त्या स्तरुपात ती उपलब्ध करुन देणे हे अपेक्षीत आहे. कोणत्याही प्रकारे गोषवारा काढून देणे हे माहितीचा अधिकार अधिनियमात अपेक्षीत नाही व त्यामुळेच ज्या स्वरुपात ते उपलब्ध आहे त्या अभिलेख्याच्या प्रती द्यावयाच्या असल्यास त्याप्रमाणे माहिती अधिकारी यांनी शुल्क आकारलेले दिसते. माहिती न मिळाल्यामुळे प्रथम अपील अपीलकर्ता यांनी दाखल

केले होते परंतु प्रथम अपील हे प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे प्राप्त झालेले नाही असे त्यांचे म्हणणे आहे व त्यामुळे प्रथम अपीलाची सुनावणी झालेली नसल्याने अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील सादर केलेले आहे.

4. माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत शुल्क भरण्याकरीता कळविलेले असल्यामुळे जोपर्यंत माहितीकरीता शुल्काचा भरणा होत नाही तोपर्यंत माहिती अधिका–यावरती माहिती देण्याचे बंधन नाही किंवा माहिती देण्याची आवश्यकता नाही व त्यामुळेच आतापर्यंत अपीलकर्ता यांस माहिती मिळू शकली नाही. आता अपीलकर्ता यांना माहिती हवी असेल त्याबद्यल त्यांना विचारले असता त्यांनी माहिती हवी आहे असे त्यांनी सांगितले परंतु मागितलेल्या माहितीच्या बद्यल शुल्क ते भरण्यास असमर्थ आहे असेही त्यांनी लिहून दिले असून व त्याकरीता त्यांनी दि. 14.1.2006 चे अर्जातील मुद्या क्र. (3) (III) (क) व (ड) या भागासाठी देय असणारी माहिती वगळून उरलेल्या अ व ब मुद्याबद्यल माहिती पुरवण्यात यावी व यासाठी येणारा खर्च भरण्यास ते तयार आहेत असे त्यांनी आज दि. 3.7.2007 रोजी सुनावणीच्या वेळेस लिहुन दिलेले आहे. सदरची माहिती किती दिवसात उपलब्ध करुन देता येईल याबद्यल उत्तरवादी माहिती अधिका–यास विचारले असता उत्तरवादी यांनी ती 15 दिवसात उपलब्ध करुन देता येईल असे सांगितले.

## नि र्ण य

1) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी आज दिनांक 3.7.2007 सुनावणीच्या वेळेस दिलेल्या अर्जात म्हटल्याप्रमाणे त्यांच्या 14.3.2007 च्या अर्जामधील माहिती करीता अ व ब मधील माहिती उत्तरवादी यांनी

त्यांना खर्च कळवून 15 दिवसात उपलब्ध करुन द्यावी. खर्चाबद्यल 5 दिवसात कळवावे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 3.7.2007

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 185/2007.**

श्री नारायणराव लक्ष्मणराव पाम्पट्टीवार
विठ्ठल गणपतराव विरुटकर,
14, लक्ष्मीनगर, जूना वडगाव रोड, चंद्रपूर ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपसचिव,
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
मंत्रालय, मुंबई – 32.

2) जन माहिती अधिकारी तथा
कक्ष अधिकारी,
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
मंत्रालय, मुंबई – 32.

..... **उत्तरवादी**

## वि वे च न

अपीलकर्ता यांनी दिनांक 10/2/2007 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 16.8.2006 रोजी राज्य जन माहिती अधिकारी म्हणून सचिव ग्रामविकास विभाग महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई यांचे कडे 2 मुद्यांवर माहिती मागण्याकरीता अर्ज केला होता. मुद्या क्र. 1 मध्ये जिल्हा परिषद सेवेतील कृषी सहा. पद कमी केल्याबाबत शासन निर्णयाची प्रत व कृषी सहाय्यकाच्या स्थायी करण्याच्या जिल्हा परिषद चंद्रपूर यांचा ठराव तसेच कृषी सहाय्यकाची ज्येष्ठता यादी प्रसिध्द केली हे शासन निर्णयाच्या विरुध्द असल्यास जिल्हा परिषद चंद्रपूर विरुध्द शासन स्तरावरुन कारवाई संबंधात संपूर्ण पत्रव्यवहाराच्या प्रती कृपया पुरविण्यात याव्या अशी माहिती मागितली. तसेच अर्जाच्या अनुषंगाने शासन निर्णय दि. 31 ऑगष्ट 2006 रोजी कक्ष अधिकारी यांना मागितलेल्या माहितीच्या अर्जातील मुद्या क्र. 1 च्या माहिती करीता रु. 78/- ची मनीऑर्डर पाठविण्यात यावी तसेच मुद्या क्र. 2 बाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद चंद्रपूर हे माहिती देण्यास सक्षम प्राधिकरण आहे असे कळविले. त्यानंतर अपीलकर्ता यांनी रु. 78/- चा भरणा केल्याच्या नंतर 12 ऑक्टोबर 2006 रोजी ग्राम विकास व जलसंधारण विभागाने जिल्हा परिषदा/पंचायत समित्यांना मंजूर केलेल्या आकृतीबंधातील मंजूर पदांचा आढावा, सुधारित आकृतीबंधाची दिनांक 27 जुन 2003 च्या शासन निर्णयाची प्रत ही अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिली आहे. सदरच्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे व्यथित होवून अपीलकर्ता यांनी दिनांक 10.11.2006 रोजी प्रथम अपील दाखल केले. व प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये ग्रामविकास विभागाचे दि. 10 फेब्रुवारी 1975 चे शासन निर्णयास ग्रामसेवक व कृषी सहाय्यकाच्या सेवा ज्येष्ठता याद्या वेगवेगळया ठेवण्याचे निर्देश देण्यात आले. शासन निर्णयातील निर्देशानुसार सन 2006 पर्यंत दरवर्षी कृषी सहाय्यंकाची स्वतंत्र सेवा ज्येष्ठता यादी जिल्हा परिषद चंदपूरने प्रसिध्द केली. असे असले तरी कृषी सहाय्यक पद नसल्याचे शासन स्तरावरुन सांगण्यात येते वगैरे माहिती त्यांना मिळाली नाही असे प्रथम अपीलात

नमुद केले आहे. दि. 16.12.2006 रोजी सदरचे प्रथम अपील माहिती अधिकारी यांनी दि. 31.8.2006 रोजी दिलेली माहिती योग्य आहे त्या कारणास्तव फेटाळण्यात आले. सदरच्या निर्णयाने व्यथित होवून पुन्हा अपीलकर्ता यांनी सदरचे द्वितीय अपील सादर केले आहे.

3. अपीलकर्ता यांनी सदरच्या द्वितीय अपीलामध्ये पुर्वीच्या कृषी सहाय्यकाच्या संवर्गाच्या संदर्भात व शासन निर्णयामध्ये झालेल्या बदलाच्या संदर्भात संपूर्ण माहिती विषद करुन कृषी सहाय्यकाचे पद कार्यरत आहे व त्यामुळे दि. 31 जानेवारी 1996 चे शासन निर्णयान्वये मंजूर केलेली सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याचे निर्देश देण्याची विनंती केलेली आहे. अपीलकर्ता यांच्या द्वितीय अपीलातील दिलेल्या माहितीच्या वरुन अपीलकर्ता यांना सर्व शासन निर्णयाची जाणीव आहे असे दिसते. परंतु कृषी सहाय्यकाच्या वेतन श्रेणीच्या संदर्भामध्ये दि. 1974 च्या शासन निर्णयामध्ये कृषी सेवक व ग्रामसेवकाच्या संदर्भामध्ये जो बदल करण्यात आलेला आहे व बदल करण्यात आलेला असून सुध्दा कृषी सहाय्यकाचे स्वतंत्र ज्येष्ठता यादी ठेवावी असे नमुद केले आहे. व त्याप्रमाणे जिल्हा परिषद चंद्रपूर यांनी स्वतंत्र ज्येष्ठता यादी प्रसिध्द केलेली दिसते. व त्यामुळे जिल्हा परिषदेवर कोणत्याही प्रकारची कार्यवाही करण्याचा प्रश्न उपस्थित होत नाही. वेतन श्रेणीच्याबाबत कोणत्याही प्रकारचा उल्लेख 1975 च्या शासन निर्णयात नाही व 2003 च्या शासन निर्णयातील आकृतीबंधात कृषी सहाय्यकाचे पद नसल्यामुळे अपीलकर्ता यांस वेतन श्रेणीच्या बद्यलची तक्रार संबंधित प्राधिकरणाकडे करावी लागेल. सन 2003 च्या आकृतीबंध व सन 1975 चा शासन निर्णय ही माहिती अपीलकर्ता यांचेकडे उपलब्ध आहे त्यावरुनच त्यांनी वर नमुद केल्याप्रमाणे तक्रार करावी. वेतन श्रेणी निश्चित करण्याबद्यलचा कोणत्याही प्रकारचा आदेश देण्याचा अधिकार हा माहितीचा

अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदींप्रमाणे माहिती आयोगाच्या अधिकारीत येत नाही माहितीच्या अधिकारामध्ये अर्ज केलेल्या तारखेस सार्वजनिक प्राधिकरणाकडे ज्या स्वरुपात माहिती उपलब्ध असते त्या अभिलेख्याच्या स्वरुपात ती उपलब्ध करुन देणे अपेक्षीत आहे व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांचेकडे असलेली माहिती त्यांना विहित मुदतीत उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## नि र्ण य

1) अपीलकर्ता यांना माहिती अधिकारी यांनी उपलब्ध असलेली माहिती विहित मुदतीत पुरविलेली असल्यामुळे सदरचे अपील हे फेटाळण्यात येत आहे.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 4.7.2007

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 187/2007 व 188/2007.**

श्री देवराव व्यंकटेश शोभणे

178, एन.आ.टी.लेआउट, त्रिमुर्तीनगर,

रिंग रोड, नागपूर – 22 ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपिलीय अधिकारी तथा

सचिव, (पदुम)

कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विभाग,

मंत्रालय विस्तार, मुंबई – 32.

2) जन माहिती अधिकारी तथा

अवर सचिव,

कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विभाग,

मंत्रालय विस्तार, मुंबई – 32.

..... **उत्तरवादी**

<u>वि वे च न</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक 15/1/2007 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपीले सादर केलेले आहेत. सदरच्या द्वितीय अपीलांची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 13.10.2006 माहिती मिळण्यासाठी अर्ज केला होता. सदरच्या अर्जामध्ये श्री सय्यद महम्मद माजी महाव्यवस्थापक शा.दु.यो. उदगीर यांनी केलेल्या सन 1984–85 ते 1986–87 या कालावधीतील गैरव्यवहार व त्यांच्या पदोन्नतीबद्यल मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिनांक 7 डिसेंबर 1984 रोजी दिलेल्या स्थगितीच्याबद्यल तसेच मा. लोक आयुक्त यांनी दि. 17.12.85 रोजी शासनास पाठविलेल्या अहवालाची प्रत व श्री सय्यद महम्मद यांना सेवेतून बडतर्फ केलेल्या आदेशाची प्रत अशाप्रकारची माहिती मागितलेली होती. सदर अर्ज दिनांक 20.10.2006 रोजी कार्यालयास प्राप्त झालेला दिसून येतो. दिनांक 27.12.2006 रोजी आयुक्त दुग्ध यांना या संदर्भात माहितीच्या बद्यल विचारणा करण्यात आली होती त्यांनी दिनांक 11.1.2006 रोजी सदरच्या श्री सय्यद महम्मद यांचे बद्यलचे अभिलेखे उपलब्ध नाहीत अशा प्रकारची माहिती विभागाला कळविली होती व तशाच प्रकारची माहिती दि. 23.2.2006 रोजी अपीलकर्ता यांना कळविली होती. दरम्यान अपीलकर्ता यांना कोणत्याही प्रकारची माहिती मिळालेली नव्हती म्हणून दि. 6.12.2006 रोजी त्यांनी प्रथम अपील सादर केले होते. सदर प्रथम अपीलाची सुनावणी दि. 29.12.2006 रोजी ठेवण्यात आली होती सुनावणी झाली नाही परंतु वर नमुद केल्याप्रमाणे दि. 23.12.2006 रोजी वस्तुस्थिती कळविली होती. सदरच्या निर्णयाने व्यथित होवून अपीलकर्ता यांनी सदरचे द्वितीय अपील सादर केलेले आहे.

3. तसेच अपीलकर्ता यांनी दि. 26.7.2006 रोजी माहिती मिळण्यासाठी माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज केला होता. सदरचा अर्ज 29.7.2006 रोजी प्राप्त झालेला आहे. सदरच्या अर्जामध्ये सन 1983–84 मध्ये (नागपूर मुक्कामी) श्री सय्यद महम्मद माजी महाव्यवस्थापक शा.दु.यो. उदगीर यांचे विरुध्द झालेल्या खातेनिहाय चौकशीबाबत माहिती 7 मुद्यांमध्ये मागितलेली होती. सदरच्या माहितीच्या संदर्भामध्ये माहिती अधिकारी

यांनी दि. 30.8.2006 रोजी रु. 95/– खर्चाकरीता शुल्क भरणेसाठी कळविले होते त्यानंतर दि. 23.9.2006 रोजी अपीलकर्ता यांनी सदरचे रु. 95/– भरलेले आहे. त्याप्रमाणे त्यांना दि. 30.9.2006 रोजी रजिस्टर पोष्टाने मागितलेल्या माहितीपैकी उपलब्ध असलेली माहिती पाठविलेली आहे. परंतू अपीलकर्ता यांना संपूर्ण माहिती मिळालेली नसल्यामुळे त्यांना दि. 5.10.2006 रोजी प्रथम अपील दाखल केले होते. सदर प्रथम अपीलाच्या सुनावणीच्या संदर्भामध्ये दुग्ध विकास आयुक्त व प्रादेशिक दुग्ध विकास अधिकारी औरंगाबाद 27.11.2006 रोजी माहिती उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने पत्र दिलेले होते. परंतु पत्राच्या अनुषंगाने एकुण 9 पुष्ठे अशी माहिती आयुक्तांनी पाठवलेली होती. सोबतच्या 9 पृष्ठांमध्ये अर्जदारानी दिलेले अर्ज व त्यास दिलेले उत्तर हे त्यांना परत पाठविले. थोडक्यात दुग्ध विकास आयुक्त यांचे कार्यालयातसुध्दा सदरची माहिती उपलब्ध झाली नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांस त्यांनी मागितलेली संपूर्ण माहिती माहिती अधिकारी यांना पाठविणे शक्य झाले नाही.

4. अपीलकर्ता यांनी केलेल्या दोनही अर्जांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की सदरची माहिती त्यांना श्री सय्यद महम्मद यांचे संदर्भामध्ये मागितलेली आहे. एका अर्जामध्ये न्यायालयीन कारवाईच्या बद्यल लोकआयुक्तांकडील कारवाई व बडतर्फी या बद्यल माहिती मागितली व दुस–या अर्जामध्ये विभागीय चौकशीची माहिती मागितली. माहितीचा कालावधी हा 1984, 1987 एवढा जुना असल्यामुळे अभिलेखे उपलब्ध होते त्यातून माहिती त्यांना देण्यात आली इतर माहितीच्या करीता माहिती अधिकारी यांनी माहिती मिळवून देण्याचे प्रयत्न केलेले दिसत आहे परंतु माहिती उपलब्ध झालेली नसल्यामुळे ती दिलेली दिसून येत नाही. आज अपीलाच्या सुनावणीस अपील क्र. 187/2007 मधील काही माहितीच्या बाबत माहिती उपलब्ध झालेली असून ती अपीलकर्ता यांना पुरविण्याची तयारी माहिती अधिकारी यांनी दाखविलेली आहे व ती

प्रत्यक्ष अपीलकर्ता यांस दिलेली आहे. परंतु उर्वरीत माहिती ही अपीलकर्ता यांना आवश्यक असल्यामुळे ती पुन्हा माहिती अधिकारी व अपीलीय अधिकारी यांनी प्रयत्न करुन मिळवून देण्याचे मान्य केलेले आहे. मा. लोकआयुक्तांचा अहवाल हा कृषी विभागात उपलब्ध नसला तर मा. लोकआयुक्त यांचे कार्यालयातून मिळवून देण्याचा प्रयत्न करणे संयुक्तिक होईल. त्याप्रमाणे मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंड पीठामध्ये दाखल केलेल्या याचिकेच्या संदर्भातसुध्दा औरंगाबाद येथील संबंधित कार्यालयातून सदरच्या याचिकेली माहिती मिळवून देणे हा संयुक्तिक राहिल.

5. अपीलकर्त्याच्या दुस–या अर्जातील विभागीय चौकशीच्या संदर्भातील माहिती ही 3 मुद्दे वगळता दिलेली आहे परंतु उर्वरीत 3 मुद्याबद्यलची माहिती ही माहिती अधिकारी व अपीलीय अधिकारी यांनी ज्या कोणत्याही प्राधिकरणाकडे उपलब्ध असेल त्या प्राधिकरणाकडून मिळवून अपीलकर्ता यांना पुरविणे संयुक्तिक होईल व तसा प्रयत्न करण्याचा माहिती अधिकारी यांनी मान्य केले आहे. मात्र सदरची माहिती मिळविण्याचे प्रयत्न जर केले गेले नाही तर मात्र माहिती अधिकारी हे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 प्रमाणे शास्तीस पात्र राहतील.

## नि र्ण य

1) अपीलकर्ता यांची दोनही अपीले ही अंशतः मंजुर करण्यात येत असून त्यांच्या माहितीचा अर्ज दि. 13.10.2006 मधील 2 मुद्यांवरील माहिती व अर्ज दि. 26.7.2006 मधील 3 मुद्यांवरील माहिती ही दि. 30 ऑगष्ट 2007 पर्यंत त्यांना उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न करावा.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 4.7.2007

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती / नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 189 / 2007.**

श्री जी. झेड. तेलंग,
मु.पो. रायगाव (निपाणी)
ता. जि. वर्धा ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं.)
जिल्हा परिषद वर्धा

2) जन माहिती अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती वर्धा.

..... **उत्तरवादी**

<u>वि वे च न</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक 17 / 8 / 2006 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 5.8.2005 रोजी महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम 2002 च्या अन्वये माहिती अधिकारी यांचेकडे माहिती मिळण्यासाठी अर्ज केला होता.

सदरच्या अर्जाप्रमाणे त्यांना उपलब्ध असलेली काही माहिती 22.8.2005 ला पुरविण्यात आली होती. माहिती अपूर्ण मिळाली म्हणून पुन्हा अपीलकर्ता यांनी दि. 23.8.2005 रोजी माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज केला होता. त्यानंतर त्यांना माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी दि. 22.11.2005 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी दि. 19.12.2005 रोजी झाल्यानंतर दि. 26.12.2006 रोजी पुन्हा जी उपलब्ध आहे अशी त्यांना माहिती देण्यात आली. परंतु पूर्ण माहिती न मिळाल्यामुळे दि. 17.8.2006 रोजी वर नमुद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले.

3. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांना जवळ जवळ 20 महिने पेंशन मिळाली नव्हती व माहिती विहित मुदतीत मिळाली असती तर पेंशन लवकर मिळाली असती. आता त्यांना पेंशन सुरु झाली असल्यामुळे माहितीची गरज उरलेली नाही असे त्यांनी सांगितले. असे असले तरी अपीलकर्ता यांचा मुळ अर्ज दि. 5.8.2005 चा हा महाराष्ट माहितीचा अधिकार अधिनियम 2002 प्रमाणे दाखल केलेला होता. व सदरचा महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम 2002 हा 11 ऑक्टोबर 2005 रोजी निरसीत करण्यात आलेला आहे. सदरचा अधिनियम निरसीत करतांना त्या अधिनियमा खालील प्रलंबित अर्ज व त्यावरील अपीले ही महाराष्टाच्या अधिनियमाप्रमाणे निकाली काढण्यात यावे असे निरसीत अधिनियमाच्या कलम 2 मध्ये नमुद केले आहे. त्यामुळे सदरचे द्वितीय अपील हे अपीलकर्ता यांनी मा. लोकआयुक्त यांचेकउे दाखल करावयास पाहिजे होते. परंतु तसे ते न करता महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या खाली राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले आहे. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 हा संसदेनी पारित केलेला अधिनियम व त्यामध्ये कोणत्याही प्रकारे महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम 2002 च्या अंतर्गत असलेल्या अर्जाच्या संबंधातील अपीले निकाली काढण्याच्या बद्यल अधिकारिता दिलेली नाही. त्यामुळे राज्य माहिती आयोगास

सदरच्या अपीलाच्या बाबत निर्णय देण्याचा अधिकार नाही. सुरुवातीला अपीलाच्या सुनावणीत माहिती मिळण्याच्या करीता अपीलकर्ता व उत्तरवादी यांना विचारले होते कारण तांत्रिक बाब वगळता अपीलकर्ता यांना माहिती मिळणे हे महत्वाचे आहे. परंतु त्यांनी त्यांना आता माहितीची गरज उरलेली नाही असेही सांगितले व तांत्रिक बाबीवर त्यांच्या अपीलाच्या संदर्भात राज्य माहिती आयोगास अधिकारीता नसल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## नि र्ण य

1) अपीलकर्ता यांचे अपील हे राज्य माहिती आयोगास अधिकारितेच्या अभावी निकाली काढण्यात येत आहे.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
दिनांक 5.7.2007

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 191/2007.**

श्री तानबा मोरबाजी बडवाईक
मु.पो.ता.अर्जुनी मोरगाव
जि. गोंदिया 441701 ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपिलीय अधिकारी तथा
The Director Postal Services (H.Q.)
C/o Chief Post Master General
Maharashtra Circle, Mumbai 400001

2) जन माहिती अधिकारी तथा
वरिष्ठ अधिक्षक,
पोस्ट अधिकारी, नागपूर एम एन विभाग
नागपूर 440012 ..... **उत्तरवादी**

**<u>वि वे च न</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक 2/8/2006 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये पोस्टल सर्व्हिसेस प्राधिकरणाच्या निर्णया विरुध्द द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या अपीलाच्या संदर्भात ऑथॉरीटीचे प्रतिनिधी हजर आहेत. पोस्टल ऑथॉरीटीनी खुलासासुध्दा दाखल केलेला आहे.

2. पोस्ट विभाग हा केंद्र शासनाच्या अखत्यारीत असल्यामुळे पोस्ट विभागातील माहिती हवी असल्यास पोस्ट विभागातील प्रथम अपीलीय अधिकारी यांचे निर्णयाविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील हे मुख्य माहिती आयुक्त, केंद्रिय माहिती आयोग, नवी दिल्ली 110 067 यांचेकडेच अधिकारीता आहे व तसे अपीलकर्ता यांना पोष्टल प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कळविलेले असून सुध्दा केंद्रय आयोग 4 प्रती व बॅकेला ड्राफठ असे कळवितात व म्हणून राज्य माहिती आयोगाकडे सदरचे अपील दाखल केले आहे असे नमूद केले आहे परंतु राज्य माहिती आयोगास सदरच्या अपीलाच्या संदर्भात कोणत्याही प्रकारचे अधिकारिता नसल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## नि र्ण य

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अधिकारितेच्या अभावी खारीज करण्यात येत आहे.
2) अपीलकर्ता यांनी त्यांना प्रथम अपीलीय अधिकारी पोस्ट मास्तर जनरल नागपूर रिजन यांनी कळविल्याप्रमाणे केंद्रिय माहिती आयोग, नवी दिल्ली यांचेकडे दाखल करावे.
3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
दिनांक 5.7.2007

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 192/2007.**

डॉ. दादासाहेब नानाजी आसमवार
दत्त मंदिराजवळ, वार्ड नं. 39, रामनगर
जि. वर्धा 442001 ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपिलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद चंद्रपूर

2) जन माहिती अधिकारी तथा
संवर्ग विकास अधिकारी,
पंचायत समिती मूल. जिल्हा चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

<u>वि वे च न</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक 4/8/2006 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 14.3.2005 रोजी माहिती मिळण्यासाठी संवर्ग विकास अधिकारी पंचायत समिती मूल यांचेकडे अर्ज केला होता. सदरच्या अर्जामध्ये त्यांनी श्रीमती सत्यभामाबाई लक्ष्मणराव तलारवार हिचे तिच्या जिवंतपणीचे एप्रिल व मे 2005 चे कुटुंब निवृत्ती वेतन संवर्ग विकास अधिकारी पंचायत समिती मूल कडून बँक ऑफ

महाराष्ट्र वर्धा शाखेच्या तिच्या नावे असलेल्या पेंशन अकाउंट नं. 17311 मध्ये जमा केले जाईल काय ही माहिती विचारलेली होती. सदरच्या अर्जाच्या संदर्भात अपीलकर्ता यांना विहित मुदतीत कोणत्याही प्रकारची माहिती ही माहिती अधिकारी यांनी दिली नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 8.5.2006 ला प्रथम अपील दाखल केलेले आहे. सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भात माहिती ही खंड विकास अधिकारी यांचेकडे पाठवून अपीलाचा निर्णय द्यावा असे खंड विकास अधिकारी यांनी 16 मे 2006 रोजी कळविले होते व त्याची प्रत अपीलकर्ता यांना पाठविली होती. त्यानंतर पुन्हा सदरच्या अपीलाची सुनावणी घेतलेली दिसून येत नाही. व अपीलकर्ता यांना कोणत्याही प्रकारे माहिती कळविली नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी सदरचे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाच्या सुनावणी पर्यंत आज रोजी सुध्दा कोणत्याही प्रकारची माहिती अपीलकर्ता यांना न देता मात्र सदरच्या कुटुंब निवृत्ती वेतना बद्यल गट शिक्षणाधिकारी यांनी संवर्ग विकास अधिकारी यांचेकडे वर्धा स्वगाव येथे स्थलांतर करण्यात आलेले आहे असे कळविलेले पत्र व त्याबद्यलचा नंबर क. 268 दि. 12.9.2006 डि. डि. नं. 542409 रु. 2500/– पोष्टाची पाठविल्याची पोच त्याची नक्कल संवर्ग विकास अधिकारी यांनी प्रमाणीत केलेली दाखल केलेली आहे. परंतु ही माहिती मात्र वर म्हटल्याप्रमाणे अपीलकर्ता यांना कळविलेली नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांना त्याबद्यल काहीही माहिती नसल्यामुळे त्यांना माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी द्वितीय अपीलाच्या माध्यमातून माहिती मिळावी म्हणून विनंती केली. अपीलकर्ता यांना त्याबद्यल विचारले असता त्यांनी असे सांगितले की एप्रिल, मे 2005 चे कुटुंब निवृत्ती वेतन हे बॅक ऑफ महाराष्ट्र वर्धा येथे जमा झाले असेल तर माझे काहीही म्हणणे नाही.

## नि र्ण य

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना सदरची आयोगाकडे दाखल केलेली माहिती ही उद्या दि. 6.7.2006 रोजी रजिस्टर पोष्टानी अपीलार्थी यांना पाठवण्यात यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 5.7.2007

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 193/2007.**

श्री जितेंद्र गोविंदराव मात्रे
रा. पिपरी (पारगोठण)
ता. आर्वी जि. वर्धा ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपिलीय अधिकारी तथा
जिल्हाधिकारी वर्धा
2) जन माहिती अधिकारी तथा
जिल्हा पुनर्वसन अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय वर्धा ..... **उत्तरवादी**

## वि वे च न

अर्जदार यांनी दिनांक 25.4.2006 'सांख्यिकी सहा.' या पदाकरीता उद्योग सहसंचालक, नागपूर यांचेकडे केलेली शिफारस व निवडसूची मधून 'सांख्यिकी सहा.' पद अनूसूचित जातीचे आरक्षीत पद रद्य झाल्याबाबत प्रपत्र व अनुशेषाच्या शिल्लक जागासंबंधी माहिती मागितली होती. सदरच्या अर्जानुसार त्यांना विहित मुदतीत कोणत्याही प्रकारची माहिती मिळालेली नाही म्हणून त्यांनी दि. 1.6.2006 रोजी जिल्हाधिकारी कार्यालय येथे प्रथम अपील दाखल केले. सदरच्या अपीलाच्या अनुषंगाने दि. 23 जुन 2006 रोजी माहिती मिळण्यासाठी अतिरिक्त शुल्क रु. 29/- शासकिय कोषागारात भरणा करुन चलानची एक प्रत जिल्हाधिकारी कार्यालयास दाखवून माहिती

घेणेबाबत पत्र देण्यात आले होते तसेच त्यांच्या अपीलाच्या अनुषंगाने सुध्दा दि. 5 जुलै 2006 रोजी पत्राने कळविण्यात आले होते. परंतु अर्जदाराकडून शुल्काची रक्कम न भरल्यामुळे आतापर्यंत त्यांना माहिती देण्यात आली नाही. त्यावर अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांना दि. 23.6.2006 चे पत्र मिळाले नाही व दि. 14.7.2006 रोजी शुल्क भरण्याचे संदर्भामध्ये जिल्हाधिकारी यांचेकडे पुन्हा निवेदन दिले होते. तरीही माहिती न मिळाल्यामुळे सदरचे व्दितीय अपील हे दि. 7.8.2006 रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले आहे.

2. सदरचे व्दितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी श्रीमती किरण मुसळे हया हजर आहेत.

3. अपीलकर्ता यांनी माहिती मिळण्यासाठी केलेला अर्ज हा मुळ जिल्हाधिकारी यांचेकडे दि. 25.4.2006 रोजी सादर केलेला असला तरी दि. 4.5.2006 रोजी जिल्हा पुनर्वसन अधिकारी हया माहिती अधिकारी म्हणून त्यांचेकडे प्राप्त झालेला आहे. अपीलकर्ता यांनी विचारलेली माहिती ही जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांचे कार्यालयात उपलब्ध नसते तर सहउद्योग संचालक यांच्या कार्यालयाशी संबंधित आहे. व त्यामुळे सहउद्योग संचालक नागपूर यांचेकडे सदरची माहिती मिळण्याचा प्रयत्न करुन अपीलकर्ता यास पुरविण्याच्या संदर्भात दि. 23.6.2006 चे व 5.7.2006 चे पत्राने कळविण्यात आले होते. माहिती मिळण्यासाठीचा अर्ज हा माहिती अधिकारी म्हणून त्यांचेकडे विलंबाने प्राप्त झाला व विचारलेली माहिती ही त्यांच्या कार्यालयाशी संबंधित नव्हती व तरीसुध्दा संबंधित कार्यालयाकडून माहिती घेण्याचा प्रयत्न केला व त्यानुसार अपीलकर्ता यास टपाल खर्च शुल्क रु. 29/— भरण्यास सांगण्यात आलेले असून सुध्दा त्यांनी आतापर्यंत शुल्क भरले नसल्यामुळे माहिती उपलब्ध असून पुरवता आली नाही त्यामुळे माहिती विलंबाने देण्याचा व टाळाटाळ करण्याचा प्रश्न उपस्थित होत नाही.

4. अपीलकर्ता यांनी हयाच (सदरच्या) माहिती करीता दि. 7.2.2006 व दि. 9.5.2006 रोजी माहिती मिळण्यासाठी माहिती अधिकारी तथा उद्योग उपसंचालक यांचेकडे सुध्दा अर्ज केला होता. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने माहिती आयोगाकडे अपील क्र. 32/2007 व अपील क्र. 33/2007 ची सुनावणी झालेली असून निर्णय दि. 10.4.2007 रोजी दिलेला असून माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी मागितलेल्या माहितीप्रमाणे कागदपत्रे उपलब्ध करुन दिलेले असल्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यात आलेली आहेत. यावरुन अपीलकर्ता यास जी माहिती हवी आहे त्या माहितीच्या संदर्भातील संपूर्ण कागदपत्रे ही पूर्वीच मिळालेली आहे. असे असले तरी दि. 25.4.2006 च्या जिल्हाधिकारी यांचेकडे केलेल्या माहितीच्या अर्जाच्या संदर्भात आता जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांचेकडे माहिती उपलब्ध आहे व ती अपीलकर्ता यास पुरवण्याची त्यांची तयारी आहे परंतु अपीलकर्ता यांनी टपाल खर्च रु. 29/- चा भरणा केल्यास ती त्यांना पुरविता येईल असे माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे.

5. अपीलकर्ता यांना मागितलेली माहिती पुरवण्यास विलंब झालेला असल्यामुळे माहिती अधिकारी यांचेकडे जी माहिती उपलब्ध आहे ती त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 7 प्रमाणे विनामुल्य पुरवणे संयुक्तीक होईल.

## नि र्ण य

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून त्यांचे दि. 25.4.2006 च्या अर्जाप्रमाणे मागितलेली माहिती ही त्यांना विलंब झाला असल्यामुळे विनामुल्य पुरविण्यात यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 6.7.2007

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 196/2007.**

श्री अशोक मोहनलाल मेश्राम
विनोबा नगर, तुमसर, डॉ. पशिने यांच्या घराजवळ
ता. तुमसर जि. भंडारा ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपिलीय अधिकारी तथा
जिल्हाधिकारी भंडारा
2) जन माहिती अधिकारी तथा
जिल्हाधिकारी कार्यालय भंडारा ..... **उत्तरवादी**

**वि वे च न**

अपीलकर्ता यांनी दिनांक 18/8/2006 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी म्हणून प्रथम अपीलीय अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय असल्यामुळे प्रविण महाजन निवासी उपजिल्हाधिकारी हे हजर आहेत. अपीलकर्ता यांनी द्वितीय अपीलामध्ये त्यांनी पूर्वी केलेल्या दि. 28.3.2007, 15.4.206, 3.4.2006 हया माहिती मागण्याचा अर्जाचा उल्लेख केलेला आहे.

2. अपीलकर्ता यांना सुनावणीच्या वेळेस त्यांच्या कोणत्या माहितीचा मागणीचा अर्ज आहे हयाबद्यल विचारले असता त्यांनी दि. 3.5.2006 हा माहितीचा अर्ज आहे व तो जिल्हाधिकारी तथा माहिती अधिकारी भंडारा यांचेकडे केलेला आहे. सदरच्या माहितीच्या

अर्जामध्ये अपीलकर्ता यांनी एकुण 11 मुद्यांवर माहिती मागितलेली आहे. सदरच्या माहिती मागण्याचा विषय हा अपीलकर्ता हे निलंबीत झालेले असल्यामुळे त्यांच्या कार्यालयातील कनिष्ठ लिपीकांच्या ज्येष्ठतेबद्यल तसेच त्यांचे स्वतःच्या गोपनिय अहवालाच्या बद्यल व त्यांच्या कार्यालयातील कर्मचारी व अधिकारी यांच्या वर्षानुवर्षे एकाच टेबलावर काम करणे बद्यलचे मत मागणारे असे मुद्ये आहेत. पुन्हा दुस–या त्याच तारखेच्या अर्जात सुध्दा पदोन्नतीच्या नियमाच्याबद्यल व अर्जदाराच्या सेवाकाळातील त्यांना मिळालेल्या गोपनीय अहवालाच्या बद्यल त्यांनी पुन्हा 6 मुद्यावर माहिती मागितलेली आहे. त्या सदरच्या अर्जातील माहितीच्या बाबत कोणत्याही प्रकारची माहिती त्यांना मिळालेली नसल्यामुळे त्यांनी दि. 26.6.2006 रोजी पुन्हा प्रथम अपीलीय अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी भंडारा यांचेकडेच प्रथम अपील सादर केले आहे. व त्या प्रथम अपीलामध्ये पुन्हा पूर्वी केलेल्या अर्जाच्याबद्यल माहिती मिळालेली नाही म्हणून तक्रार केलेली आहे. सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भात सुध्दा कोणत्याही प्रकारची कार्यवाही झालेली दिसून येत नाही. अपीलकर्ता यांनी जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये आतापर्यंत बरेच अर्ज केलेले असल्यामुळे कोणत्या अर्जाच्या संदर्भात कोणती कार्यवाही झालेली आहे याबद्यलची निश्चीत अशी माहिती आता सांगता येत नसल्यामुळे अपीलकर्ता त्यांचे दि.3.5.3006 प्राप्त 8.5.2006 च्या 2 अर्जाच्या संदर्भात कोणत्या प्रकारची कार्यवाही झालेली आहे हे शोधून काढून त्यानंतरच निश्चीत अशी माहिती ही अपीलकर्ता अर्जदार यास देता येईल.

3. असे असले तरी अपीलकर्ता यांचे 2 अर्ज तपासून पाहिले. दोन अर्जापैकी पहिल्या अर्जामध्ये 6 मुद्ये आहेत. 6 मुद्यांपैकी मुद्या नं. 1 मध्ये भंडारा जिल्हयातील 13 कनिष्ठ लिपीकांना नायब तहसीलदार या पदावर पदोन्नती देण्यात आली आहे. त्याबद्यलची माहिती ही ज्या स्वरुपात उपलब्ध असेल त्या स्वरुपात देण्यास काहीच हरकत नाही त्या माहितीच्या मुद्यामध्ये कालावधी नाही व नावे नाहीत व पदोन्नतीचा कालावधी व 13

लिपीकांची नावे ही अपीलकर्ता यांनी माहिती अधिकारी यांना दिल्यास माहिती उपलब्ध करुन देणे सुलभ होईल. मुद्या क्र. 2 मध्ये कोणत्या निकषाखाली पदोन्नती दिली या निकषाबद्यल कागदोपत्री माहिती असेल ती उपलब्ध करुन देता येईल अभिप्राय देता येणार नाही. त्याचप्रमाणे मुद्या क्र.3,4,5,6 मुद्यांमध्ये अपीलकर्ता यांनी अभिप्राय मागितलेले आहे. त्यामुळे त्या मुद्याबद्यलचे अभिप्रायात्मक माहिती ही देता येणार नाही. अर्ज क्र. 2 मधील मुद्या क्र. 1 मधील अर्जदाराचे गोपनिय अहवाल लिहीणारे अधिकारी व तत्कालीन पालकमंत्री यांच्याकडे अहवाल पाठविणारे अधिकारी यांच्याबद्यलचे अभिलेखे उपलब्ध असतील तर ती त्यांना पुरवता येतील. मुद्या क्र. 2 मधील माहिती उपलब्ध असल्यास ती द्यावी. मुद्या क्र. 3,4,5 मधील जी जी माहिती त्यांच्या नस्तीमध्ये उपलब्ध असेल त्या माहिती बद्यल अभिलेख्याच्या स्तरुपात कागदपत्र उपलब्ध करुन देता येतील.

4. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 2 मध्ये ''माहिती'' व ''माहितीचा अधिकार'' या संज्ञेची व्याख्या केलेली आहे. माहितीच्या संज्ञेच्या व्याख्येमध्ये कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये अभिलेखे, दस्तऐवज, ज्ञापने, ई मेल, सुचना, प्रसिध्दी पत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवहया, संविधा, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने (मॉडेल), कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील साधनसामुग्री यांचा समावेश होतो. ''माहितीचा अधिकार'' या संज्ञेच्या व्याख्येमध्ये सार्वजनिक प्राधिकरणाकडे असलेली किंवा त्यांच्या अंतर्गत असलेली व या अधिनियमान्वये मिळवण्याचा अधिकार असा आहे की – (एक) एखादे काम दस्तऐवज, अभिलेखे यांची पाहणी करणे (दोन) दस्तऐवजाच्या किंवा अभिलेखाची टिप्पणी किंवा उतारे किंवा प्रमाणित प्रती घेणे (तिन) सामुग्रीची प्रमाणीत नमुने घेणे (चार) डिस्केटस फ्लॉपी टेप वगैरे यांच्या मार्फत माहिती मिळवणे याबाबतच्या अधिकाराचा समावेश होतो. यावरुन कोणत्याही प्रकारे अभिप्रायाच्या माध्यमातून माहिती मिळवता येत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी त्यांच्या दोन

अर्जातील मागितलेल्या माहितीच्या मुद्यापैकी उत्तर हे अभिप्रायात्मक असल्याने त्याची उत्तरे देता येणार नाहीत मात्र त्यांनी मागितलेल्या माहितीपैकी अभिलेखाच्या स्वरुपात जी जी माहिती उपलब्ध असेल ती ती त्यांना झेरॉक्स प्रती मध्ये उपलब्ध करुन देता येईल.

**<u>नि र्ण य</u>**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी दि. 3.5.2006 च्या त्यांच्या 2 अर्जातील मुद्यांपैकी अभिलेख्याच्या स्वरुपातील माहिती उपलब्ध असल्यास विनामुल्य पुरविण्यात यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 6.7.2007

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 80/2007 व 197/2007.**

श्रीमती माधवी दामोदर मारोतकर
क्वा.नं.48, नंदनवन कॉलनी
नागपूर 440 009 ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपिलीय अधिकारी तथा
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग,
3 रा मजला, बॅंक ऑफ इंडियाची इमारत,
हुतात्मा चौक, मुंबई – 01.

2) जन माहिती अधिकारी तथा
उपसचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग,
3 रा मजला, बॅंक ऑफ इंडियाची इमारत,
हुतात्मा चौक, मुंबई – 01. ..... **उत्तरवादी**

## वि वे च न

अपीलकर्ती यांनी दिनांक 20/6/2006 व 21 जुलै 2006 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपीले सादर केलेली आहेत. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दि. 7.7.2006 रोजी घेण्यात आली. अपीलकर्ती हजर आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे प्रथम अपीलीय अधिकारी व माहिती अधिकारी हे उपस्थित न राहता त्यांनी प्रतिनिधी म्हणून श्रीमती रा. सु. राणे कक्ष अधिकारी यांना सदरच्या अपीलाच्या सुनावणीस पाठवून

आयोगानी त्यांना सहकार्य करावे अशी विनंती केली. राज्य माहिती आयोग हे न्यायपिठ आहे याची जाणीव महा. लोकसेवा आयोगाचे अधिका–याना ती नसावी हे उचित नाही. आयोगानी काय सहकार्य उत्तरवादीना करावे या प्रकारचे मार्गदर्शन मात्र केलेले नाही.

2. अपीलकर्ती यांनी दि. 20.4.2006 रोजी माहिती मिळण्यासाठी माहिती अधिकारी यांचे कडे दोन अर्ज केले होते. सदरच्या अर्जाच्या संदर्भामध्ये कोणत्याही प्रकारचे उत्तर दिलेले नसल्यामुळे दि. 30.5.2006 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाची सुध्दा सुनावणी न घेतल्यामुळे अपीलकर्ती यांनी दि. 21.6.2006 रोजी द्वितीय अपील आयोगास दाखल केले.

3. अपीलकर्ती यांनी त्यांच्या दुस–या अर्जामध्ये माहिती न मिळाल्यामुळे दि. 4 जुलै 2006 रोजी प्रथम अपील दाखल केले होते त्यातही माहिती न मिळाल्यामुळे दि. 21 जुलै 2006 रोजी द्वितीय अपील सादर केले आहे. पुन्हा अपीलकर्ती यांनी धनाजीराव काशिनाथ धायगुडे यांच्या संदर्भात त्यांनी स्वतः माहिती मागण्यासाठी केलेल्या अर्जाच्या संदर्भातील अर्जात त्यांना माहिती मिळाली नाही असे सांगितले. तो अर्ज सुध्दा दि. 26.4. 2006 रोजी करण्यात आलेला आहे त्यावर प्रथम अपील दिनांक

5.6.2006 रोजी करण्यात आले आहे व द्वितीय अपील दि. 5.7.2006 रोजी करण्यात आली आहे. धनाजीराव काशीनाथ धायगुडे यांनी सदरच्या द्वितीय अपीलामध्ये सोलापूर जिल्हयातील पत्ता दिलेला असल्यामुळे सदरचे द्वितीय अपील हे जरी मुंबई येथील राज्य माहिती आयोगाकडे दाखल केले असले तरी ते पूणे येथील राज्य माहिती आयोग यांचेकडे चौकशीला वर्ग केलेले असेल याची नोंद महाराष्ट्र लोक सेवा आयोगाचे सचिव व माहिती अधिकारी यांनी घ्यावी.

4. उत्तरवादी यांनी श्रीयुत धनाजीराव धायगुडे त्यांच्या संदर्भात मागितलेले माहितीचे दोन अर्जाचे संदर्भात कोणत्याही प्रकारची माहिती अपीलकर्ता यांस दिलेली नाही तसेच आयोगाकडे पण खुलासा दाखल केलेला नाही. अपीलकर्ता यांनी

मागितलेली माहिती ही त्रयस्थाची माहिती आहे याबद्यलही कोणत्याही प्रकारची कार्यवाही केलेली दिसून येत नाही. यावरुन माहितीच्या अधिकाराच्या संदर्भात महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे कार्यालय अत्यंत उदासीन दिसून येते. माहिती अधिकारी यांनी माहितीच्या अधिकाराच्या अधिनियमाच्या तरतूदींची माहिती करुन घेणे अत्यंत आवश्यक आहे व त्यानंतर प्रत्येक माहिती मागण्याच्या अर्जावर कार्यवाही ही विहित मुदतीत करणे आवश्यक आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनीसुध्दा कोणत्याही प्रकारची दखल घेतलेली दिसून येत नाही. त्यांनीसुध्दा माहितीच्या अधिकारातील प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये प्रत्यक्ष सुनावणी घेवून निर्णय देणे अपेक्षीत आहे. महाराष्ट्र लोक सेवा आयोगा सारख्या संविधानीक संस्थेने तरी अतिशय काळजीपूर्वक अधिनियमाच्या तरतुदी पाळणे आवश्यक आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोग हे परिक्षर्थींचे भविष्य घडविणारी संस्था आहे व एखाद्या परिक्षार्थीच्या बाबत निष्काळजीपणे प्रकरण हाताळणे हे त्यांच्या भविष्याशी खेळण्यासारखे आहे. ज्याप्रमाणे एकाच माहितीच्या अधिकाराच्या अर्जाच्या बाबत उदासीनता दाखविली जाते त्याचप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे सुनावणीसुध्दा गांभीर्याने घेतली जात नाही असेच आतापर्यंतच्या आयोगाच्या व्यवहारावरुन दिसून येते.

5. अपीलकर्ता यांनीसुध्दा त्रयस्थाच्या संदर्भात वेगवेगळे अर्ज करुन माहिती मागणे व ज्याच्या संदर्भात माहिती मागितली आहे त्यांनी सुध्दा स्वतःच्या वैयक्तीकरित्या वेगवेगळे अर्ज करुन माहिती मागणे हे माहितीचा अधिकार अधिनियमाच्या प्रमाणे अपेक्षीत नाही. हा त्या अधिकाराचा एकप्रकारे गैरउपयोग आहे. अन्याय झाला असे वाटले तर त्याकरीता वेगवेगळया पध्दतीने एकाच मागणीकरीता एखाद्या सार्वजनिक प्राधिकरणाकडे अनेक अर्ज करावे हे सुध्दा माहितीच्या अधिकारामध्ये अपेक्षीत नाही. माहितीचा अधिकार यामध्ये निश्चित अशी माहिती मिळवून त्या माहितीच्या आधारे झालेल्या अन्यायाच्या बाबत न्याय मिळवून घेणे ही संकल्पना आहे. परंतु अशाप्रकारे

एकाच कारणासाठी अनेक अर्ज करणे यातून सार्वजनिक प्राधिकरणामध्ये सुध्दा त्या कायद्याच्या तरतूदींबाबत व विशेषतः त्या अर्जदाराच्या बाबत उदासीनतेची भावना तयार होते. प्रत्येक अर्जदाराचा असा समज असतो की त्या विशिष्ट सार्वजनिक प्राधिकरणाकडे फक्त त्यांचे एकटयाचेच काम आहे परंतु त्यामुळे मात्र त्यांना अपेक्षीत असा न्याय मिळू शकत नाही. तरी याबाबतीत सुध्दा माहिती मिळण्यासाठी जे अर्ज करतात त्यांनी काळजी घेणे आवश्यक आहे. अनेक अर्ज केले म्हणजे न्याय मिळेल असा समज हा बरोबर नाही आणि अनेक अर्ज केले म्हणजे त्याकडे दुर्लक्ष करणे हेही सार्वजनिक प्राधिकरणाचा समज होणे हेही बरोबर नाही.

6. असे जरी असले तरी सद्या ज्या दोन अपीलामध्ये योग्य तो खुलासा माहिती अधिकारी यांनी सादर करुन प्रत्यक्ष सुनावणीस हजर राहणे हे आवश्यक आहे अन्यथा माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 प्रमाणे त्यांना शास्ती लावण्याचा निर्णय घेणे भाग पडेल.

7. सदरच्या दोनही अर्जाच्या संदर्भामध्ये राज्य माहिती आयोगाकडून नोटिस पाठवतांना कागदपत्र दाखल करणेसाठी 3.5.2007 व 31.5.2007 सुनावणीसाठी तसेच दुस–या अपीलामध्ये 7.6.2007 व 7.7.2007 अशा तारखा दिलेल्या होत्या. त्या तारखाना सुध्दा माहिती अधिकारी यांनी किंवा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी खुलासा तर दाखल केला नाहीच परंतु वेळोवेळी मुदत वाढवून देण्याची विनंती केली व वेळोवेळी मुदत वाढवून सुध्दा आज सुनावणीस खुलासाही नाही व माहिती अधिकारी किंवा प्रथम अपीलीय अधिकारीसुध्दा उपस्थित नाही.

8. अपीलकर्ता व धायगुडे यांनीसुध्दा वर म्हटल्याप्रमाणे वेगवेगळे अर्ज केलेले असल्यामुळे त्या वेगवेगळया अर्जाच्या संदर्भामध्ये व्यवस्थित अशी माहिती प्रकरणपरत्वे तयार करुन व खुलासा तयार करुन सादर करण्याच्या करीता मुदत देणे हे आवश्यक

झाले आहे त्या करीता दि. 30 जुलै 2007 रोजी या दोनही अपीलाच्या संदर्भामध्ये घेण्यात येईल त्यावेळेस माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगाच्या पुढे उपस्थित राहणे आवश्यक आहे. व यापुढे आयोगानी उत्तरवादी याच्या प्रतिनिधींना सहकार्य करावे याबद्यलची भाषा पत्रामध्ये वापरता कामा नये याची काळजी घ्यावी. सहकार्य कोणी कोणाला करावे हे तपासून घ्यावे. आयोगाचे कामकाज हे प्रशासनिक नसून न्यायिक पध्दतीचे आहे प्रसंगी प्रकरणपरत्वे माहिती अधिकारी यांना कलम 20 प्रमाणे शास्ती करण्याचा आयोगाला अधिकार आहे याची नोंद घ्यावी व आयोगाचा अवमान करण्याचा प्रयत्न करु नये.

सदरच्या अंतरीम आदेशाची प्रत ही अपीलकर्ती व महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे माहिती अधिकारी यांना पाठवण्यात यावी.

नागपूर

दिनांक 7.7.2007

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 199/2007.**

श्री प्रमोद मारोतराव पांडे
अध्यक्ष, सिटीझन फोरम, महाराष्ट्र
एम–5, प्रिमियम प्लाझा,
242, खरे टाउन, धरमपेठ, नागपूर 440010 ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, भंडारा

2) जन माहिती अधिकारी तथा
सहा. परिवहन अधिकारी,
उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, भंडारा ..... **उत्तरवादी**

## वि वे च न

अपीलकर्ता यांनी दिनांक 11/8/2006 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 12.4.2006 रोजी माहिती मिळण्यासाठी अर्ज केला होता. सदरच्या अर्जास परिशिष्ट 'अ' हे जोडलेले होते. परिशिष्ट 'अ' मध्ये 4 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. उत्तरवादी यांनी दि. 25.4.2006 रोजी 3 मुद्यांवर माहिती दिलेली होती. परंतु मुद्या क्र. 2 बद्यल माहिती दिली नाही कारण वाहन धारकांचा चालक

परवाना तसेच शिकाउ परवान्यांची अशा प्रकारची माहिती मागितल्याप्रमाणे व ती तशी कर्तव्यात नसल्याने संकलित माहिती या कार्यालयात उपलब्ध नाही अशा प्रकारचे उत्तर दिलेले आहे. सदरच्या उत्तराने व्यथित होवून अपीलकर्ता यांनी दि. 24.5.2006 रोजी प्रथम अपील दाखल केले होते व माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती ही दिशाभूल करणारी आहे असे प्रतिपादन केले होते. सदरच्या अपीलाच्या संदर्भामध्ये अपीलीय अधिकारी तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी भंडारा यांनी दि. 26.6.2006 रोजी माहिती अधिकारी यांनी दिलेला निर्णय योग्य आहे. असा निर्णय देवून अपीलकर्ता यांना कळविले होते. परंतु माहिती अधिका–यानी मुद्या क्र. 2 ला दिलेल्या उत्तराने व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयावर समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी सदरचे द्वितीय अपील दाखल केले.

3. सदरच्या द्वितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळेस मुद्या क्र. 2 च्या बाबत अपीलकर्ता यांनी त्यांचे म्हणणे सांगितले. त्यावर माहिती अधिकारी यांनी मुद्या क्र. 2 हा स्पष्ट नसल्यामुळे ज्या पध्दतीने तो विचारलेला आहे त्यापध्दतीने त्याला उत्तर देण्यात आले आहे असे सांगितले. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम 2005 प्रमाणे माहिती उपलब्ध करुन देणे हे महत्वाचे असल्यामुळे मुद्या क्र. 2 च्या बाबत अपीलकर्ता यांना स्पष्टिकरण करण्यास सांगितले असता त्यांनी दिलेल्या कालावधीत किती व्यक्तींना वाहनचालक परवाना दिला त्यांची नावे व पत्ता त्यांना अपेक्षीत आहे असे सांगितले. परंतु वर पुन्हा कार्यालयीन अभिलेखाच्या कार्यपध्दती वरुन अशा प्रकारची माहिती काढून द्यावी लागेल व त्याकरीता त्यांचे सार्वजनिक प्राधिकरणाची यंत्रणा ही प्रमाणाबाहेर त्यांना वळवावी लागेल व त्याचप्रमाणे माहिती देणे शक्य होणार नाही असे त्यांचे म्हणणे होते परंतु प्रत्येक वाहनचालक परवाना धारकाच्या नस्तीत मुदतीत त्यांची नावे व पत्ता असलेलया अर्जावरुन किंवा परवान्यावरुन त्याची झेरॉक्स प्रत देता येणे शक्य असेल तर ती अपीलकर्ता हे खर्च भरण्यास तयार असल्यास देणे संयुक्तीक होईल तसे माहिती

अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी मान्यता दिली. अपीलकर्ता सुध्दा खर्च भरण्यास तयार आहे. त्याप्रमाणे विहित कालावधीतील चालक परवाना धारकाच्या माहितीच्या संदर्भात माहितीच्या प्रतींचा अंदाज घेवून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 8 दिवसात पोष्टाने खर्चाचा अंदाज पोष्टल खर्चासहीत कळवून त्याप्रमाणे मनिऑर्डरनी अपीलकर्ता यांनी खर्च भरल्यानंतर 1 महिनयात सदरची माहिती रजिस्टर पोष्टाने त्यांचे कडे पाठविणे संयुक्तिक होईल.

**नि र्ण य**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अर्जातील मुद्या क्र. 2 मध्ये चालक परवाना धारक माहितीचा अंदाज घेवून व त्याचा खर्च 8 दिवसामध्ये अपीलकर्ता यांना पोष्टाने कळवण्यात यावा. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी सदरच्या प्रतींचा व रजिस्टर पोष्टाचा खर्च हा मनिऑर्डरने उत्तरवादी यांचेकडे पाठवावा व त्यानंतर 1 महिन्याच्या कालावधीतील वाहन परवाना धारकाची नावे व पत्ता यांच्या झेरॉक्स प्रती अपीलकर्ता यांना रजिस्टर पोष्टाने पाठविण्यात याव्यात.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 7.7.2007

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती / नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 201 / 2007.**

श्री शैलेश माणिकराव हुमने

रा. कुकडे ले आऊट, नागपूर 440027 ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी नागपूर

2) जन माहिती अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी नागपूर ..... **उत्तरवादी**

**वि वे च न**

अपीलकर्ता यांनी दिनांक 16 / 8 / 2006 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केलेले आहे. सदरच्या व्दितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. सदरच्या अपीलाच्या संदर्भामध्ये दि. 8.6.2007 रोजी कागदपत्रे दाखल करण्याकरीता तारीख देण्यात आली होती. सदरचे कागदपत्र दि. 8.6.2007 रोजी उपविभागीय अधिकारी नागपूर यांनी दाखल केलेले आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 30.5.2006 रोजी उपविभागीय अधिकारी नागपूर यांचेकडे दि. 8.5.2006 रोजी शरद प्रभूदास बोरकर पटवारी मौजा अडेगाव तहसीलदार हिंगणा यांच्या विरुध्द केलेल्या तक्रार अर्जावर झालेल्या कार्यवाहीच्या तपशीलाची मागणी केली होती. अपीलकर्ता यांचा माहिती मागण्याचा अर्ज येईपर्यंत सदर अर्जावर कोणत्याही प्रकारची कार्यवाही केलेली नसल्यामुळे सदरचा अर्ज हा पटवारी यांच्या विरुध्द चौकशी

करुन कारवाई करण्याचा अधिकार तहसीलदार यांचेकडे असल्यामुळे तहसीलदार हिंगणा यांचेकडे अपीलकर्ता यांचा दि. 8.5.2006 चा अर्ज हा पुढील कारवाईसाठी पाठवण्यात आला व तसे अपीलकर्ता यांना कळविण्यात आले. परंतु अपीलकर्ता यांची अपेक्षा सदरच्या अर्जावर कार्यवाही करुन त्यांनी झालेल्या कारवाई बद्यल माहिती मिळण्याची अपेक्षा असल्यामुळे व तशी कारवाई तहसीलदार हिंगणा यांचेकडून विहित मुदतीत म्हणजे 30 दिवसात पूर्ण होवून अहवाल न दिल्यामुळे त्यांनी प्रथम अपील दिनांक 30.7.2006 रोजी दाखल केले. व अपीलाच्या संदर्भामध्ये कोणत्याही प्रकारची सुनावणी न झाल्यामुळे किंवा माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी सदरचे द्वितीय अपील सादर केले.

3. अपीलकर्ता यांनी त्यांच्या अर्जामध्ये दि. 8.5.2006 रोजीच्या अर्जावर कार्यवाहीचा तपशील मागितलेला असल्यामुळे व दि. 1.6.2006 रोजी सदरच्या अर्जाच्या संदर्भामध्ये कारवाई करीता सदरचा अर्ज हा तहसीलदार हिंगणा यांच्याकडे पाठविला. व तसे अपीलकर्ता यांना कळवले. या उत्तरामध्येच त्यांनी केलेला दि. 8.5.2006 च्या अर्जावर केलेली कारवाईचे माहितीच्या अधिकारातील अर्जाप्रमाणे उत्तर समाविष्ट असल्यामुळे त्यांना माहिती विहित मुदतीत दिलेली आहे. तक्रार अर्जाप्रमाणे कारवाई काय झाली त्याप्रमाणे कारवाई करुन ही उपलब्ध करुन देणे हे अपेक्षीत नाही. माहितीच्या अधिकारात माहिती मिळवून त्या माहितीच्या आधारे नंतर संबंधित योग्य त्या अधिका–याकडे तक्रार करणे व न्याय मिळवून घेणे ही संकल्पना आहे व त्याप्रमाणे पुन्हा अपीलकर्ता यांनी उपविभागीय अधिकारी यांना तहसीलदार हिंगणा यांचेकडे दिनांक 1.6.2006 रोजी कारवाईसाठी पाठविलेल्या अर्जाच्या संदर्भात काय कारवाई झाली याबद्यलची माहिती ही पुन्हा दुसरा माहितीचा अर्ज तहसीलदार हिंगणा यांचेकडे करुन घेणे ही कार्यपध्दती आहे. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना दुसरा अर्ज करुन माहिती

मिळालेलीसुध्दा आहे. परंतु दि. 30.5.2006 च्या माहितीचा अधिकार अधिनियमाच्या संदर्भात मात्र त्यांना माहिती दि. 1.6.2006 रोजी देण्यात आलेली असल्यामुळे सदरचे द्वितीय अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**<u>नि र्ण य</u>**

1) अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 30.5.2006 च्या माहिती मागण्याच्या अर्जाप्रमाणे दि. 1.6.2006 रोजी उत्तर दिलेले असल्यामुळे त्यांना माहिती विहित मुदतीत मिळालेली आहे त्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
दिनांक 9.7.2007

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 203/2007.**

श्री विनोद कवडूजी खोब्रागडे
रा. वरोरा, आशिर्वाद नगर, नागपूर हायवे रोड
वरोरा ता. वरोरा जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपिलीय अधिकारी तथा
अतिरिक्त जिल्हाधिकारी चंद्रपूर

2) जन माहिती अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी चंप्रपूर ..... **उत्तरवादी**

__वि वे च न__

अपीलकर्ता यांनी दिनांक 19/8/2006 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 21.6.2006 रोजी त्यांनी पूर्वी दि. 8.3.2006 रोजी केलेल्या अर्जाच्या संदर्भात प्रश्न विचारुन अभिप्राय मागितलेले होते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 1.7.2006 रोजी उपविभागीय अधिकारी चंद्रपूर यांनी सदर भो. वर्ग 2 ची जमीन भो. वर्ग 1 मध्ये रुपांतरीत करावयाचे प्रकरण नस्तीबध्द करण्यात आलेले आहे सदर प्रकरणाची सर्टिफाईड कॉपी शासन निर्णयाप्रमाणे आवश्यक फी भरुन घेण्यात यावी असे कळविले होते. सदरच्या निर्णयाने व्यथित होवून अपीलकर्ता यांनी दि. 14.7.2006 रोजी

प्रथम अपील अतिरिक्त जिल्हाधिकारी तथा प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे केले. सदर अपीलाच्या निर्णयात माहिती अधिकारी यांनी दिलेला निर्णय कायम करण्यात आला. सदरच्या निर्णयाने व्यथित होवून अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील दाखल केले.

3. अपीलकर्ता यांनी माहिती मिळण्याकरीता जो अर्ज केला होता त्या अर्जामध्ये त्यांचा दि. 8.3.2006 चा अर्ज खारीज कां करण्यात आला याबद्यल प्रश्न उपस्थित करुन अभिप्राय मागण्यात आला होता. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 2 मधील ''माहिती'' व ''माहितीचा अधिकार'' या संज्ञेच्या व्याख्येप्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणात जी माहिती सांहित्याच्या स्वरुपात उपलब्ध आहे उदा. अभिलेखे, टिप्पण्या इत्यादी अशी त्या माहितीच्या प्रती उपलब्ध करुन देणे अपेक्षील आहे. व त्यामुळे माहिती अधिकारी यांनी त्यांचा अर्ज खारीज केल्याबद्यल व त्या निर्णयाची सर्टिफाईड कॉपी घेवून जाण्याबाबत विहीत मुदतीत कळविलेले आहे. अर्जदाराची अपेक्षा त्यांच्या 8.3.2006 च्या अर्जावर कार्यवाही करुन त्यांना माहितीच्या अधिकारात न्याय मिळाला पाहिजे अशी अपेक्षा दिसून येते. परंतु माहितीच्या अधिकारामध्ये कोणत्याही प्रकरणी निर्णयासाठी कारवाई करुन मिळावी अशी मागणी करता येत नाही. विशिष्ट कारवाई करा असेही आदेश देण्याचा अधिकार आयोगास नाही. अपीलकर्ता यांनी त्यांच्या पूर्वीच्या अर्जासाठी निर्णयाची प्रत मागितली असती तर त्यांना त्यात कारणे आढळून आले असते. यावरुन अपीलकर्ता यांना त्यांच्या माहितीच्या अधिकाराप्रमाणे माहिती विहीत मुदतीत मिळाली आहे. प्रथम अपीलाचा निर्णय विहीत मुदतीत झालेला आहे व त्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## <u>नि र्ण य</u>

1) अपीलकर्ता यांना माहिती विहित मुदतीत मिळालेली असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 9.7.2007

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 18 प्रमाणे तक्रार क्रमांक 15/2007.**

श्री कमल दशरथ बोम्बार्डे
रा. अनंत पॅलेस, श्रीनगर वार्ड
गोंदिया ता. जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्य.)
जिल्हा परिषद भंडारा

2) जन माहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक, महात्मा ज्योतिबा फुले हायस्कूल,
माडगी, पो. माडगी ता. तुमसर जि. भंडारा. ..... **उत्तरवादी**

<u>वि वे च न</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक 15/7/2006 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 18 अन्वये त्यांना मागितलेली माहिती मिळाली नाही म्हणून तक्रार केलेली आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. तक्रारदार व जन माहिती अधिकारी हे हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 10.1.2006 रोजी माहिती मागण्यासाठी माहिती अधिकारी तथा प्रभारी मुख्याध्यापक यांचेकडे अर्ज करुन 2 मुद्यांवर माहिती मागितली होती. परंतु त्यांना विहित माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी दि. 13.2.2006 रोजी शिक्षणाधिकारी (माध्य) जिल्हा परिषद भंडारा यांचेकडे प्रथम अपीलीय अधिकारी म्हणून अपील दाखल केले होते. सदरच्या शिक्षणाधिका—यांनी अपील हे नमुन्यात नसल्यामुळे व स्टॅम्प लावलेले

नसल्यामुळे स्विकारता येणार नाही असे कळविले होते. व त्यामुळे दि. 28.4.2006 रोजी पुन्हा शिक्षणाधिकारी (माध्य) यांना पत्र दिले होते व त्यासोबत प्रथम अपील दाखल केले होते. त्यात पुन्हा माहितीच्या अधिकाराच्या अर्जाचा उल्लेख नाही या करणावरुन दि. 18.5.2006 रोजी हे अपील स्विकारता येणार नाही असे उत्तर शिक्षणाधिकारी (माध्य) यांनी दिलेले दिसून येते. असे असले तरी दि. 21.6.2007 रोजी रजिस्टर पत्राने माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक महात्मा ज्योतिबा फुले हायस्कूल यांनी अपीलकर्ता यास माहिती दिलेली दिसून येते. अपीलकर्ता यास माहिती मिळालेली असली तरी दि. 15.7.2006 रोजी माहिती मिळाली नाही म्हणून तक्रार अर्ज दाखल करुन माहिती शिघ्र पुरवण्याची व्यवस्था व्हावी असे अपील मेमोमध्ये म्हटलेले आहे. सदरच्या तक्रारीच्या सुनावणीच्या संदर्भामध्ये दि. 17.5.2006 रोजी आयोगाच्या कार्यालयातून नोटिस काढल्याच्या नंतर मागितलेली माहिती दि. 21.7.2007 रोजी पुरवण्यात आलेली दिसून येते. याचा अर्थ माहितीच्या अधिकाराखाली दि. 10.1.2007 पासून कोणत्याही प्रकारची माहिती माहिती अधिका–यानी दिली नाही व प्रथम अपीलीय अधिका–यानी सुध्दा तांत्रिक बाबी महत्वाच्या मानून माहिती देण्याच्या संदर्भात कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतलेली दिसून येत नाही. प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे अपील दाखल करणे याचा अर्थ दोनही पक्षकारांना बोलावून सुनावणी घेणे असा होतो. अशा रितीने प्रशासकीय आदेश काढून तांत्रिक बाबीवरुन अपीलाचा निर्णय देणे हे अपील या संकल्पनेत अपेक्षीत नाही. व त्यावरुन प्रथम अपीलीय अधिकारी यांनीसुध्दा माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदींचे पालन केलेले दिसून येत नाही.

3. असे असले तरी माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती न दिल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 (1) प्रमाणे ते शास्तीस पात्र आहेत.

**नि र्ण य**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून त्यांना माहिती मिळालेली असली तरी ती विहित मुदतीत न दिल्यामुळे जन माहिती अधिकारी तथा प्रभारी मुख्याध्यापक यांना रु. 5000/– ची शास्ती लावण्यात येत आहे. सदरची शास्ती संस्थेनी त्यांच्या दरमहा वेतनातून वसूल करावी व तसा अहवाल आयोगाकडे पाठवण्यात यावा.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 10.7.2007

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 156/2007, 157/2007 व 158/2007.**

श्री सुशीलकुमार शंकरलाल कालोया
वार्ड नं. 33, नामदेवमठाजवळ,
मालगुजारीपूरा, वर्धा – 442001 ता. जि. वर्धा ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी प्राचार्य
चिंतामणी शारिरिक शिक्षण महाविद्यालय,
राजपाल पेट्रोल पंप मागे, विद्यानगर, वर्धा.

2) जन माहिती अधिकारी तथा
कार्यकारी प्राचार्य
चिंतामणी शारिरिक शिक्षण महाविद्यालय,
राजपाल पेट्रोल पंप मागे, विद्यानगर, वर्धा. ..... **उत्तरवादी**

**<u>वि वे च न</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक 30/6/2006 रोजी, दि. 29/6/2006 रोजी 2 द्वितीय अपीले माहितीचा अधिकारी अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेली आहेत. सदरच्या 3 ही अपीलाची सुनावणी आज दिनांक 26/6/2007 रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दिनांक 29/3/2006, 3/4/2006 व 15/4/2006 रोजी माहिती मिळण्यासाठी कार्यकारी प्राचार्य चिंतामणी शारिरिक शिक्षण महाद्यालय विद्यानगर

वर्धा यांचे कडे माहितीचा अधिकारी 2005 अन्वये माहिती मिळण्यासाठी अर्ज केले होते. सदरच्या अर्जामध्ये अनुक्रमे महाविद्यालयाचे ऑडिट बॅलन्स शिट, वर्ष 1990, 1991, 2004 ते 2005 पर्यंत, दुस–या अर्जात शैक्षणिक सत्र 1990, 1991 व 1992, 1993 आणि 2005 जुलै, ऑगष्ट, सप्टेंबर महिन्याचे हजेरी व पगार रजिस्टरची झेराक्स मिळणेबाबत व तिस–या अर्जात श्री संतोष वाकडे (लेखापाल) आपण अर्जदारासंबंधी दिलेल्या माहितीचे सविस्तर खुलासा देण्याबाबत दिनांक 8/12/2004 रोजी अशाप्रकारे माहिती मागविली होती. सदरच्या अर्जाबाबत कार्यकारी प्राचार्य यांनी विहित मुदतीत माहिती न दिल्यामुळे दिनांक 6/6/2006 रोजी प्रथम अपीलीय अधिकारी चितांमणी शारिरिक शिक्षण महाविद्यालय यांचेकडे 3 प्रथम अपीले दाखल केली. परंतु सदरच्या संस्थेतील पदाधिका–यांनी किंवा अधिका–यांनी कोणतेही प्रकारचे उत्तर दिलेले नाही व माहिती दिलेली नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 16/5/2006 रोजी कुलसचिव व माहिती अधिकारी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ नागपूर यांचेकडे सदरच्या महाविद्यालयातून माहिती मिळण्यासाठी 3 अर्ज केले होते. त्यावर महाविद्यालयाकडून माहिती घ्यावी असे कुलसचिव राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी दि. 1 जुन 2006 रोजी कळविल्याचे दिसत आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांनी वरीलप्रमाणे द्वितीय अपीले राज्य माहिती आयोगाकडे सादर केलेली आहेत.

अपीलकर्ता यांनी केलेल्या अपीलाच्या संदर्भात उत्तरवादी यांनी त्यांचे म्हणणे सादर केले आहेत. त्यामध्ये सदरच्या अधिनियमातील ''सार्वजनिक प्राधिकरण'' या संज्ञेच्या व्याख्येप्रमाणे सदरची संस्था ही कोणत्याही प्रकारे शासनाकडून चालवली जात नाही किंवा शासनाकडून नियंत्रीत होत नाही किंवा शासनाकडून कोणत्याही प्रकारे अनुदान मिळत नाही व त्यामुळे सदरच्या अधिनियमाच्या तरतूदी या सदरच्या संस्थेस लागू होत नाहीत असा खुलासा केलेला आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांस माहिती देण्याचा प्रश्न उपस्थित होत नाही. संस्थेचे अध्यक्ष श्रीयुत राजेंद्र शर्मा हे हजर झाले

3

आहेत. त्यांचे लेखी म्हणणे त्यांनी दिलेले आहेत. त्यांनी त्यांच्या संस्थेमध्ये घेण्यात येणारा शैक्षणिक कार्यक्रम हया विद्यापीठाच्या मान्यतेनी घेतल्या जाते, विद्यापीठाची पदवी दिली जाते, परिक्षा हया विद्यापीठाकडून घेतल्या जातात तसेच सदरची संस्था ही स्थापन झाल्यावर शासनाची परवानगी जरी लागत नसली तरी मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियमाप्रमाणे सदरची नोंदणी करण्यात आली आहे. संस्थेची नोंदणी करतांना उद्येश हा शैक्षणिक दिलेला आहे. तसेच संस्थेचे संचालक मंडळाचे हे स्वयंशासीत संस्था आहे. संस्थेच्या कारभारात कोणत्याही प्रकारचा बदल झाला तरी तो धर्मदाय आयुक्त यांना कळवावा लागतो संस्थेचे लेखी परिक्षणसुध्दा शासनाच्या अधिका–यांकडून घेतले जाते तसेच विद्यार्थी शिक्षणास येतात व त्यांच्या दिलेल्या फि च्या निधिवर संस्थेचे कामकाज चालते. शिक्षण देणे हे सार्वजनिक हित यामध्ये मोडते. ही बाब मान्य केली आहे. यावरुन जरी सदरच्या संस्थेस शासनाचे कोणत्याही प्रकारे अनुदान मिळत नसले तरी राज्य विधान मंडळाने केलेल्या कायद्याप्रमाणे प्रत्यक्ष नियंत्रण आहे असा निष्कर्ष काढायला हरकत नाही. व हे नियंत्रण त्या संस्थेमध्ये कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार होवू नये, व्यवस्थापन हे नियमाप्रमाणे व्हावे, गैरव्यवहार किंवा गैरव्यवस्थापन झाल्यास त्यावर शासनास कारवाई करण्याचा अधिकार आहे कारण त्यांत सार्वजनिक हिताचे रक्षण करणे हे अभिप्रेत आहे. विश्वस्तसंस्था नोंदणी करतांना उद्येश द्यावा लागेल व ज्याअर्थी सदरच्या संस्थेने महाविद्यालय सुरु केले आहे त्याअर्थी निश्चितच शैक्षणिक उद्येश दिला असेल व तसा तो असलयास यांत पुन्हा विद्यार्थी मोठया प्रमाणात शिक्षणात येणार त्यांना विद्यापिठाच्या नियमाप्रमाणे अभ्यासक्रम शिकवावा लागतो व विद्यापिठ अनुदानाच्या तरतुदीसुध्दा लागू होतात व त्यावरुन शैक्षणिक संस्था ही खाजगी विनाअनुदान असली तरी सार्वजनिक विश्वस्त निधी अंतर्गत नोंदणी असल्याने व धर्मदाय आयुक्त यांचे नियंत्रण असल्याने माहितीचा अधिकार अधिनियम

2005 च्या तरतुदीच्या निकषाप्रमाणे लागू होत असल्या तर त्या शैक्षणिक संस्था म्हणुन सुध्दा लागू करण्यास अधिनियमाचे तरतुदीप्रमाणे वैध होईल. तरी सदरच्या संस्थेच्या संदर्भामध्ये ही संस्था माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या नुसार सार्वजनिक प्राधिकरण आहे असा निष्कर्ष काढून सदरचा अधिनियम या संस्थेस लागू होतो. वरील विवेचनाप्रमाणे सदरचा अधिनियम हा संस्थेच लागू होत असल्यामुळे सदरच्या संस्थेनी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 4,5 व 6 प्रमाणे कार्यवाही करुन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांची नियुक्ती करणे क्रमप्राप्त आहे. तसेच एखाद्या अर्जदाराने माहितीच्या अधिकाराखाली माहिती मागितली असली तरी त्यांना माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

3. अपीलकर्ता यांनी ज्या 3 अर्जाच्या माध्यमातून माहिती मागितली आहे त्या 3 अर्जाच्या सदर्भामध्ये उत्तरवादी यांनी वर म्हटल्याप्रमाणे खुलासा दाखल केलेला आहे. सदरच्या खुलाशातील परिच्छेद 2 मध्ये असे म्हटले आहे की अपीलकर्ता यांनी कॉलेज ट्रायबुनल यांचेकडे अपील क्र. 7/07 हे दाखल केलेले असून ते प्रलंबित आहे. तसेच उत्तरवादी यांनी अपीलकर्ता यांच्या संबंधी संपूर्ण कागदपत्रे त्या अपीलाच्या संदर्भात दाखल केलेली असल्यामुळे आता त्यांना कोणत्याही प्रकारचे कागदपत्रे देण्याचे कारण नाही.

4. वरील विवेचनाप्रमाणे सार्वजनिक हिताचे निकषाप्रमाणे माहितीचा अधिकार अधिनियमाच्या तरतूदी लागू झाल्यावर माहितीच्या अर्जाप्रमाणे माहिती देण्याबाबत विचार करता येईल. अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितली आहे त्या माहितीच्या संदर्भात अपीलकर्ता यांनी संस्थेत गैरव्यवहार केलेला असल्यामुळे सर्व लेखाविषयक कामकाज ही त्यांनीच पूर्वी केलेले असल्यामुळे व त्यांचे विरुध्द न्यायालयात व महाविद्यालय न्यायाधिकरणाची केस प्रलंबित असल्याने त्यांना त्यांनी मागितलेली माहिती ही दिल्यास

त्यावरुन पुराव्याबाबत गैरउपयोग होण्याची शक्यता आहे व त्यामुळे त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 8 प्रमाणे माहिती प्रकट न करणेबद्यलचे अपवाद करण्यात यावा ही विनंती केलेली आहे अन्यथा त्यांची न्यायालयातील केसच्या निर्णयाबाबत गुणवत्तेवर परिणाम होवू शकेल. अपीलकर्ता यांचे विरुध्द पोलीस तक्रार झालेली असून न्यायालयात प्रकरण प्रलंबित आहे. व चार्जशीटसुध्दा देण्यात आलेले आहे तसेच अपीलकर्ता यांनी राजीनामा दिलेला आहे त्यास कॉलेज न्यायाधिकरणासमोर आव्हान देण्यात आलेले आहे व त्यामुळे त्यास माहिती दिल्यास ती माहितीचा गैरउपयोग होवू शकेल तसेच अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितली आहे ती न्यायालयात दाखल केलेली असल्याने ती त्यांना मिळणारच आहे आणि ती माहिती अपीलकर्ता जी सार्वजनिक हिताच्या दृष्टीने मागत नसून स्वतःच्या वैयक्तिक कारणाकरीता संस्थेला त्रस्त करण्याचे दृष्टीने मागत असल्याने असा मात्र उद्येश नक्कीच माहितीच्या अधिकाराच्या अधिनियमाच्या तरतुदींचा नाही असेसुध्दा उत्तरवादी यांनी त्यांचे म्हणणे मांडले आहे.

## नि र्ण य

1) अपीलकर्ता यांना सदरची माहिती मिळालेली असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.
2) सदरच्या निर्णयाची एक प्रत जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पूणे यांना पोष्टाने पाठविण्यात यावी.
3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 25/6/2007

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 207/2007.**

श्री राजु किसन वानखेडे
रा. श्रीराम वार्ड, बल्लारपूर
जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथ.)
जिल्हा परिषद चंद्रपूर

2) जन माहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक, जिल्हा परिषद हायस्कूल,
नवेगाव मोरे, ता. पोंभुर्णा जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

<u>वि वे च न</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक 15/7/2006 प्राप्त दिनांक 17.1.2007 रोजी रजिस्टर पोष्टाने माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 22.8.2006 रोजी 6 मुद्यांवर माहितीचा तपशील मागितला. सदरचा अर्ज माहिती अधिकारी यांना 29.8.2006 रोजी प्राप्त झाला. सदरच्या माहितीच्या बद्यल रु. 45/– चा भरणा करावा असे दि. 31.8.2006 रोजी अपीलकर्ता यांना कळविण्यात आले आहे. सदरचे पत्र दि. 5.9.2006 रोजी हस्तबटवडयानी अपीलकर्ता

यांना घरी मिळाले. दि. 7.9.2006 रोजी अपीलकर्ता यांनी रु. 45/– चे मनिऑर्डर केली. परंतु विहित मुदतीत त्यांना माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी दि. 3.10.2006 रोजी प्रथम अपील दाखल केले. त्यानंतर दि. 13.10.2006 रोजी उत्तरवादी यांना मनिऑर्डर मिळाली व त्यानंतर दि. 14.10.2006 रोजी माहिती अधिकारी यांनी रजिसटर पोष्टाने माहिती पाठविलेली आहे. असे असले तरी अपीलकर्ता यांचे समजुतीनुसार त्यांच्या माहितीच्या अर्जातील मुद्या क्र. 3 व 4 मधील माहिती ही खोटी आहे म्हणून त्यांनी द्वितीय अपील सादर केले.

3. अपीलकर्ता यांनी त्यांच्या दि. 22.8.2006 च्या माहितीच्या अर्जाप्रमाणे मुद्या क्र. 1,2 व 5,6 मधिल माहिती मिळाली असून त्याबद्यल त्यांची तक्रार नाही. मुद्या क्र. 3 आणि 4 माहिती मिळाली आहे परंतु त्यामध्ये विसंगती असल्यामुळे त्या माहितीतील प्रमाणपत्र व प्रत्यक्ष वेतन कपात या मध्ये विसंगती असल्यामुळे त्यांनी खोटी माहिती दिली असे त्यांचे म्हणणे आहे. व त्यातून त्यांना आयोगाकडून कारवाईची अपेक्षा आहे तसेच माहिती विहीत मुदतीत मिळाली नाही असेही त्यांचे म्हणणे आहे. परंतु त्यांनी मनिऑर्डर दिनांक 7.9.2006 रोजी केली ती दि. 13.10.2006 रोजी मिळाली हा विलंब पोष्टाचा आहे हेसुध्दा अपीलकर्ता यांनी मान्य केले आहे. माहितीच्या अधिकारातील तरतुदीप्रमाणे अपीलकर्ता यांना माहितीच्या खर्चाकरीता विहीत मुदतीत पत्राने कळविले असले तरी त्या तारखेपासून तर खर्च प्रत्यक्ष भरणा केलेली रक्कम हयाचा पुरावा माहिती अधिकारी यांना दाखवे पर्यंतचा कालावधी हा विहीत मुदतीतून वगळता येतो. त्यामुळे दि. 13.10.2006 ला मनिऑर्डर मिळाली दि. 14.10.2006 ला माहिती रजिस्टर पोष्टाने पाठविली त्यामुळे माहिती अधिकारी यांनी माहिती विलंबाने दिली असे म्हणता येत नाही. मुद्या क्र. 3 व 4 बद्यल कारवाईची अपेक्षा अपीलकर्त्याची आहे परंतु माहितीचा अधिकार अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे ''माहिती'' ही ज्या स्वरुपात उपलब्ध असते त्या स्वरुपात ती पुरवणे हे

अपेक्षीत आहे. त्या माहितीतील निर्णयाच्या त्रुटी किंवा चुकीच्या निर्णयाबद्यल कोणत्याही प्रकारची कारवाईबद्यल आदेश हे अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे अपेक्षीत नाही. अर्जदारास मिळालेल्या माहितीच्या आधारावर त्यांना अन्याय झाला असे वाटत असल्यास त्या सार्वजनिक प्राधिकरणाच्या संबंधात योग्य त्या अधिका–याकडे त्याबद्यलची तक्रार करुन त्यांना न्याय मागून घेता येतो. त्यामुळे सदरच्या प्रकरणी अपीलकर्ता यांस माहिती अधिकारी यांनी त्यांना दि. 22.8.2006 च्या अर्जाप्रमाणे मागितलेली माहिती ही विहित मुदतीत दिलेली आहे व त्यामुळे त्यांचे द्वितीय अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## नि र्ण य

1) अपीलकर्ता यांना त्यांचे दि. 22.8.2006 च्या अर्जातील 6 मुद्यावर विहित मुदतीत महिती मिळालेली असल्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 11.7.2007

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

प्रति,

मा. आयुक्त,

नागपूर विभाग, नागपूर

मार्फत :– मा. राज्य माहिती आयुक्त नागपूर

विषय :– वर्ग 4 चे स्थायी शासकीय निवासस्थान मिळण्याबाबत

संदर्भ :– माझे विनंती अर्ज दि. 25.2.2007 व 17.4.2007

अर्जदार :– श्री भरत झिंगरजी राऊत शिपाई

राज्य माहिती आयुक्त कार्यालय नागपूर

महोदय,

सविनय सेवेशी उपरोक्त विषयाचे अनुषंगाने व सदर्भीय विनंती अर्जाचे अनुषंगाने विनंती करतो की माझी बदली तहसील कार्यालय उमरेड येथून राज्य माहिती कार्यालय नागपूर येथे दि. 23.1.2007 ला करण्यात आलेली आहे. मला येथे राहण्याकरीता निवासस्थान नसलयाने मी माझे कुटुंब सोबत ठेवू शकत नाही. त्यामुळे माझी अत्यंत गैरसोय होत आहे. मला वर्ग 4 चे स्थायी शासकीय निवासस्थान उपलब्ध करुन दिल्यास मला माझे कुटुंबियांना नागपूरला आणणे व सोबत ठेवणे सोयीचे होईल. तरी मला वर्ग 4 चे शासकिय निवासस्थान रविनगर किंवा नॉर्मल स्कुल धंतोली येथिल उपलब्ध करुन देण्याची कृपा करावी हि नम्र विनंती.

ठिकाण : नागपूर

आपला विश्वासू,

दिनांक : ——————

(भरत झिंगर राऊत)

शिपाई

प्रति,

मा. आयुक्त,

नागपूर विभाग, नागपूर

मार्फत :– मा. राज्य माहिती आयुक्त नागपूर

विषय :– रविनगर येथील स्थायी शासकीय निवासस्थान मिळण्याबाबत टाईप 2

अर्जदार :– श्री सो. रा. नेपटे शिपाई

राज्य माहिती आयुक्त कार्यालय नागपूर

महोदय,

सविनय विनंती करतो की मी राज्य माहिती आयुक्त कार्यालय नागपूर येथे कार्यरत असून माझे मुळ वेतन रु. 4000/– आहे. मी सध्या 160 खोल्याचे गाळे क्रमांक 18/5 मध्ये राहात असून दरवर्षी हिवाळी अधिवेशनाचे कालावधीत रिक्त करावे लागत असल्यामुळे मला रविनगर येथील टाईप 2 चे स्थायी शासकिय निवासस्थान उपलब्ध करुन देण्याची कृपा करावी ही विनंती.

ठिकाण : नागपूर

दिनांक : ––––––––––

आपला विश्वासू,

(सो. रा. नेपटे)

शिपाई

प्रत :– मा. कार्यकारी अभियंता, सा.बा. सदर क्र. 1 नागपूर तथा, निवासी वाटप समिती क्र. 1 सदर नागपूर यांना माहितीस सविनय सादर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 216/2007.**

श्री राजेश विष्णूपंत तळोकार
मु. पो. ता. पातूर जि. अकोला–444501 ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपिलीय अधिकारी तथा
गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती अंजनगाव
ता. अंजनगाव (सुर्जी) जि. अमरावती

2) जन माहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक, एस.बी.के.कॉन्हेंट व इंग्लिश प्राथमिक स्कूल, सातेगाव
ता. अंजनगाव (सुर्जी) जि. अमरावती ..... **उत्तरवादी**

<u>वि वे च न</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक 15/1/2007 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. प्रथम अपीलीय अधिकारी हजर आहेत. माहिती अधिकारी गैरहजर आहेत व अपीलकर्ता गैरहजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 7.11.2006 रोजी माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांचेकडे त्यांचे मुलाच्या कान्व्हेंट मध्ये दाखल झाल्यापासून के.जी. 1, के.जी.2 व फर्स्ट स्टॅन्डर्डचे प्रगतीपत्रकाची सत्यप्रतीची माहिती मागितली होती. विहित मुदतीत माहिती न मिळाल्यामुळे दि. 11.12.2006 रोजी अपीलकर्ता यांनी प्रथम अपील गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती अंजनगावसुर्जी यांचेकडे केले होते. परंतु अर्जाच्या अनुषंगाने दिनांक

20.11.2006 रोजी गट शिक्षणाधिकारी मुख्याध्यापक तथा माहिती अधिकारी यांना 7 दिवसाचे आंत माहिती पुरवावी म्हणून आदेश दिला. परंतु अपीलकर्ता यांचा माहितीचा अर्ज त्यांचेकडे प्राप्त झाला नाही व अपीलकर्त्याचा मुलगा चालू शैक्षणिक सत्रात कोणत्याच वर्गात शिकत नाही असे दि. 28.12.2006 रोजी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कळविले. तसेच दि. 6.1.2007 रोजी अपीलकर्ता यांनासुध्दा त्यांच्या मुलाची मागितलेली माहिती ही शाळेत नोंदविलेल्या त्याचे पालक कृष्णराव काशिकर यांचेकडे दिली आहे तरी त्यांचे कडून घेणे असे कळविलेले आहे व त्यामुळे त्यांनी द्वितीय अपील दाखल केलेले आहे तसे दि. 3.2.2007 रोजीसुध्दा प्रथम अपीलीय अधिकारी यांना सुध्दा कळविलेले आहे. त्यानंतरसुध्दा दि. 18.4.2007 रोजी अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांना असे विचारले होते की त्यांचा मुलगा जिल्हा परिषदेच्या कोणत्या शाळेत शिकत आहे याची माहिती द्यावी व ती माहिती दिल्यावर दि. 18.4.2007 रोजी पुन्हा अपीलकर्ता यांनी माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक जि. प. प्राथमिक शाळा सातेगाव यांचेकडे माहिती मागण्यासाठी अर्ज केला व त्याप्रमाणे दि. 10.5.2007 रोजी माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यानी त्याना माहिती दिलेली आहे. त्यांच्या मुलाची आई सौ. सुनिता राजेश तळोकार यानी त्यांच्या मुलाची माहिती अपीलकर्ता यांना देवू नये असे मुख्याध्यापक तथा माहिती अधिकारी यांना कळविलेले असून माहिती अधिकारी यांनी दि. 27.4.2007 रोजी प्रथम अपीलीय अधिकारी यांना कळविलेले आहे.

3. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की अपीलकर्ता व त्यांच्या पत्नीतील वाद असल्यामुळे पत्नी व मुलगा त्यांचे बरोबर राहात नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांनी अशा प्रकारे माहिती मागितलेली दिसते. असे असले तरी माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक एस.बी.के.कॉन्व्हेंट व इंग्लिश प्राथमिक स्कूल सातेगाव यांनी वेळोवेळी अपीलकर्ता व प्रथम अपीलीय अधिकारी यांना पत्रव्यवहार करुन वस्तुस्थिती

कळविलेली आहे. अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांना त्यांचा मुलगा जिल्हा परिषदेच्या कोणत्या शिकत आहे याबद्यलची माहिती मागितली, अशी माहिती मागणे हे माहितीच्या अधिकाराच्या अधिनियमाच्या तरतुदींचा गैरवापर आहे. वास्तविक प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अशा प्रकारच्या अर्जावर माहिती देण्याचे काही कारण नव्हते. माहितीच्या अधिकारामध्ये माहिती अधिकारी यांचेकडे उपलब्ध असलेली माहिती पुरविणे हे अपेक्षित आहे. माहितीचा शोध अन्य प्राधिकरणामधून कोणताही संदर्भ दिला नसतांना घेवून पुरविणे हे अपेक्षित नाही व ज्या माहितीच्या अर्जामध्ये कोणतीही दिशा नसतांना मागितलेल्या माहितीच्या बद्यल तपशिल नसतांना अशा प्रकारची माहिती पुरवणे हेही अपेक्षित नाही. त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सदरची माहिती नाकारली असती तर माहितीच्या अधिकाराच्या अधिनियमाचे उल्लंघन झाले नसते. तरीपण त्यांनी माहितीचा शोध घेवून अपीलकर्ता यांस मिळवून दिली आहे व त्या आधारे पुन्हा अपीलकर्ता यांनी त्यांचा मुलगा ज्या शाळेत शिकतो त्या शाळेतील माहिती अधिकारी यांना माहिती दि. 18.4.2007 रोजी मागितली आहे व ती दि. 10.5.2007 रोजी नंतरच्या माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी मुलाच्या आईने माहिती देवू नये असे कळविलेले असल्याचे कळविले आहे. अशाप्रकारे अपीलकर्ता यांनी माहितीच्या अधिकाराचा गैरवापर केलेला दिसून येतो व त्यांना त्यांचे पत्नीने मुलाबद्यल माहिती देवू नये असे माहिती अधिकारी यांना कळविलेले असल्याने त्यामुळे ते या द्वितीय अपीलीच्या सुनावणीस गैरहजर असावे असा निष्कर्ष काढण्यास हरकत नाही. सबब त्यांचे द्वितीय अपील हे खारीज करण्यात पात्र आहे.

## नि र्ण य

1) अपीलकर्ता यांना अंशतः महिती मिळालेली असल्यामुळे व त्यांच्या पत्नीने मुलाची माहिती देवू नये असे माहिती अधिका–यांना कळविले असल्याने सदरचे अपील हे फेटाळण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 13.7.2007

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 75/2007.**

श्री विजय कृष्णराव पवार
मु. फेटरी ता. जि. नागपूर ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपिलीय अधिकारी तथा
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई–32

2) जन माहिती अधिकारी तथा
महिती व जनसंपर्क महासंचालयनालय
महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई – 32. ..... **उत्तरवादी**

<u>वि वे च न</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक 12/1/2007 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी गैरहजर आहेत. माहिती अधिकारी कार्यासन 34 सामान्य प्रशासन विभाग हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 26.10.2006 रोजी श्रीमती मयुरा पाटोदकर, राज्य जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय महाराष्ट्र शासन यांचेकडे माहिती मिळण्यासाठी अर्ज केला होता. सदरच्या अर्जातील मागितलेली माहिती ही कार्यासन 34 अ सामान्य प्रशासन विभाग यांच्या कार्यकक्षेत येते व तसे दि. 8 ऑगष्ट 2006 व दि. 29.9.2006 रोजी कळविण्यात आलेले होते. तरीसुध्दा

दि. 26.10.2006 चा अर्ज हा माहिती व जन संपर्क महासंचालनालयाच्या माहिती अधिकारी यांच्याकडे केल्यामुळे जन माहिती अधिकारी तथा कार्यासन अधिकारी सामान्य प्रशासन विभाग कार्या. 34 अ महाराष्ट्र शासन मंत्रालय मुंबई 32 यांचेकडे करावा असे कळवून मुळ अर्ज हा त्यांना परत करण्यात आलेला दिसून येतो. त्यानंतर दि. 7.11.2006 रोजी जोडपत्र ब च्या नमुन्यामध्ये माहिती अधिकारी कार्या. 34 अ सामान्य प्रशासन विभाग यांचेकडे अर्ज केलेला दिसून येतो. सदरच्या अर्जाच्या संदर्भामध्ये पुन्हा तांत्रिक बाबीवर सामान्य प्रशासन विभागाचे माहिती अधिकारी श्री वसावे यांनी दि. 5.12.2006 रोजी दि. 7.11.2006 चा अर्ज हा अपीलाच्या नमुन्यात असल्यामुळे संचालक माहिती व जन संपर्क महासंचालनालयाच्या अपीलीय अधिकारी यांचेकडे अपील सादर करावे असे अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते. दि. 12.12.2006 रोजी श्रीमती श्रध्दा बेलसरे अपीलीय अधिकारी तथा संचालक (प्रशासन व तांत्रिक माहिती) यांचेकडे प्रथम अपील सादर केलेले दिसून येते. त्यानंतर कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार किंवा माहिती ही अपीलकर्ता यांना न मिळाल्यामुळे त्यांनी द्वितीय अपील सादर केलेले आहे.

3. सदरच्या अपीलाच्या सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तथा कार्यासन अधिकारी कार्या. 34 सामान्य प्रशासन विभाग हे हजर आहेत. सहाय्यक संचालक माहिती अधिकारी गट–ब या पदासाठी दि. 16 एप्रिल 2006 रोजी कोणत्या विभागानी परिक्षा घेतली व त्यासंबंधीची माहिती जरी अर्जदारानी मागितली तरी ती माहिती देण्याची जबाबदारी नेमकी कोणत्या माहिती अधिका–याची आहे हे प्रशासकीय विभाग म्हणून सामान्य प्रशासन विभाग व त्या अखत्यारीतील माहिती व जनसंपर्क महासंचालनालय यांच्या अधिका–यांना ठरवता येत नाही यावरुन शासनाचा प्रशासकीय कारभार कशाप्रकारचा चालतो यावर प्रकाश पडतो. त्यातही माहिती मागणारे अर्जदार अनेक अर्ज करीत असतात. अर्ज करतांना चुकीचे अर्ज करतात व त्यातून त्यांना

निश्चित माहिती मिळाली पाहिजे व माहिती न मिळाल्यास शास्ती करावी अशी त्यांची अपेक्षा असते. अशा हया गोंधळाच्या अवस्थेत माहितीचा अधिकार हा सापडला आहे. माहितीच्या अधिकारामध्ये 3 च टप्पे आहेत. एक माहितीचा अधिकाराचा अर्ज विहित मुदतीत माहिती न मिळाल्यास प्रथम अपील व त्यानंतर द्वितीय अपील अशाप्रकारे अर्जदार सुध्दा कार्यपध्दती पाळत नाही व त्यामुळे माहिती निश्चित कोणत्या माहिती अधिका–यानी द्यावी असा गोंधळ सार्वजनिक प्राधिकरणात घातला जातो आणि याबाबतचे उत्तम उदाहरण हे सदरचे प्रकरण.

4. अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील सादर करतांना माहिती अधिका–याचा तपशील म्हणून श्रीमती मयुरा पाटोदकर, माहिती व जन संपर्क महासंचालनालय मुंबई, कार्यासन अधिकारी सामान्य प्रशासन विभाग कार्या. 34 अ प्रथम अपीलीय अधिका–याचा तपशील श्रीमती बेलसरे संचालक माहिती जन संपर्क महासंचालनालय श्रीमती मनिशा म्हैसकर उपसचिव सामान्य प्रशासन विभाग अशाप्रकारचा तपशील दिलेला आहे. या तपशिलातून नोटिस कोणाला काढावयाची व जबाबदार कोणाला धरायचे हयाबाबत निर्णय करणे अवघड असते. मात्र अर्जदार हे शास्ती लावण्याच्या करता मात्र आग्रही असतात.

5. उत्तरवादी यांनी कागदपत्रे दाखल करतांना काही कागदपत्रे दाखल केलेली आहेत. त्यातून कोणत्याही प्रकारचा अर्थबोध होत नाही. जबाबदारी निश्चित करता येत नाही. अपीलकर्त्यास माहिती दिली याबद्यल आयोगाला अवगत केले नाही. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की त्यांना माहिती मिळाली आहे व ती माहिती ही माहिती व जन संपर्क महासंचालनालय यांचेकडून माहिती मिळाली असे सांगितले. माहिती जर माहिती जन संपर्क महासंचालनालयाच्या माहिती अधिका–यांनी द्यावयाची होती तर ती सामान्य प्रशासन विभागाच्या माहिती अधिकारी यांचेकडून मिळवूनच त्याचवेळेस उपलब्ध करुन देणे सुयुक्तिक झाले असते. परंतु सुरुवातीला अर्जदाराना माहिती न देता निरनिराळया

कार्यासनाकडे किंवा माहिती अधिका–याकडे पाठवायचे व राज्य माहिती आयोगाकडून नोटिस आल्यावर मात्र अर्जदार यास माहिती पुरवायची अशा प्रकारच्या प्रशासनातील कारभाराचा गोंधळाचा उत्तम नमुना आहे. दि. 26.10.2006 रोजी आलेल्या अर्जास जुलै 2007 मध्ये माहिती द्यायची याचा अर्थ माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदींची कोणत्याही प्रकारची माहिती ही प्रशासनाला दिसत नाही. वास्तविक जन माहिती अधिकारी यांनीच शेवटी माहिती पुरवली असल्यास त्यांनी विलंबाने माहिती पुरविली म्हणून माहितीचा अधिकार 2005 च्या कलम 20 (1) प्रमाणे ते शास्तीस पात्र ठरतात. असे असले तरी अर्जदार यांना माहिती मिळालेली आहे हे लिहुन दिलेले असल्यामुळे व माहिती मागण्याच्या संदर्भामध्ये अर्जदारानीसुध्दा अर्ज करतांना त्यांना कळवूनसुध्दा संबंधित माहिती अधिकारी यांचेकउे अर्ज न केल्यामुळे प्रशासकिय अधिका–याना माहिती देण्याच्या संदर्भात टाळाटाळ करण्यास वाव मिळाला. माहिती मिळालेली असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## नि र्ण य

1) अपीलकर्ता यांना विलंबाने का होईना माहिती मिळालेली असल्यामुळे व तसे त्यांनी लिहुन दिलेले असल्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.
2) सदरच्या निर्णयाची एक प्रत प्रधान सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई व संचालक माहिती व जनसंपर्क संचालनालय मंत्रालय मुंबई 32 यांचेकडे अवलोकनार्थ व पुढील कार्यवाहीकरीता पोष्टाने पाठविण्यात यावे.
3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 13.7.2007

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 224/2007.**

श्री सुनिल गुलाबराव भिलकर
रा. आष्टी पो. चाचेर
ता. मौदा जि. नागपूर ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी, रामटेक
2) जन माहिती अधिकारी तथा
तहसिलदार, पारशिवनी ..... **उत्तरवादी**

<u>वि वे च न</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक 16/1/2007 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 8.9.2006 रोजी मौजा बनपुरी पट्टा येथील श्री संभा भोल्या खिरेकार रा. तेलंगखेडी यांचे सर्व्हे नं. 12 व 12/1 सन दि. 9.3.1990 व 13.7.1990 या कालावधीतील फेरफार व विक्रीचा व्यवहार व स्टॅम्प पेपरचे व्यवहार याबद्यलचा तपशील मागितला होता. दि. 16.9.2006 रोजी जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार पारशिवनी यांनी अशा प्रकारचा कोणताही व्यवहार वरील कालावधीत झाला नाही व त्यामुळे कागदपत्र आढळुन येत नाही असे कळविले होते. त्यावर दि. 16.10.2006 रोजी

अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी यांचेकडे दाखल केले होते. दि. 20.10.206 रोजी उपविभागीय अधिकारी यांनी तहसीलदार पारशिवनी यांना अपीलकर्त्याच्या माहितीच्या संदर्भात व प्रथम अपीलाचा संदर्भ देवून विचारणा केली होती. त्याप्रमाणे दि. 6.11.2006 रोजी तहसिलदार पारशिवनी यांनी संपूर्ण प्रकरणाच्या संदर्भामध्ये वस्तुस्थिती निदर्शनास आणून अर्जदारानी विचारलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये कोणत्याही प्रकारचा व्यवहार सर्व्हे. नं. 12 व 12/1 संदर्भात झालेला दिसून येत नसल्यामुळे मागितलेली माहिती पुरवता आलेली नाही असे कळविल्यामुळे दि. 13.11. 2006 रोजी उपविभागीय अधिकारी रामटेक तथा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्त्यास कळविले आहे. पुन्हा या संदर्भामध्ये दि. 21.11.2006 रोजी अर्जदार यांनी उपविभागीय अधिकारी यांचेकडे तलाठी बनपुरी यांचेकडे पट्टा नं. 17 ची नोंद केलेली आहे वगैरे माहिती कळविली. परंतु प्रत्यक्षात फरफाराची नोंदवही (फेरफार पत्रक) तेलंगखेडी तालुका पारशिवनी जिल्हा नागपूर येथील उत्तरवादी यांनी दाखल केली आहे व अपीलकर्ता यांचे म्हणण्याप्रमाणे व्यवहार दि. 9.3.1990 रोजी झालेला असला तरी तो बनपुरी येथील नसून तेलंगखेडी येथील असल्यामुळे व अपीलकर्ता यांनी माहितीच्या अधिकाराच्या अर्जात प्रथम अपीलामध्ये सुध्दा व त्यानंतर केलेल्या अर्जामध्ये सुध्दा मौजा बनपुरीचा उल्लेख केलेला असल्यामुळे व बनपुरीच्या क्षेत्रामध्ये असा कोणताही व्यवहार झालेला नसल्यामुळे तसे अर्जदारास कळविलेले आहे. यावरुन असे दिसून येते की अर्जदारानेच मुळात माहितीच्या अधिकाराच्यामध्ये चुकीचा संदर्भ दिल्यामुळे त्या अनुषंगाने त्यांना तसे उत्तर देण्यात आलेले आहे असे दिसून येते. त्यामुळे माहिती चुकीची दिलेली आहे किंवा माहिती देण्याचे टाळाटाळ करण्यात आलेले आहे असे म्हणता येत नाही व सदरचे अपील हे फेटाळण्यास पात्र आहे.

## <u>नि र्ण य</u>

1) अपीलकर्ता यांनी त्यांच्या दि. 8.9.2006 च्या अर्जामध्ये मुळातच चुकीचा संदर्भ दिलेला असल्यामुळे व त्या अनुषंगाने माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत उत्तर दिलेले असल्यामुळे व विहित मुदतीत प्रथम अपीलाची चौकशी होवून निर्णय दिलेला असल्यामुळे सदरचे द्वितीय अपील हे फेटाळण्यात येत आहे.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 17.7.2007

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 226/2007.**

सौ. मिनाक्षी नामदेव जाधव
सदगुरु कॉलेज जवळ, रामनगर,
मेहकर, जि. बुलढाणा – 443301 ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्य.)
जिल्हा परिषद बुलढाणा ता. जि. बुलढाणा

2) जन माहिती अधिकारी तथा
सचिव, गांधी स्मारक शिक्षण संस्था
मेहकर, जिल्हा बुलढाणा ..... **उत्तरवादी**

<u>वि वे च न</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक नसलेले परंतु 18/1/2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले अपील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील सादर केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ती यांनी प्रकृतीच्या कारणास्तव गैरहजर राहण्याकरीता अनुमती मागितली होती व त्यांचे ऐवजी श्रीयुत नामदेव सवाईराम जाधव त्यांचे पती हे हजर राहतील अशी विनंती केल्यामुळे श्रीयुत नामदेव सवाईराम जाधव यांना अपीलाच्या कामकाजासाठी उपस्थित राहण्यास परवानगी दिली होती. उत्तरवादीपैकी संस्थेचे सचिव तथा प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हा परिषद बुलढाणा हे

हजर आहेत. अपीलकर्ती यांनी दि. 6.6.2006 रोजी अध्यक्ष/सचिव गांधी स्मारक शिक्षण संस्था मेहकर जिल्हा बुलढाणा यांचेकडे 5 मुद्यांवर माहिती मिळणेसाठी अर्ज केला होता. दि. 25.7.2006 रोजी संस्थेचे सचिव यांनी वस्तुस्थिती विशद करुन अपीलकर्ती हिने मागितलेला मुद्या क्र. 1 बद्यल सेकेंडरी स्कुल कोडच्या तरतुदी शाळेला लागू होत्या व त्यात मुख्याध्यापकासह इतरही शिक्षक वृंदाची शैक्षणीक अर्हता कशी असावी याबद्यल स्पष्ट उल्लेख केलेला आहे व त्यामुळे माहितीच्या अधिकारामध्ये माहिती मागविण्याचे प्रयोजन नाही इतरही शिक्षकवर्गाच्या नियुक्तीला शिक्षण विभागाची स्विकृतीची मान्यता धारण करावी लागते तसेच सेवा ज्येष्ठता यादी कोणत्या पध्दतीने तयार करण्यात यावी याबद्यलही स्कुल कोडमध्ये तरतुदी असून त्यावर नियंत्रण ठेवण्यास शिक्षण विभाग सक्षम आहे सबब वरील कारणास्तव आपला अर्ज फाईल करण्यात येत आहे असे कळविलेले आहे. सदरच्या निर्णयामुळे व्यथित होवून श्रीयुत नामदेव सवाईराम जाधव व सौ. मिनाक्षी नामदेव जाधव या दोघांनी मिळुन प्रथम अपील शिक्षणाधिकारी (माध्य) जिल्हा परिषद बुलढाणा यांचेकडे दि. 27.7.2006 रोजी दाखल केले होते. सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भात दि. 8.8.2006 रोजी अपीलकर्ती व श्रीयुत नामदेव सवाईराम जाधव या दोघांना सदरची माहिती ही मुख्याध्यापक जनता हायस्कुल मेहकर हे माहिती अधिकारी असल्यामुळे त्यांचेकडुन त्वरीत उपलब्ध करुन घ्यावी असे कळवून सदरच्या पत्राची प्रतिलिपी मुख्याध्यापक यांना दिलेली असून त्यांना माहिती गोपनिय असली तरी उपलब्ध करुन द्यावी असे कळविलेले आहे. तसेच मुख्याध्यापक जनता हायस्कुल मेहकर यांचेकडून माहितीच्या अधिकारातील दि. 6.6.2006 च्या अर्जानुसार माहिती उपलब्ध होत नसल्यास आपण दि. 21.8.2006 रोजी ठिक दुपारी 1.00 वाजता सुनावणीसाठी कार्यालयात उपस्थित राहावे असेही कळविलेले होते. त्यानंतर श्रीयुत नामदेव सवाईराम

जाधव हे उपस्थित झाले किंवा नाही याबद्यल कोणत्याही प्रकारचा पुरावा उपलब्ध नाही. तरीसुध्दा सदरचे द्वितीय अपील हे राज्य माहिती आयोगाकडे सौ. मिनाक्षी जाधव यांनी दाखल केलेला आहे.

2. सदरच्या अपीलाच्या सुनावणीच्या वेळेस अपीलकर्ती व तिचे पती श्रीयुत नामदेव जाधव यांनी एकच एक माहिती मागण्याकरीता अनेक अर्ज केलेले दिसून येतात. श्रीयुत नामदेव जाधव यांनीसुध्दा ही माहिती मागण्यासाठी अर्ज केलेला असून त्यावरचे द्वितीय अपीलसुध्दा आयोगाकडे दि. 16 जुन 2007 रोजी दाखल करण्यात आलेले आहे. श्रीयुत जाधव यांना माहिती अधिकारी म्हणून मुख्याध्यापक यांचेकडे अर्ज करण्यास सांगितले असतांना सुध्दा ते मुख्याध्यापक यांचेकडे माहिती मिळण्यासाठी अर्ज दाखल केलेले दिसून येत नाही परंतु पुन्हा त्याबाबतची झेरॉक्स प्रत त्यांना दाखवलेली आहे. असे असले तरी सदरचे द्वितीय अपील हे सौ. मिनाक्षी जाधव यांनी दाखल केलेले असल्यामुळे त्यांनी मुळ अर्जात मागितलेल्या 5 मुद्याच्यापैकी मुद्या क्र. 5 विद्यालयातील कार्यरत शिक्षकांची सन 1994 पासून सन 2006 पर्यंत सेवा ज्येष्ठता यादी उपलब्ध करुन देण्यास हरकत नाही. व अपीलकर्ती व त्यांचे पती यांनी आता पर्यंत एकच एक माहिती मागणेकरीता अनेक अर्ज व अपील केलेले असल्यामुळे त्यांना मात्र यापुढे कोणत्याही प्रकारची माहिती ही उपलब्ध करुन देतांना त्या अर्जाच्या संदर्भात त्या मागचा हेतू लक्षात घेवूनच उपलब्ध करुन देण्याचा निर्णय घेण्यात यावा. एकाच माहिती करीता अनेक प्रकारे अर्ज व अपील करुन सार्वजनिक प्राधिकरणाला वेठीस धरणे हे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 प्रमाणे अपेक्षीत नाही. व अशाप्रकारे त्या कायद्याचा दुरुपयोग करुन माहिती उपलब्ध करुन घेता येणार नाही. त्यामुळे आता वर

म्हटल्याप्रमाणे मुद्दा क्र. 5 बद्दलची सेवा ज्येष्ठता यादी फक्त त्यांना उपलब्ध करुन देण्यास हरकत नाही व तसे न केल्यास माहिती अधिकारी हे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 प्रमाणे शास्तीस पात्र राहतील.

**नि र्ण य**

1) अपीलकर्ती यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून त्यांच्या अर्जातील मुद्दा क्र. 5 मधील कार्यरत शिक्षकांची सन 1994 पासून 2006 पर्यंत सेवा ज्येष्ठता यादी त्यांना निर्णय उपलब्ध झाल्यापासून 10 दिवसाचे आंत उपलब्ध करुन देण्यात यावी. त्याकरीता रजिस्टर पोष्टासहीत येणारा खर्च हा अपीलकर्ता हीस कळवून खर्चाचा भरणा केल्यानंतरच त्यांना ती उपलब्ध करुन देण्यात यावी व तसे न केल्यास माहिती अधिकारी हे कलम 20 प्रमाणे शास्तीस पात्र राहतील.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 17.7.2007

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 78/2007 व 79/2007.**

श्री पॅंथर प्रकाश बन्सोड
उंटखाना चौक, मेडीकल कॉलेज रोड
नागपूर – 440 009 ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपिलीय अधिकारी तथा
आयुक्त व प्रकल्प समन्वयक,
एकात्मिक बाल विकास सेवा योजना, म.रा.रायगड भवन,
पहिला माळा, सेक्टर 2, नवी मुंबई – 11

2) जन माहिती अधिकारी तथा
उपआयुक्त (प्रशासन) व प्रकल्प समन्वयक,
एकात्मिक बाल विकास सेवा योजना, म.रा.रायगड भवन,
पहिला माळा, सेक्टर 2, नवी मुंबई – 11 ..... **उत्तरवादी**

## वि वे च न

अपीलकर्ता यांनी दिनांक 17/6/2006 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी दिनांक 31.5.2007 रोजी ठेवण्यात आली होती. परंतु अपीलकर्ता हे गैरहजर होते. त्यानंतर अपीलकर्ता यांनी पुढील तारखेची पुन्हा नोटिस काढुन दि. 3.7.2007 रोजी उपस्थित राहण्यास कळवण्यात आले होते. परंतु उत्तरवादी यांना दि. 18.7.2007 ही मुदत वाढवून तारीख देण्यात आली. परंतु

आज दि. 18.7.2007 रोजी सुनावणी घेण्यात आली. अपीलकर्ता आज हजर आहेत. उत्तरवादी माहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी गैरहजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 17.6.2006 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील सादर केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाचा अर्ज क्र. 78/2007 आहे.

3. अपीलकर्ता यांनी दि. 25.1.2006 रोजी माहिती मिळण्यासाठी माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज केला होता. सदरच्या अर्जाच्या संदर्भात त्यांना कोणत्याही प्रकारची माहिती मिळाली नसल्यामुळे त्यांनी दि. 6.3.2006 रोजी प्रथम अपील दाखल केले होते.

4. अपीलकर्ता यांनी दि. 6.3.2006 रोजी माहिती अधिकारी यांचेकडे दि. 6.2.2006 चे फॅक्स द्वारे पाठवण्यात आलेला लेखी निवेदन पत्रावर आयुक्त प्रकल्प समन्वयक यांनी घेतलेला निर्णय यावर केलेल्या कार्यवाहीची सांक्षांकित प्रत पुरवण्याबाबत अर्ज केलेला होता. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने कोणत्याही प्रकारची माहिती विहित मुदतीत अपीलकर्ता यांना न मिळाल्यामुळे त्यांनी दि. 4.6.2006 रोजी प्रथम अपील प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे दाखल केले होते. सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये कोणत्याही प्रकारची सुनावणी घेण्यात आलेली दिसून येत नाही. सदरच्या प्रकरणी अपीलकर्ता यांनी कागदपत्रे दाखल करतांना त्यांनी दि. 25.1.2006 च्या माहितीच्या अधिकाराच्या अर्जाची प्रत तसेच दि. 6.3.2006 अर्जाच्या प्रथम अपीलाची प्रत तसेच पुन्हा 5.6.2006 च्या अर्जाच्या निवेदनाची प्रत दाखल केली आहे. त्या कागदपत्राचा उल्लेख द्वितीय अपीलात क्र. 78 मध्ये नाही. तसेच अपील क्र. 79/2007 मध्ये सुध्दा दि. 6.3.2006, 4.5.2006, 13.7.2006 अशा प्रकारचे अर्जाच्या प्रती दाखल केलेले आहेत. त्यात त्यांचा उल्लेख द्वितीय अपील मेमोमध्ये नाही. थोडक्यात अपील क्र. 78 व 79 च्या संदर्भात अपीलकर्ता स्वतः अनावश्यक त्या द्वितीय अपीलात कागदपत्रे दाखल करतात व त्यामुळे माझासुध्दा अनेक अर्जांच्यामुळे गोंधळ होतो.

5. सदरच्या अपीलाबद्यल सुनावणी घेतली असता विहित मुदतीत माहिती कां देण्यात आली नाही याबद्यल माहिती अधिकारी यांना विचारले असता त्यांनी लेखी खुलासा सादर केला आहे व त्या लेखी खुलाशामध्ये त्यांनी अपीलकर्ता यांनी आतापर्यंत जे अर्ज त्यांच्या कार्यालयात केलेले आहे त्या अर्जाच्या संदर्भातील मुळ माहिती ही मा. लोक आयुक्त यांच्याकडे ज्या अपीलाची सुनावणी झाली त्या अपीलाच्या सुनावणीच्या आदेशा प्रमाणे माहिती दि. 4.7.2005 रोजी पुरवली गेलेली आहे व त्यामुळेच या अर्जावर कार्यवाही केलेली नाही. त्यानंतर प्रथम अपीलाची सुनावणी घेतलेली दिसून येते. प्रथम अपीलाच्या सुनावणीच्या निर्णयात दि. 4.7.2005 रोजी दि. 15.3.2005 व दि. 22.6.2005 च्या निर्णयाची प्रत पाठवलेली आहे असे निर्णयात घेतलेली आहे. दि. 27.5.2006 रोजीच्या फॅक्स बद्यलची माहिती विचारलेली आहे परंतु कार्यालयात फॅक्स प्राप्त झाल्याची नोंद दिसून येत नसल्यामुळे त्यांच्यावर झालेल्या कारवाईची प्रत देण्यात येत नाही असा निर्णय दिलेला आहे. एकुणच सदरच्या निर्णयामध्ये अपीलकर्ता यांना माहिती देण्यात यावी अशाप्रकारचा निर्णय हा झालेला आहे. अपीलकर्ता यांच्या संपूर्ण प्रकरणामध्ये वारंवार मा. लोक आयुक्त व कार्यालयाचे आयुक्त आणि त्यांचे प्रकल्प अधिकारी यांचेमध्ये पत्रवयवहार झालेला दिसून येत आहे. माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचा मुळ स्त्रोत हा त्यांनी दि. 24.8. 2004 रोजी व 30.7.2004 रोजी दाखल केलेल्या अर्जाच्या मध्ये असल्यामुळे त्या आधारावर या सर्व अर्जांची हाताळणी झाली. परंतु शेवटी दि. 7.9.2006 रोजी पंजीबध्द डाकेने माहिती पाठविण्यात आलेली आहे. सदरची माहिती अपीलकर्ता यांना मिळालेली आहे. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की ती सर्व माहिती मा. लोक आयुक्त यांचेकडे केलेल्या अर्जाच्या संदर्भात आहे. वास्तविक मा. लोक आयुक्त यांचेकडे सुध्दा त्यांनी अपीलात तीच माहिती मागितली होती. राज्य माहिती आयुक्त म्हणून अपीलांची

सुनावणी घेतांना असे आढळुन आले आहे की अपीलकर्ता हे महाराष्ट्रातील बहुतेक अनेक शासकीय कार्यालयात अनेक अर्ज करतात व एकच माहिती वेगळे करुन अनेक सार्वजनिक प्राधिकरणांत मागतात व माहिती मिळाली असली तरी एकाही सार्वजनिक प्राधिकरणाने विलंब केला असल्यास शास्तीची मागणी करतात असे माझ्यापुढे त्यांच्या द्वितीय अपीलाचे सुनावणीवरुन दिसून येते व ही बाब निदर्शनास आणणे अयोग्य होणार नाही. परंतु दोनही द्वितीय अपीलामध्ये अशा प्रकारची माहिती त्यांना मिळाली याचा उल्लेख त्यांनी केलेला नाही किंवा सुनावणीच्या वेळेस सांगितले नाही. तरी सुध्दा अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की दि. 25.1.2006 व दि. 6.3.2006 च्या अर्जाच्या नुसार त्यांना माहिती मिळालेली नाही व त्यामुळे माहिती अधिकारी यांना शास्ती करण्यात यावी व मला माहिती देण्यात यावी.

6. शास्तीच्या संदर्भामध्ये वर नमुद केल्याप्रमाणे कार्यालयात लोक आयुक्त यांचेकडे प्रकरण सुरु असल्यामुळे व त्याच माहितीच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांनी वेगवेगळे अर्ज केलेले असल्यामुळे त्यांच्या अर्जांवर कार्यवाही झालेली नसावी परंतु त्यांच्या प्रथम अपीलाच्या बाबत मात्र चौकशी करुन निर्णय दिलेले आहेत पण प्रथम अपीलाच्या चौकशीस मात्र अपीलकर्ता यांना कळवून सुध्दा ते हजर राहिले नाहीत. प्रथम अपीलाचे चौकशीत हजर न राहणे हेही द्वितीय अपीलांचे सुनावणीस निदर्शनास येते.

7. वर केलेल्या विवेचनावरुन जरी मुळ स्त्रोताच्या संदर्भामध्ये माहिती अपीलकर्ता यांना उपलब्ध झालेली असली किंवा नसली तरी सुध्दा त्यांच्या दि. 25.1.2006 रोजी केलेले माहितीच्या अधिकाराच्या अर्जाच्या संदर्भात व दि. 6.3.2006 च्या अर्जाच्या माहितीच्या अधिकाराच्या अनुषंगाने त्यांना मागितलेल्या माहितीच्या प्रमाणे माहिती उपलब्ध असल्यास 15 दिवसाचे आंत माहिती उपलब्ध करुन देणे व उपलब्ध नसल्यास त्याप्रमाणे कळविणे संयुक्तिक राहील तसेच सदरच्या अर्जाच्या संदर्भामध्ये विहित मुदतीत

माहिती देण्याच्या संदर्भात कार्यालयातील जे अधिकारी किंवा कर्मचारी जबाबदार असतील त्यांना कलम 5 (5) प्रमाणे जन माहिती अधिकारी समजून त्यांचेवर त्यांना लागू असलेल्या सेवा प्रवेश नियमाप्रमाणे विभागीय चौकशीची कारवाई करणे संयुक्तिक राहिल त्याबाबतची जबाबदारी ही प्रथम अपीलीय अधिकारी यांना निश्चित करुन निर्णय घेणे संयुक्तिक होईल.

## नि र्ण य

1) अपीलकर्ता यांचे दोनही अपीले अंशतः मंजुर करण्यात येत असून त्यांच्या दिनांक 25.1.2006 व 6.3.2006 रोजीच्या माहितीच्या अर्जाच्या संदर्भात हा निर्णय मिळाल्या पासून 15 दिवसाचे आंत माहिती पुरवण्यात यावी.

2) सदरच्या अर्जाच्या माहिती पुरवण्याच्या संदर्भात ज्या कर्मचारी, अधिकारी यांनी कारवाई केलेली नसेल त्यांना कलम 5 (5) प्रमाणे जन माहिती अधिकारी समजून त्यांचे विररुध्द विभागीय चौकशी करण्यात यावी. सदरची जबाबदारी ही प्रथम अपीलीय अधिकारी यांनी निश्चित करुन निर्णय घ्यावा.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 18.7.2007

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 231/2007.**

श्री सत्तार खान अब्बास खान
रा. पांडे महाल समोर, भंडारा
ता. जि. भंडारा ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपिलीय अधिकारी तथा
आयुक्त (सा.प्र.) प्रादेशिक संचालक,
नगर पालिका प्रशासन, नागपूर विभाग, नागपूर.

2) जन माहिती अधिकारी तथा
मुख्याधिकारी, नगर परिषद भंडारा ..... **उत्तरवादी**

<u>वि वे च न</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक 18/1/2007 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. सुनावणीस अपीलकर्ता हजर आहेत. जन माहिती अधिकारी हजर आहेत व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी म्हणून श्री एस. बी. वेलफुलवार हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 15.7.2006 रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी नगर परिषद भंडारा यांचेकडे 9 मुद्यांवर माहिती मागण्यासाठी अर्ज केला होता. सदरच्या अर्जाप्रमाणे माहिती अधिकारी यांनी मुदतीत माहिती न दिल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक 13.9.2006 रोजी अपर आयुक्त प्रादेशिक संचालक नगर पालिका प्रशासन

यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. सदरच्या प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात येवून दि. 26.10.2006 रोजी अपीलकर्ता यांना माहिती देण्याच्या संदर्भामध्ये जन माहिती अधिकारी यांना आदेश देण्यात आले होते. त्याचप्रमाणे अपीलकर्ता यांना सुनावणीच्या दिवशी दिनांक 20.10.2006 रोजी जी माहिती देण्यात आली ती समाधानकारक नसल्याचे अपीलकर्ता यांनी सांगितल्याने सदरच्या माहिती करीता अपीलकर्ता यांनी माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करुन इन्स्पेक्शन घ्यावे व सदरची माहिती त्यांना मोफत पुरवावी असेही आदेश देण्यात आले. त्याप्रमाणे दि. 6.11.2006 रोजी अपीलकर्ता यांनी इन्स्पेक्शन घेण्याकरीता अर्ज दिला होता. सदरच्या अर्जाप्रमाणे दि. 24.11.2006 रोजी अपीलकर्ता यांना दि. 26.10.2006 चे निर्णयाप्रमाणे प्राचार्य मौलाना अब्दुल कलाम आझाद नगर परिषद उर्दू हायस्कुल व कनिष्ठ महाविद्यालय भंडारा येथे प्रशासकीय प्रशासन नगर परिषद भंडारा यांचे सोबत शाळेत माहिती पाहण्याकरीता यावे प्राचार्य आपणास रेकॉर्ड केव्हाही दाखववायास तयार आहे असे पत्र दिलेले आहे. त्यानंतर अपीलकर्ता यांनी इन्स्पेक्शन घेतले नाही पुन्हा माहिती बरोबर दिली नाही म्हणून द्वितीय अपील दाखल केले आहे.

3. सदरच्या द्वितीय अपीलाच्या सुनावणीच्या करीता माहिती अधिकारी यांनी खुलासा व कागदपत्रे दाखल केलेले आहेत. सदरच्या खुलाशामध्ये अपीलकर्ता यांचे दि.6.11.2006 ला आदेशास अनुसरुन इन्स्पेक्शन करुन व सदर दस्तऐवजाची छायाप्रत प्रमाणित करुन देण्याबाबत अर्ज सादर केले. या कार्यालयाचे पत्र क्र. 137 दि. 16.11.2006 अन्वये मुख्याध्यापक मौलाना उर्दू हायस्कुल यांना सुचना देवून संबंधित अर्जदारास रेकॉर्ड तपासण्याबाबत उपलब्ध करुन देण्याबाबत निर्देश देण्यात आले तसेच श्री सत्तार खान अब्बास खान यांना सुध्दा या कार्यालयाचे पत्र क्र. 70 दि. 24.11.2006 तपासून घेण्याबाबत कळविण्यात आले आहे. परंतु अपीलकर्त्यानी संबंधित पत्र घेण्यास नकार

दर्शविला त्याबाबत त्यांना पत्र देण्यात आलेल्या डाकबुकाच्या पानाची झेरॉक्स सोबत जोडण्यात आलेली आहे. तसेच श्री सत्तारखान अब्बास खान यांना संबंधित पत्र रजिष्ट्री डाकेने पाठविण्यात आले. रजिष्ट्रीची पावती सोबत सलग्न आहे. म्हणजे यावरुन असे सिध्द होते की अपीलार्थी रेकॉर्ड पाहण्यास उत्सुक नाही असा खुलासा दिलेला आहे. सोबत कागदपत्रे दाखल केलेली आहेत. माहितीच्या अर्जावर दि. 15.7.2006 रोजी माहिती अधिकारी यांनी तातडीने माहिती द्यावी असे आदेश पारीत केलेले आहे. त्यानंतर दि. 17.7.2006 रोजी प्राचार्य मौलाना अब्दुल कलाम आझाद उर्दू हायस्कुल नगर परिषद भंडारा यांना पत्र देवून अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती 30 दिवसाचे आंत दोन प्रतीत सादर करावी असे कळविले असून प्रतिलिपी ही श्री सत्तार खान यांना माहितीसाठी अग्रेषित केले आहे. सदरच्या पत्राप्रमाणे दि. 24.7.2006 रोजी प्राचार्य मौलाना अब्दुल कलाम आझाद उर्दू हायस्कुल आणि ज्युनिअर कॉलेज नगर परिषद भंडारा यांनी मुख्याधिकारी नगर परिषद भंडारा यांना माहिती तयार करण्यात येत आहे पण आपण दिलेल्या मुदतीत माहिती तयार होणे अशक्य आहे तरी पुन्हा 15 दिवसाची मुदत देण्यात यावी माहिती तयार झाल्यास लगेच पाठविण्यात येईल असे कळविलेले दिसत आहे. परंतु पुढे माहिती दिल्याचे दिसत नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी सदरचे द्वितीय अपील सादर केलेले दिसून येत आहे. सुनावणीच्या दरम्यान दि. 29.8.2006 रोजी श्री सत्तार खान अब्बास खान यांना त्यांच्या माहितीच्या अर्जाप्रमाणे मागितलेली माहिती प्राचार्य उर्दू हायस्कुल भंडारा कडून प्राप्त झालेली आहे संकलित केलेली माहितीचे शुल्क रु. 53/– भरुन माहिती प्राप्त करुन घ्यावी असे पत्र क. 120/3/प्रशासन/उ.अ./न.प.न/06 प्रमाणे कळविलेले दिसून येत आहे. सदरच्या पत्राच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांना विचारले असता सदरचे पत्र त्यांना मिळालेले नाही असे सांगितले परंतु प्रथम अपीलाच्या सुनावणीच्या दिवशी सदर पत्र त्यांना देण्यात आले व त्या दिवशी

माहिती पण देण्यात आली. अपीलकर्ता यांना सुध्दा सुनावणीच्या दरम्यान सदरचे पत्राच्या बाबत सांगितले नाही व त्यांना पुर्वीचे पत्र सुध्दा त्यांनी दाखल केले नाही. सदरच्या अपीलाच्या संदर्भामध्ये माहिती अधिकारी यांनी दाखल केलेला खुलासा व सोबतचे कागदपत्रे यावरुन दिसून येते की माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांच्या अर्जावर माहिती देण्याच्या संदर्भामध्ये त्याच दिवशी कारवाई केलेली दिसून येते. माहिती ज्या कार्यालयात उपलब्ध आहे त्या कार्यालयाच्या प्राचार्यांनासुध्दा माहिती 3 दिवसात त्वरीत पाठवावी असे पत्र दिलेले आहे. सदरच्या माहितीचा कालावधी हा सन 2000 ते 2006 असल्यामुळे प्राचार्य मौलाना अब्दुल कलाम आझाद उर्दू हायस्कुल यांनी दिनांक 24.7.2006 रोजी माहिती मुदतीत देणे अशक्य आहे तरी 15 दिवसाची मुदत देण्यात यावी असे कळविलेले आहे असेही पुराव्यात समोर आलेले आहे. यावरुन अर्जदारास माहिती देण्याच्या संदर्भामध्ये माहिती अधिकारी व संबंधित अधिकारी यांचेकडून प्रयत्न झालेला दिसून येत आहे. असे असले तरी माहिती देण्याच्या संदर्भातील पत्रे ही कागदपत्रात दिसून येत असली तरी अपीलकर्ता यांना मिळालेली नाही असे अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे व दि. 29.8.2006 चे पत्र व माहिती ही त्यांना दि. 20.10.2006 रोजी मिळाली असे त्यांचे म्हणणे आहे व त्यामुळे ही माहिती उशिरा मिळाली व त्याकरीता माहिती अधिकारी यांना शास्ती लावण्यात यावी अशी त्यांनी विनंती केली आहे. माहिती मिळून सुध्दा ती अपूर्ण आहे या कारणाकरीता त्यांना संपूर्ण रेकॉर्डचे इन्स्पेक्शन घ्यावे असा असा आदेश दिलेला असतांनासुध्दा त्याबाबतचा पत्रव्यवहार झालेला असतांना सुध्दा अपीलकर्ता यांनी पत्र घेण्याचेसुध्दा नाकारले आहे व त्यामुळे ते पत्र त्यांना रजिस्टर डाकेनी पाठवलेले असून तेही पत्र त्यांना मिळाले नाही असे त्यांचे म्हणणे आहे. परंतु रजिस्टर डाकेनी पत्र पाठविलेले आहे याचा पुरावा उपलब्ध आहे. मात्र त्यांनी इन्स्पेक्शन घेतलेले नाही. त्यावर अपीलकर्ता यांना विचारले असता त्यांनी सांगितले की

त्यांना दि. 1.6.2006 रोजी उर्दू हायस्कुल मधिल कागदपत्रे ही नगर परिषदेत आणावी व त्यानंतर ते इन्स्पेक्शन घेतील असे पत्र त्यांनी माहिती अधिकारी यांना दिले आहे परंतु सदरचे पत्र हे माहिती अधिकारी व अपीलीय अधिकारी यांना सादर केलेले नाही. जे पत्र सुनावणीच्या दरम्यान अपीलकर्ता यांनी दाखवले त्या पत्रावर अपीलकर्ता यांची सही नाही. यावरुन अपीलकर्तासुध्दा अपीलाच्या सुनावणीच्या दरम्यान पत्रव्यवहार लपवण्याचा प्रयत्न करतात असा निष्कर्ष काढण्यास हरकत नाही. एकूणच माहिती तयार असून सुध्दा ती विलंबाने अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भामध्ये ज्या अधिका–याचे सहाय माहिती अधिकारी यांनी मागितले ते अधिकारी किंवा कर्मचारी या संदर्भात दोषी ठरतात. रेकॉर्डचे इन्स्पेक्शन घेण्याचे करीता कागदपत्रे ही नगर परिषद भंडारा येथे आणण्यात यावी अशी मागणी कां केली याबाबत विचारले असता अपीलकर्ता यांनी सांगितले की अपीलकर्ता व प्राचार्य मौलाना अब्दुल कलाम आझाद हायस्कुल यांचे संबंध बरोबर नाही. परंतु अशा प्रकारची कागदपत्र ज्या तपासणीच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांनी विशिष्ट कार्यालयात कागदपत्रे आणली तरच तपासणी करण्यात येईल अशी अट घालणे म्हणजे सार्वजनिक प्राधिकरणाच्या यंत्रणेच्या निधीचा व वेळेचा हा अपव्यय आहे. प्राचार्य व त्यांचे संबंध ठिक नाही याकरीता सार्वजनिक प्राधिकरणाचे यंत्रणेला वेठीस धरणे हेही गैर आहे. व त्यातून माहिती मागण्याचा हेतू स्पष्ट होतो. जरी द्वितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळेस सुध्दा अपीलकर्ता यांनी लेखी म्हणणे सादर केलेले आहे सदरच्या लेखी म्हणण्यामध्ये सुध्दा त्यांनी माहीती अपूरी असून चुक देखील आहे असे म्हणून 7 मुद्यांवर ही चुक कशाप्रकारे आहे ते सादर केलेले आहे. जे 7 मुद्ये काढण्यात आलेले आहे त्या 7 मुद्याच्या संदर्भामध्ये माहिती चुक आहे किंवा अपुरी आहे असे माहितीच्या अधिकारात म्हणता येत नसून त्या मिळालेल्या माहितीच्या संदर्भातून त्या त्या व्यवहारामध्ये झालेला गैरव्यवहार दिसून येतो व त्याबाबत आयोगाकडे तक्रार न

करता ही अपीलकर्ता यांनी संबंधित प्राधिकरणाच्या संबंधित अधिका–याकडे तक्रार त्यांना करावी लागेल. सदरची माहिती विलंबाने देण्याच्या संदर्भामध्ये माहिती अधिकारी यांनी ज्यांची माहिती संकलित करण्याकरीता सहाय घेण्यात आले असेल त्यांचेबाबत माहिती उशिरा देण्याच्या संदर्भात जबाबदारी निश्चित ठरवून माहितीचा अधिकार अधिनियम कलम 5 (5) प्रमाणे माहिती अधिकारी समजण्यात यावे व त्याप्रमाणे शास्तीची कारवाई करता यईल.

## नि र्ण य

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून माहिती संकलीत करण्यास ज्या अधिकारी किंवा कर्मचारी यांचे सहाय माहिती अधिकारी यांनी घेतले असेल व त्यांनी विलंब केलेला असेल त्यांच्या वर जबाबदारी निश्चित करुन त्यांना माहिती अधिकारी कलम 5 (5) प्रमाणे समजुन त्यांना लागू असलेल्या सेवा नियमाप्रमाणे अधिनियमाच्या कलम 20 (2) प्रमाणे त्यांची विभागीय चौकशी करण्यात यावी व त्याप्रमाणे अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
दिनांक 19.7.2007

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 232/2007.**

श्री सत्तार खान अब्बास खान
रा. पांडे महाल समोर, भंडारा
ता. जि. भंडारा ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपआयुक्त (सा.प्र.) प्रादेशिक संचालक,
नगर पालिका प्रशासन, नागपूर विभाग, नागपूर.

2) जन माहिती अधिकारी तथा
मुख्याधिकारी, नगर परिषद भंडारा ..... **उत्तरवादी**

**<u>वि वे च न</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक 18/1/2007 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 21.7.2006 रोजी माहिती मागण्यासाठी अर्ज केला होता. सदरच्या अर्जामध्ये त्यांनी 11 मुद्यांवर माहिती मागितली होती. सदरच्या 11 मुद्यामध्ये मागितलेला कालावधी हा 1977 ते 2006 हा आहे. सदरच्या मुद्याची तपासणी केली असता सदरच्या मुद्यामध्ये माहिती मागितलेली दिसून येते. व त्याप्रमाणे त्या अर्जाच्या संदर्भामध्ये उत्तरे देण्यात आलेली आहे. सदरची माहिती विहित मुदतीत न मिळाल्यामुळे

अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील दि. 13.9.2006 रोजी दाखल केले होते. सदरच्या प्रथम अपीलामध्ये अपीलकर्ता यांनी (1) खोटया प्रमाणपत्राचा शोध घेणे (2) शासकीय निधीची अफरातफर (3) अवैध नोकरभरती (4) आर्थिक गुन्हा व निष्काळजीपणा एवढे अपील करण्याचे कारणे दिलेली आहेत. तसेच दि. 21.7.2006 च्या अर्जाप्रमाणे माहिती अप्राप्त म्हणून दिलेली आहे. सदरच्या प्रथम अपीलाची सुनावणी दि. 20.10.2006 रोजी घेण्यात आली. प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान माहिती दिली असा उल्लेख आला आहे. परंतु प्राप्त झालेल्या अपीलाबाबत अपीलार्थी समाधानकारक नसल्याबाबत सांगितल्यामुळे 7 दिवसाच्या आत बिनचुक माहिती देण्यात यावी असा निर्णय घेण्यात आलेला आहे. तसेच अभिलेखाचे इन्स्पेक्शन घ्यावे असाही आदेश देण्यात आला होता त्याप्रमाणे दि. 6.11.2006 रोजी अभिलेखाचे इन्स्पेक्शन घेण्या करीता अपीलकर्ता यांनी माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज केलेला दिसून येतो. त्याप्रमाणे दि. 24.11.206 रोजी इन्स्पेक्शन घेण्यास परवानगी देण्यात येत आहे व प्रशासन अधिकारी नगर परिषद भंडारा यांचेसोबत शाळेत माहिती पाहण्याकरीता यावे प्राचार्य आपणास रेकॉर्ड केव्हाही दाखविण्यास तयार आहे असे कळविलेले होते परंतु सदरचे पत्र हे अपीलकर्ता यांनी न घेतल्यामुळे त्यांना रजिस्टर डाकेने सदरचे पत्र पाठविण्यात आलेले आहे त्याचा पुरावा दाखल केलेला आहे अपीलकर्ता यांनी आदेशाप्रमाणे इन्स्पेक्शन घेतलेले दिसून येत नाही. तरीसुध्दा त्यांनी सदरचे द्वितीय अपील सादर केलेले आहे.

3. सदरच्या द्वितीय अपीलामध्ये (1) खोटया प्रमाणपत्राचा शोध घेणे (2) शासकीय निधीची अफरातफर (3) अवैध नोकरभरती (4) आर्थिक गुन्हा मागणीनुसार माहिती व ज्या अभिलेखाच्या प्रती आवश्यक आहे त्या आदेश मिळाल्यापासून 7 दिवसाचे आंत बिनचुक द्यावी असे नमुद केले पण मात्र त्यांनी दि. 18.9.2006 रोजी माहिती मिळालेली

आहे याबाबतचा उल्लेख त्यांनी न करता एकुण 55 दिवस होवूनही माहिती पुरविण्यात आली नाही असे नमुद करुन माहिती अधिकारी यांना दंडित करावे व असत्य व अपूर्ण माहिती पुरवल्याच्या पासून आतापर्यंत रु. 250/- प्रमाणे त्यांचेविरुध्द दंड आकारावा अशी विनंती केलेली आहे.

4. अपीलकर्ता यांचे माहिती देण्याच्या अर्जाचे संदर्भात माहिती अधिकारी यांनी दिनांक 21.7.2006 रोजी माहिती देण्याच्या संदर्भात आदेश प्राप्त करुन दि. 29.8.2006 रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी असे पत्र प्राचार्य मौलाना अब्दुल कलाम आझाद उर्दू हायस्कुल नगर परिषद भंडारा यांना दिलेले आहे. दि. 11.9.2006 रोजी प्राचार्य मौलाना अब्दुल कलाम आझाद उर्दू हायस्कुल यांनी सदरची माहिती वेळेत तयार होणे शक्य नसल्यामुळे पुन्हा 15 दिवसाची मुदत वाढवण्यात यावी अशी विनंती माहिती अधिकारी यांना केलेली आहे. व त्यावरुन माहिती देण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो परंतु माहितीचा कालावधी हा 1977 ते 2000 असल्यामुळे सदरच्या माहितीस विलंब झालेला दिसून येतो. मिळालेली माहितीच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांनी कोणत्याही प्रकारचा उल्लेख हा वर नमुद केल्याप्रमाणे द्वितीय अपीलात केलेला नाही. उपस्थित केलेले मुद्दे हे मोघम आहेत त्यावरुन मिळालेली माहिती ही अपूर्ण किंवा चुकीची असा निष्कर्ष काढता येत नाही त्याकरीता माहितीच्या अधिकाराचा अर्ज सुध्दा तपासला त्यातून बहुतांश मुद्दे हे मोघम आहेत त्यामुळे कोणत्याही प्रकारे माहिती चुकीची आहे किंवा अपूरी आहे किंवा मिळालेली नाही हे तपासता येत नाही. तसेच अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलात इन्स्पेक्शन करण्याचे आदेश देवून सुध्दा त्यांनी इन्स्पेक्शन घेतलेले नाही असे सांगितले व त्यामुळे सदरच्या द्वितीय अपीलाच्या संदर्भात निर्णय देतांना वरील सर्व मुद्यांचा विचार केला असता सदरचे अपील हे माहितीच्या कालावधीचा विचार केल्यास विलंबाने माहिती मिळालेली असल्यामुळे ते फेटाळण्यास पात्र आहे. माहितीच्या

अधिकारात माहिती विचारतांना अर्जदारानेसुध्दा ती काटेकोर व मुद्येसुद विचारली पाहिजे मोघम माहिती विचारुन पुन्हा माहिती मिळण्यास विलंब झाला अशी तक्रार करणे योग्य नाही. एकुण माहितीचा कालावधी व मोघम माहिती याची सांगड घातल्यास माहिती विहित मुदतीत देणे शक्य होत नाही. याची अपीलकर्ता यांनी सुध्दा नोंद घेणे आवश्यक आहे.

**<u>नि र्ण य</u>**

1) अपीलकर्ता हयांचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 19.7.2007

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 235/2007.**

सौ. चंद्रकला गुलाबराव बिडवाईक
रा. नवनीत नगर पो. वाडी
ता. जि. नागपूर. ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपिलीय अधिकारी तथा
अतिरिक्त जिल्हाधिकारी नागपूर
2) जन माहिती अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी, नागपूर
3) तहसिलदार, हिंगणा ..... **उत्तरवादी**

<u>वि वे च न</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक 6/1/2007 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 10.4.2006 रोजी माहिती मागण्याचा अर्ज जिल्हाधिकारी नागपूर येथे केला आहे. त्यात 1) मौजा वडधामना तह. हिंगणा ला त्यांच्या घरासमोरील अतिक्रमण काढण्यात आले नाही. 2) दि. 24.5.2005 व 6.6.2005 च्या अर्जानुसार हे अतिक्रमाण केव्हापर्यंत काढण्यात येईल अशी माहिती विचारलेली होती. सदरच्या अर्जानुसार विहित मुदतीत कोणत्याही प्रकारची माहिती दिलेली नसल्यामुळे दिनांक

22.5.2006 रोजी प्रथम अपील दाखल केले आहेत ते तहसिलदार, तहसिल कार्यालय हिंगणा यांचेकडे दाखल केले. सदरच्या माहितीच्या अधिकाराच्या अर्जाच्या अनुषंगाने तहसिलदार हिंगणा, उपविभागीय अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर, अतिरिक्त जिल्हाधिकारी नागपूर त्यानंतर सचिव ग्रामपंचायत वडधामना यांच्यामध्ये जवळ जवळ सहा सात महिन्याचा पत्रव्यवहार झालेला दिसत आहे. असे असले तरी दि. 3 जुलै 2006 रोजी अपीलकर्ता यांना तहसीलदार हिंगणा यांनी अर्जासंबंधीची कार्यवाहीची दिलेली दिसून येते. सदरची माहिती देतांना अर्जदाराचा मुळ अर्ज हा दि. 18 जुन 2006 ला ग्रामपंचायत वडधामना यांचेकडे पाठवलेला आहे व त्यांचेकडून अहवाल कार्यालयात प्राप्त झाला नाही म्हणून त्यांना स्मरणपत्र देण्यात आले. तसेच मौजा वडधामना येथील शेत सर्व्हे नं. 104 मध्ये अनधिकृत रित्या पाडलेल्या खाजगी लेआउटमध्ये आपण प्लॉट क्र. 9 घेतलेला असून त्यांचेबाबत नोंदणीकृत दस्तऐवज घेतलेले आहेत. सदर अतिक्रमण अनधिकृत खाजगी लेआउटमध्ये असल्यामुळे ग्रामपंचायत वडधामना यांना दि. 18 जुन 2005 नुसार रितसर कळवण्यात आले असून त्यांचा अहवाल अजुन प्राप्त झालेला नाही त्यामुळे त्यांना स्मरणपत्रे देण्यात आले असून आपण स्वतः ग्रामपंचायत वडधामना कार्यालयाशी संपर्क करावा व अतिक्रमण काढण्याबाबत विचारणा करावी. सदरचे उत्तर दिल्यानंतर पुन्हा वर नमुद केल्याप्रमाणे पत्रव्यवहार झालेला दिसून येतो पुन्हा 29.8.2006 रोजी जिल्हाधिकारी नागपूर यांचेकडे प्रथम अपील केलेले दिसून येते. एवढा सर्व पत्रव्यवहार होवून सुध्दा कारवाई झालेली नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी चुकीचे उत्तर दिल्यामुळे सदरचे द्वितीय अपील सादर केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलामध्ये सुध्दा दि. 6.10.2006 च्या आदेशाचा उल्लेख केला आहे.

3. अपीलकर्ता यांनी माहितीचा अर्ज सादर केला आहे त्यामध्ये त्यांना पूर्वीच्या अर्जाच्या संदर्भात फक्त तारखा दिलेल्या आहेत व त्यावर कार्यवाही काय झाली याबद्यलची माहिती जिल्हाधिकारी नागपूर यांना मागितलेली आहे. ज्या अर्जाच्या संदर्भात तारखा दिलेल्या आहेत ते अर्ज तपासून पाहिले असता ''तहसिलदार, पंचायत समिती नागपूर अशाप्रकारे संबोधित केलेले आहेत. माहिती मात्र जिल्हाधिकारी स्तरावर मागितलेली आहे. कार्यवाही करावयाची आहे ती ग्रामपंचायतच्या कक्षेत. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या प्रमाणे प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाच्या त्या त्या कार्यालयाच्या कक्षेतील माहिती उपलब्ध करुन घेण्याकरीता माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी नियुक्त झालेले आहेत. व त्या माहिती अधिका–याच्या कक्षेतील माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता 30 दिवसाची विहित मुदत दिलेली आहे. परंतु अर्ज एका कार्यालयात द्यावयाचा माहिती तिस–याच कार्यालयात मागावयाची त्यामुळे कोणत्याही प्रकारे माहिती ही 30 दिवसाच्या मुदतीत मिळणे शक्य नाही. असा अर्ज देवून सुध्दा माहिती मुदतीत मिळाली नाही किंवा चुकीचे उत्तर दिले अशी तक्रार करणे हे माहितीच्या अधिकाराच्या अधिनियमामध्ये अपेक्षीत नाही. माहितीच्या अधिकारामध्ये ज्या सार्वजनिक प्राधिकरणामध्ये अर्ज केला त्या तारखेस माहिती उपलब्ध असेल त्या स्वरुपात ती माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षीत आहे. माहितीच्या अधिकाराचा अर्ज आल्यानंतर त्या अर्जा विचारलेल्या अर्जाच्या कार्यवाहीबद्यल माहिती विचारली असल्यास ज्या करणाकरीता केलेला आहे ती कारवाई सुरु करुन माहिती देणे अपेक्षीत नाही. ज्या स्थितीमध्ये माहिती असेल त्या परिस्थितीत ती उपलब्ध करुन देणे एवढेच अपेक्षीत आहे. व त्यामुळे माहितीचा अर्ज आल्यानंतर तहसिलदार, अतिरिक्त जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, सचिव ग्रामपंचायत या सर्वांनी मिळुन जो पत्रव्यवहार केलेला आहे तो दिशाहीन आहे. माहितीच्या अधिकारात तिनच टप्पे आहेत. माहिती अधिका–यानी 30 दिवसात माहिती देणे. विहीत मुदतीत माहिती दिली नसल्यास प्रथम

अपील करणे व त्या निर्णयावर आयोगाकडे द्वितीय अपील सादर करणे. संपूर्ण प्रकरणामध्ये ग्रामअधिकारी वडधामना यांनी जे तहसिलदार यांना पत्र दिलेले दिसून येते ती वस्तुस्थिती आहे. व त्याचा मात्र कोणत्याही अधिका–यानी उत्तर देतांना विचार केलेला दिसून येत नाही. अन्यथा पुढिल एवढा पत्रव्यवहार करण्याची आवश्यकता नव्हती. वर नमुद केल्याप्रमाणे सर्व पत्रव्यवहार होवूनसुध्दा अपीलकर्ता यास अपेक्षीत असलेली कारवाई झाल्याचे दिसून येत नाही. तसेच अपीलकर्ता यांचे म्हणण्याप्रमाणे चुकीची माहिती दिली आहे असे गृहीत धरले तर माहितीच्या अधिकारामध्ये कोणत्याही मुळ प्रश्नाच्या बाबत कारवाईची अपेक्षा नाही. प्रश्न राहिला तो विहित मुदतीत माहिती देण्याचा वर नमुद केल्याप्रमाणे अर्जदारानी सुध्दा अर्जाच्या संदर्भात सुस्पष्ट असे संदर्भ दिले नसल्यामुळे व संबंधित माहिती अधिकारी यांचेकडे माहितीचा अर्ज सादर न केल्यामुळे विहित मुदतीत दिली गेलेली दिसत नाही. त्यामुळे विलंबाचा मुद्दा निकालात निघतो. परंतु दि. 3 जुलै 2006 च्या उत्तराप्रमाणे दि. 24.5.2005 व दि. 6.10.2005 च्या अर्जाच्या संदर्भात झालेल्या कारवाईची माहिती देण्यात आलेली आहे. व तीच माहिती ही माहितीच्या अधिकाराच्या अर्जाच्या संदर्भात अपेक्षीत आहे. त्यामुळे सदरचे अपील हे फेटाळण्यास पात्र आहे.

## <u>नि र्ण य</u>

1) अपीलकर्ता यांना माहिती मिळालेली असल्यामुळे सदरचे अपील हे फेटाळण्यात येत आहे.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 20.7.2007

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे तक्रार क्रमांक 18/2007.**

श्री सुहास जयकृष्ण नांदुरकर

रा. राम मंदीर वार्ड, कारंजा चौक, हिंगणघाट

ता. हिंगणघाट जि. वर्धा ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) जन माहिती अधिकारी तथा

उपव्यवस्थापक (प्रशासन)

महाराष्ट्र राज्य सह. कापूस उत्पादक पणन महासंघ मर्या.

प्रधान कार्यालय, कॉटन कॉम्पलेक्स,

अजनी चौक, वर्धा रोड, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**<u>वि वे च न</u>**

तक्रारकर्ता यांनी दिनांक 2/6/2006 रोजी माहिती आयुक्त यांचेकडे अर्ज करुन तक्रार दाखल केलेली आहे. सदरच्या तक्रारीत दि. 3.1.2006 ला केलेल्या अर्जावर दिलेले चुकीचे पत्र क्र. (1) 247/3350/एनजीपी/31/2/2006 (2) एनजीपी/3345/222–2006 (3) एनजीपी/05–06/297/3926 दि. 23.3.2006 असा पत्रांचा संदर्भ देवून चुकीचे उत्तर दिलेले आहे. तक्रार अर्जामध्ये ''नियुक्त हंगामी रोजंदारी पहारेकरी म्हणून 2003 पासून कुठलीही पुर्वसुचना व बदलांची लेखी सुचना न देता सरव्यवस्थापक प्रधान कार्यालय नागपूर यांचे मार्फत कामावर घेण्याचे नाकारण्यात आल, काही पाहारेक–यांना नियुक्ती देण्यात आली व काही पाहारेक–यांना नियुक्ती देण्यात आली नाही त्याबाबतीमध्ये महासंघाचे धोरण सन 2003 पासून काय आहे याबद्यलची माहिती विचारलेली होती. व ती चुकीची दिलेली आहे म्हणून सदरची तक्रार आयोगाकडे दाखल करण्यात आलेली आहे.

2. सदरच्या तक्रारीची चौकशी आज रोजी घेण्यात आली. तक्रारदार हजर आहे. गैरतक्रारदार हजर आहेत.

3. तक्रारदाराच्या दि. 3.1.2006 व 9/16.3.2006 च्या अर्जाच्या अनुषंगाने दिनांक 23.3.2006 रोजी'' महासंघाने तक्रारदाराच्या अर्जानुसार महासंघाच्या कामकाज आऊटसोर्सिंग पध्दतीद्वारे करुन घ्यावे असे शासनाचे पत्र क्र. 225/1–स दिनांक 10.10.2005 सलग्न करीत आहोत. महासंघाचे धोरण हे शासनाच्या परवानगीने ठरलेले असून त्यानुसार कार्यवाही सुरु आहे असे कळविलेले आहे. सदरच्या पत्राच्या अनुषंगाने तक्रारदार यांनी तक्रार वर नमुद केल्याप्रमाणे केलेली आहे. तक्रारदार यांचे म्हणणे असे आहे की त्यांना 202–2003 च्या हंगामापासून कमी करण्यात आलेले असल्यामुळे तेव्हा पासून शासनाचे काय धोरण आहे किंवा महासंघाचे काय धोरण आहे याबद्यल माहिती विचारलेली असून माहिती मात्र फक्त 2005 या वर्षाच्या संदर्भात दिलेली आहे. तसेच विभागीय सेवेत असलेल्यांना डावलून केलेल्या बेकायदेशीर सेवा भरतीबाबत असलेले शासनाचे आदेश पणन महासंघाचे धोरण याबद्यल सुध्दा माहिती विचारलेली नाही.

4. पणन महासंघाने सदरच्या तक्रारीच्या संदर्भामध्ये कागदपत्रे दाखल केलेली आहेत. तक्रारदारानी सुध्दा खुलासा व कागदपत्रे दाखल केलेली आहेत परंतु त्या सर्व कागदपत्रांचा माहितीच्या अधिकाराच्या तरतुदींच्या अंतर्गत येत नाही. वर नमुद केल्याप्रमाणे दोनच महत्वाची माहिती ही पणन महासंघानी त्यांना द्यावयाची आहे. ''1) सन 2002–2003 पासून नियीमत हंगामी रोजंदारी पहारेकरी यांचे नियुक्ती बद्यलची पणन महासंघाचे व शासनाचे धोरण काय होते. 2) विभागीय सेवेत असलेल्यांना डावलून केलेल्या बेकायदेशीर भरतीबाबत असलेले शासनाचे आदेश व पणन महासंघाचे धोरण'' ही माहिती निर्णय मिळाल्याच्या 1 आठवडयात तक्रारदार यांना सदरची माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी. 1) तक्रार मान्य करण्यात येत आहे.

2) निर्णयाची एक प्रत प्रत्येकी तक्रारदार व गैरतक्रारदार यांना देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 20.7.2007

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 238/2007.**

श्री विलास वामनराव लोहोटे
बी–3/112, बजरंग कॉम्प्लेक्स,
सिरसपेठ, नागपूर – 9 ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विशेष पोलीस महानिरीक्षक,
ॲन्टी करप्शन ब्युरो, महा. राज्य, मुंबई
मधु इंडस्ट्रियल इस्टेट, पहिला मजला, पांडुरंग बुधकर मार्ग,
वरळी, मुंबई – 13.

2) जन माहिती अधिकारी तथा
पोलीस उपआयुक्त/पोलीस अधिक्षक,
ॲन्टी करप्शन ब्युरो, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**<u>वि वे च न</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक 2/1/2007 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी गैरहजर आहेत.

2. अतिरिक्त अधिक्षक श्री बेले हे हजर आहेत. अपीलकर्ता यांनी दि. 6.11.2006

रोजी माहिती अधिकारी यांचेकडे त्यांचे अनुपस्थितीमुळे एकुण 10400 जप्त केलेल्या कागदपत्रांपैकी 2348 कागदपत्रेच सद्यपरिस्थितीमध्ये रेकॉर्डवर असल्याचे दिसते. बाकी कागदपत्रे तपासाच्या दृष्टीने महत्वाचे नसतील तरी (10400–2348=8052) ही कागदपत्रे कार्यालयात येवून वापस घेवून देण्याची अनुमती देण्यात यावी यापैकी काही कागदपत्रे आपण ठेवन घ्यावी व त्याची छायांकित सत्यप्रती देण्यात यावी. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 28.11.2006 रोजी माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांचेविरुध्द न्यायालयामधे दोषारोपपत्र दाखल करण्यात आलेले नसल्यामुळे खटला दाखल करण्याच्या शासनाच्या बाजुवर विपरीत परिणाम होण्याची शक्यता विचारात घेता संदर्भाकित अर्जात ज्या कागदपत्रांची मागणी केलेली आहे अशी कागदपत्रे सद्या तरी पुरवणे योग्य होणार नाही त्यामुळे अर्जातील विनंती माहितीचा अधिकार अधिनियम 2005 मधील कलम 8 (ज) नुसार फेटाळण्यात येत आहे. तसेच दोषारोपपत्र दाखल केल्यानंतर कागदपत्राच्या सांक्षांकीत प्रति अनुक्रमणिकाप्रमाणे पुरविण्यात येतील असे कळविले होते. सदरच्या निर्णयाने व्यथित होवून अपीलकर्ता यांनी दि. 11.12.2006 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येत आहे. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय कायम करुन अपील फेटाळण्यात आलेले होते. सदरच्या निर्णयानी व्यथित होवून द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलाच्या चौकशीस वर नमुद केल्याप्रमाणे प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर नाहीत व त्यांनी कोणत्याही प्रकारे गैरहजर राहण्याकरीता अनुमती मागण्याचा अर्जसुध्दा केलेला नाही. हा आयोगाचा अवमान आहे. आयोगापुढे चौकशीस हजर राहावयाचे किंवा नाही याबाबत त्यांनी तपासून पाहावे. मागील एका अपीलामध्ये सुध्दा ॲटी करप्शन ब्युरोचे कोणतेही प्रतिनिधी हजर झालेले नव्हते. आयोगाचे अधिकारी व आयुक्तांना

दिलेला दर्जा याबाबत विशेष पोलीस महानिरीक्षक ॲंटी करप्शन ब्युरो हे एकतर अनभिज्ञ तरी असावेत किंवा आयोगापुढे हजर राहण्याचे त्यांना कमीपणाचे वाटत असावे. माहिती अधिकारी सुध्दा हजर नाहीत. अतिरिक्त पोलीस अधिक्षक श्रीयुत बेले यांनी तोंडी असे सांगितले की माहिती अधिकारी तथा पोलीस अधिक्षक हे प्रकृतीच्या कारणास्तव हजर राहू शकत नाही परंतु लेखी कोणताही अर्ज त्याबाबत दिलेला नाही. श्रीयुत बेले माहितीचा अधिकार 2005 च्या अंतर्गत नियुक्त झालेले अधिकारी नाहीत. त्यामुळे सदरच्या सुनावणीच्या वेळेस माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत हेच गृहीत धरावे लागते. याबाबतची दखल प्रधान सचिव, गृह विभाग यांनी घेणे आवश्यक आहे.

4. अपीलकर्ता यांनी जी कागदपत्रे परत मागीतलेली आहेत व त्याकरीता जे कारण प्रथम अपीलीय अधिकारी व माहिती अधिकारी यांनी दिलेले आहे ते दि. 15.12.2006 पर्यंत संयुक्तीक होते. परंतु अपीलकर्ता यांच्या विरुध्द अपीलकर्ता यांनी सांगितल्याप्रमाणे दोषारोपपत्र दि. 14.2.2007 रोजी गोंदिया सत्र न्यायालयात दाखल झालेले असल्यामुळे व त्यास श्रीयुत बेले यांनी त्यांचे माहितीप्रमाणे दोषारोपपत्र दाखल झाले आहे अशी पुष्टी दिल्याने व दोषारोपपत्रा बरोबर काही कागदपत्रे दाखल झालेली आहेत. ती अपीलकर्ता यांना मिळतील परंतु जी कागदपत्रे दाखल झालेली नाहीत ती कार्यालयात उपलब्ध आहे. व तीच नेमकी कागदपत्रे अपीलकर्ता यांनी परत मागीतलेली आहे. सदरची कागदपत्रे दोषारोपपत्र दाखल करुन 4 महिने झालेले असल्यामुळे आता परत करण्यास हरकत आहे काय असे श्रीयुत बेले यांना विचारले असता सदरची कागदपत्रे परत करण्यास हरकत नाही त्यांना परत करता येतील. त्यामुळे अपीलकर्ता यांनी सदरच्या कागदपत्राच्या संदर्भात इन्स्पेक्शन घेवून त्या कागदपत्राचा तपशिल माहिती अधिकारी यांना देवून त्यातील किंवा खटल्याच्या दृष्टीने

आवश्यक असतील त्या कागदपत्राच्या झेरॉक्स प्रती उपलब्ध करुन देणे संयुक्तीक होईल व त्या झेरॉक्स प्रतींचा खर्च मात्र अपीलकर्ता यांनी देणे हे नियमानुसार संयुक्तिक होईल. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी भंडारा येथील डि.वाय.एस.पी. ॲंटी करप्शन कार्यालयामध्ये प्रत्यक्ष जावून त्याबाबतचे इन्स्पेक्शन घेवून व 2 रु. प्रमाणे खर्च भरुन त्यांना कागदपत्रे उपलब्ध करुन घेणेस हरकत नसावी.

**नि र्ण य**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी भंडारा येथील उप अधिक्षक ॲंटी करप्शन यांचे कार्यालयात दि. 31.7.2007 रोजी कार्यालयीन वेळेत उपस्थित होवून कागदपत्रांचे इन्स्पेक्शन घ्यावे व उत्तरवादी यांना कागदपत्राचे तपशील देवून झेरॉक्स प्रती किंवा जी आवश्यक असतील ती कागदपत्रे उपलब्ध करुन घ्यावी व उत्तरवादी यांनी त्यांना ती द्यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
दिनांक 21.7.2007

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 239/2007.**

श्री भामा बबनलाल चु–हे
रा. नवेगाव बांध
ता. अर्जुनी मोर. जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
जि. प. सार्वजनिक बांधकाम विभाग, गोंदिया
ता. जि. गोंदिया

2) जन माहिती अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
जि.प. सार्वजनिक बांधकाम, उपविभाग आमगाव
ता. आमगाव जि. गोंदिया ..... **उत्तरवादी**

<u>वि वे च न</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक 12/1/2007 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 21.7.2006 रोजी उपविभागीय अधिकारी जि. प. सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडे नवेगाव बांध राष्ट्रीय उद्यानातील कोकणा ते कौलेवाडा

कंपार्टमेंट नं. 5 नविन तयार करण्यात आलेल्या रस्त्याबाबत, कालावधी सन 2005 ते 2006, कोकणा ते कौलेवाडा नविन तयार करण्यात आलेल्या रस्त्याचे मातीकाम, खडीकरण व डांबरीकरण हे कोणत्या योजने अंतर्गत तयार करण्यात आले, या कामावर झालेल्या खर्चाचा तपशील, वन व पर्यावरण मंत्रालय नवी दिल्लीची परवानगी घेण्यात आली होती काय असल्यास मंजुरीची झेरॉक्स प्रत पाठविण्यात यावी. माहिती ही नोंदणीकृत टपाला द्वारे किंवा व्यक्तीशः घेण्यात येईल असे नमुद करुन माहिती मागितलेली आहे. सदरची माहिती अपीलकर्ता यांना न मिळाल्यामुळे त्यांनी दि. 28.8. 2006 रोजी प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले होते. प्रथम अपीलामध्ये ज्या आदेशाविरुध्द अपील केले आहे त्या आदेशाची सत्यप्रत जोडली आहे असे नमुद केले असून माहितीचा तपशील म्हणून नवेगाव बांध या उद्यानातील कोकणा ते कौलेवाडा कंपार्टमेंट नं. 5 मधे नविन तयार करण्यात आलेल्या रस्त्याबाबत मातीकाम, खडीकरण व डांबरीकरण कोणत्या शिर्षकाअंतर्गत (योजने अंतर्गत) तयार करण्यात आले असे नमुद करुन माहिती मागीतलेली दिसून येते. सदरच्या अपीलाच्या संदर्भात दिनांक 4.9.2006 रोजी कार्यकारी अभियंता जि. प. सार्वजनिक बांधकाम विभाग गोंदिया यांनी ''कोकणा कौलेवाडा रस्ता हा अस्तित्वातील इजिमा रस्ता आहे. हा रस्ता केंद्र शासनाने प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेत मंजुर केला. सदर रस्ता हा टोपोशीटवर क्र. 64/सी वर इजिमा दर्जाचा रस्ता असल्यामुळे यावर खडीकरण करण्यात आले. 2001–2002 योजने प्रमाणे इजिमा असल्यामुळे परवानगी घेतली नाही सदर कामावर रु. 34.23 लाख खर्च झालेला आहे असे कळविले आहे. सदरच्या निर्णयाने व्यथीत होवून अपीलकर्ता यांनी सदरचे द्वितीय अपील दाखल केले आहे. द्वितीय अपीलासोबत सदरच्या कामकाजाच्या संदर्भात स्पष्टीकरण जोडले आहे व विसंगती दाखविण्या करीता उपविभागीय अधिकारी सार्वजनिक बांधकाम उपविभाग देवरी यांचे दि. 31.7.2006 चे पत्र जोडलेले आहे.

सदरच्या पत्रामध्ये कालीमाती ते कौलेवाडा या रस्त्याच्या संदर्भात माहिती देण्यात आलेली दिसून येते. तसेच अपीलकर्ता यांनी नकाशाची झेरॉक्स प्रतीसुध्दा जोडलेल्या आहेत.

3. या संपूर्ण प्रकरणातून असे दिसून येते की दि. 21.7.2006 ला अपीलकर्ता यांनी दोन अर्ज केलेले होते. एक अर्ज हा उपविभागीय अधिकारी देवरी यांना कालीमाती ते कौलेवाडा या रस्त्याच्या बद्यल माहिती मागितली होती. व त्याबद्यलची माहिती त्यांना दि. 31.7.2006 रोजी देण्यात आलेली आहे व त्या अर्जाची प्रत न जोडता फक्त उत्तर जोडलेले आहे. व दुसरा अर्ज त्याच तारखेस कोकणा ते कौलेवाडा रस्त्याबाबत माहिती मागितली अधिक्षक अभियंता जि. प. यांचेकडे केलेला होता असे त्यांचे स्पष्टिकरणा वरुन दिसते. कोकणा ते कौलेवाडा या रस्त्याबद्यलची माहिती त्यांना दि. 28.8.06 च्या प्रथम अपीलाप्रमाणे दि. 4.9.2006 ला देण्यात आलेली आहे. अपीलकर्ता यांनी दाखल केलेल्या नकाशावरुन असे दिसून येते की कालीमाती ते कौलेवाडा व कोकणा ते कौलेवाडा हे दोनही रस्ते वेगवेगळे आहेत. व दोनही रस्त्याची त्यांना वेगवेगळी माहिती मिळालेली आहे. मिळालेल्या माहिती वरुन त्यांची तक्रार अशी दिसून येते की वन्यजिव विभाग मुख्य वन संरक्षक नागपूर कार्यालय किंवा नवेगाव बांध राष्टिय उद्यानाच्या नकाशावर कालीमाती ते कौलेवाडा हा 2 कि. मी. चा रस्ता आहे व कौलेवाडा ते राष्टीय उद्यानाची सिमा कंपार्टमेंट नं. 5 असून 4 किं.मी. मधे उभा जंगल होता पण राष्टीय उद्यानामधे कौलेवाडा ते कोकणा हया रस्त्यामध्ये इजिमा कोठून आला. व एकाच तारखेच्या वेगवेगळया रस्त्यांची माहिती मागणा–या दोन अर्जापैकी एक अर्जाची प्रत दाखल न करता उत्तर दाखल केलेले आहे. दुस–या अर्जाची प्रत दाखल करुन उत्तर दाखल केलेले नाही व चुकीची दिशाभूल माहिती दिली असे भासवण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु सदरच्या प्रश्नाचे उत्तर माहिती अधिकाराच्या संदर्भात देता येणार नाही.

माहितीच्या अधिकारामध्ये अभिलेखाच्या स्वरुपात, नकाशाच्या स्वरुपात असलेली माहिती उपलब्ध करुन देता येते. अपीलकर्ता यांची जी तक्रार आहे ती मिळालेल्या माहितीच्या आधारे त्यांना संबंधित योग्य त्या प्राधिकरणाकडे करावी लागेल. राज्य माहिती आयोगास सदरच्या तक्रारीच्या सोडवणूकीबाबत कोणताही अधिकार नाही.

4. अपीलकर्ता यांनी पुन्हा असे सांगितले की त्यांना कोकणा ते कौलेवाडा या रस्त्याच्या बाबत संपूर्ण सखोल माहिती पाहिजे खर्चाचा तपशील, नकाशाची प्रत तसे जरी माहितीच्या अधिकाराच्या अर्जात मागणी नसली तरी सुध्दा तपशीलात ही माहिती अधिकारी किंवा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी उपलब्ध करुन देणे संयुक्तीक होईल. नकाशा तयार करुन देणे अभिप्रत नाही.

## नि र्ण य

1) अपीलकर्ता यांना त्यांच्या माहितीच्या अधिकाराच्या अर्जातील माहिती मागितल्या प्रमाणे माहिती मिळाली असली तरी त्याना त्या संदर्भात संपूर्ण तपशीलात नकाशा च्या प्रती सहीत माहिती निर्णय मिळाल्यापासून उपलब्ध असल्यास 8 दिवसात विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 21.7.2007

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**From Vilas Patil State Information Commissioner, Nagpur.**

**Draft for approval of Commission in the Meeting**

**held on 27th July 2007**

## O R D E R

No. In pursuance of the provisions of Section 16 (5) (b) of the Right to Information Act, 2005 (No. 22 of 2005 ), the Maharashtra Chief Information Commissioner under section 15 (4) hereby makes the following order :-

1. This order may be called the State Information Commissioner (Terms and conditions) order 2005.
2. Definitions – In these rules, unless the context otherwise requires –
   - (a) "Act" means the Right to information Act, 2005 (22 of 2005);
   - (b) "Commissioner" means the State Information Commissioner
   - (c) appointed under Section 16 (3) of the Act
   - (d) "State Commission" means the Maharashtra State Information Commission constituted under Sub-Section (1) of section 15 of the Act;
   - (e) Words and expressions used in these rules and not defined, but defined in the Act, shall have the meaning respectively assigned to them in the Act.

3. Terms and Conditions of State Information Commissioner :-

The salaries and allowances payable to and other terms and conditions of service of the State Information Commissioner shall be the same that of the Chief Secretary to the State Government as laid down in section 16 (5) of the Act.

4. Leave :- A person on appointment as State Information Commissioner shall be entitled to leave as follows :-

i) earned leave ----------- days for every completed calander year of service or a part thereof.

ii) half pay leave on medical certificate or on private attairs --------- days, in support of each completed year of service and the leave salary for half pay leave shall be equivalent to half of the leave salary admissible during the earned leave.

iii) leave on half pay, can be commuted to full pay leave at the discretion of the Governor if it is taken on medical ground and is supported by a medical certificate from the competent authority,

iv) extraordinary leave without pay and allowances upto a maximum of oner hundred eighty day in one term of office.

(2) On the expiry of his term of office in the State Commission the State Information Commissioner shall be entitled to receive cash equivalent of leave salary in respect of earned leave standing to his his credit subject to the condition that the maximum leave

encashed under this sub-rule or at the time of retirement from the previous service, as the case may be, or taken together shall not in any case executed 240 days.

(3) The State Information Commissioner shall be entitled to receive dearness allowance as admissible on the leave salary under sub-rule (2) at the rates in force the date of relinquishment of their office in the State Commission.

(4) The State Information Commissioner shall be entitled to leave travel concession at the same rates and at the same scales and on the same conditions as are applicable to the Chief Secretary to the Government of Maharashtra;

5. Authority competent to grant leave – The power to grant or refuse leave to the State Information Commissioner and to revoke or curtail leave granted to him shall vest in the Governor.

6. Meeting allowance – State Information Commissioner from out stations attending the meeting of the Commission, shall be entitled to meeting allowance Rs. 600/- per meeting for one day.

7. Travelling allowance – The State Information Commissioner, while on Tour (including the journey undertaken to join the State Commission or on the expiry of his term with the State Commission to proceed to his home town) shall be entitle to –

(a) Travel allowances, allowances for transportation of personal effects and other similar matters at the same scales and the same rates as are admissible to the Chief Secretary to the State.

(b) Daily allowances at the same rates as are admissible to the Chief Secretary to State.

8. Right to subscribe to General Provident Fund - The conditions of service relating to provision of rent free accommodation, conveyance facilities, medical facilities, sumptury allowance and such other conditions of service as are, for the time being applicable to Chief Secretary shall so far as may apply to the State Information Commissioner.

9. Residuary provisions – The condition of service of this State Information Commissioner for which no express provision is made in this order shall be determined to the orders for the time being applicable to the Chief Secretary to the Government of Maharashtra belonging to Indian Administrative Service.

10. Administrative and disciplinary control over officers and employees – In the discharge of their functions under the Act, the

officers and employees referred to in section 16 (6) of the Act shall, while they are in the service of the State Commission, be subject to the exclusive administrative and disci;linary control of the State Information Commissioner.

( Dr. Suresh Joshi )
Chief Information Commissioner,
Maharashtra Information Commission.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 242/2007, 243/2007, 244/2007, 245/2007.**

श्री डॉ. नंदकुमार माधव ढवळे
रा. 6 अ, पवनसकर लेआउट, टोपेनगर,
अमरावती – 444 602. ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपिलीय अधिकारी तथा
प्राचार्य, ब्रिजलाल बियाणी महाविद्यालय,
अमरावती.

2) जन माहिती अधिकारी तथा
अधिक्षक, प्राचार्य, ब्रिजलाल बियाणी महाविद्यालय,
अमरावती – 444 605 ..... **उत्तरवादी**

<u>वि वे च न</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक 22/1/2007 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे 4 द्वितीय अपीले सादर केलेली आहेत. सदरच्या द्वितीय अपीलांची आज सुनावणी घेण्यात आली. अपीलकर्ता ॲडव्होकेट आर. आर. पांडे यांचे सहित हजर आहेत. उत्तरवादी गैरहजर असून त्यांचे तर्फे श्रीयुत व्हि. आर. चौधरी ॲडव्होकेट हायकोर्ट हे हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 30.8.2006 रोजी अपील क्र. 242, 243, व 244 त्यांच्या वेतनाच्या कपातीच्या सदर्भामध्ये पत्र क्र. एनएमडी/महा/संप/32551 दि. 2 फेब्रुवारी 1999 या पत्रातील प्राचार्यांनी घेतलेल्या निर्णयासंबंधातील अधिकाराच्या नियमाची

विचारणा केलेली असून आणि एलएमसीच्या किंवा एक्झुकिटिव्ह बॉडीच्या मिटिंगमध्ये निर्णय झाला असल्यास त्याची प्रत मागितली आहे. सदरच्या माहितीच्या अर्जाच्या संदर्भात दि. 19.9.2006 रोजी माहिती अधिकारी यांनी ''प्राचार्याचे आदेश हे स्वयंस्पष्ट आहे व त्याची आणखी प्रत आपणास पाहिजे असल्यास नियमानुसार त्याची फी रु. 12/– कार्यालयात भरणा करावा म्हणजे त्याची प्रत आणास देता येईल व अध्यादेश 24 कलम 33 प्रमाणे प्राचार्यांना प्राप्त अधिकाराचा वापर करुन हे आदेश निर्गमीत करण्यात आले आहेत'' असे कळविलेले आहे.

अपील क्र. 245/2007 मध्ये दि. 11.8.2006 रोजी माहिती विचारण्यासाठी अर्ज केलेला आहे. सदरच्या अर्जाच्या संदर्भात कोणत्याही प्रकारची माहिती माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत दिली नव्हती.

वर नमुद केलेल्या तिन अर्जाच्या संदर्भामध्ये दिलेल्या माहितीच्या मुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 10.10.2006, 10.10.2006, 14.10.2006 आणि 13.9.2006 रोजी अनुक्रमे प्रथम अपीले दाखल केली होती. पहिल्या तिन अर्जाच्या संदर्भातील प्रथम अपीलामध्ये माहिती अधिका–याचा तपशील हा चुकीचा दिलेला असल्यामुळे तांत्रिक कारणास्तव सदरची प्रथम अपीले ही प्रथम अपीलीय अधिकारी यांनी खारीज केलेली आहेत. दि. 11.8.2006 च्या अर्जाच्या संदर्भात दाखल केलेल्या प्रथम अपीलाचा निर्णय दि. 23.9.2006 रोजी देण्यात आला असून माहिती अधिकारी यांना मागणी प्रमाणे आदेशाची प्रत प्राप्त तातडीने व विनाशुल्क तिन कार्य दिवसात उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले आहेत. सदरच्या सर्वप्रथम अपीलांनी व्यथित होवून अपीलकर्ता यांनी सदरची 4 अपीले दाखल केलेली आहेत.

3. या चारही अपीलांच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांचे प्राचार्याच्या आदेशाप्रमाणे वेगवेगळया कारणांच्या अनुषंगाने वेतन कपात वेळोवेळी करण्यात आलेली आहे. सदरच्या

वेतन कपातीच्या संदर्भामध्ये प्राचार्याचा आदेश असल्यामुळे प्राचार्यांना अशा प्रकारचा शास्ती लादण्याचा अधिकार आहे काय हे जाणून घेण्यासाठी अपीलकर्ता यांना माहितीच्या अधिकाराच्या वरील अर्जामध्ये एलएमसी किंवा गव्हर्निंग बॉडी यांचा निर्णय किंवा आदेश आहे काय याबद्यलच्या निर्णयाची प्रत त्यांनी मागितलेली होती. परंतु त्यांना सदरच्या निर्णयाची प्रत न देता प्राचार्याच्या आदेशाच्या प्रती उपलब्ध करुन देता येतील व त्याकरीता रु. 12/– चा भरणा करावा असे सांगितले होते. त्याचप्रमाणे वेगवेगळया अर्जाच्या संदर्भात व अध्यादेश 24 कलम 33 प्रमाणे प्राचार्यानी प्राप्त अधिकाराचा वापर करुन हे आदेश निर्गमीत करण्यात आलेले आहे असे कळविलेले होते. अध्यादेश 24 मधील कलम 33 प्रमाणे प्राचार्यांना प्राप्त अधिकारांमध्ये शास्ती लावण्याचा अधिकार न दिसून आल्यामुळे व एलएमसी व गव्हर्निंग बॉडी ची आदेशाची प्रत न दिल्यामुळे त्यांनी प्रथम अपील सादर केलेले दिसून येतात. प्रथम अपीले ही तांत्रिक कारणावरुन खारीज करण्यात आलेले दिसून येतात. थोडकयात माहिती अधिकारी यांनी माहिती देतांना चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिलेली आहे. त्यामुळे माहिती अधिकारी हे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 प्रमाणे दोशी ठरतात. परंतु अपीलकर्ता यांना त्यांनी त्यांच्या अर्जामध्ये विचारलेली माहिती ही देण्यात येईल असे उत्तरवादी यांचे वकील यांनी मान्य केलेले आहेत. माहिती अधिकारी यांना शास्ती करण्याकरीता त्यांचे मुद्ये ऐकुन घेतले पाहिजे अशी तरतूद आहे. परंतु माहिती अधिकारी गैरहजर आहेत व त्यांचे वकील यांचे म्हणणे त्याबाबत एकून घेतले. त्यांनी कमीत कमी शास्ती लादावी अशी विनंती केली.

## <u>नि र्ण य</u>

1) अपीलकर्ता यांची चारही अपीले ही मंजुर करण्यात येत असून चारही अपीलांच्या संदर्भामध्ये त्यांनी केलेल्या माहितीच्या अर्जातील मुद्यांप्रमाणे त्यांना माहिती निर्णय मिळाल्यापासून 3 दिवसात उपलब्ध करुन देण्यात यावी.

2) जन माहिती अधिकारी यांनी चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिलेली असल्यामुळे त्यांना रु. 250/– ची शास्ती करण्यात येत आहे. सदरच्या शास्तीची रक्कम ही त्यांचे दरमहाच्या वेतनातून वसूल करण्यात यावी व वसूल केल्यानंतर राज्य माहिती आयोगास कळविण्यात यावे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 23.7.2007

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 247/2007.**

श्री संजय कुसाबराव रेहपाडे
रा. शांतीनगर, तकीया वार्ड,
नागपूर रोड, भंडारा ता. जि. भंडारा. ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपवनसंरक्षक, वन विभाग, भंडारा
ता. जि. भंडारा.

2) जन माहिती अधिकारी तथा
वनपरिक्षेत्राधिकारी, वन विभाग, भंडारा
ता. जि. भंडारा. ..... **उत्तरवादी**

**<u>वि वे च न</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक 23/1/2007 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांना नोटिस काढूनही गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्राधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी किंवा जन माहिती अधिकारी यांनी राज्य माहिती आयोगाच्या कार्यालयाने दि. 22.5.2007 रोजी सदरच्या अपीलाच्या सुनावणीसाठी कागदपत्रे दाखल करण्यासाठी व प्रत्यक्ष चौकशीसाठी दि. 22.5.2007 रोजी नोटिस काढली होती. परंतु प्रथम अपीलीय अधिकारी

व माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यास त्यांनी दाखल केलेल्या माहितीच्या अर्जासंदर्भात व प्रथम अपीलीय संदर्भात कोणत्याही प्रकारची माहिती दिल्या बद्यलचा खुलासा किंवा पुराव्यासाठी कागदपत्रे दाखल केले नाहीत. वास्तविक अपीलीय अधिकारी व माहिती अधिकारी यांने दोन महिन्याचा कालावधी हा सुनावणीसाठी, कागदपत्रे व चौकशीसाठी दिलेला आहे. आज प्रत्यक्ष चौकशीच्यावेळी सुध्दा जे जन माहिती अधिकारी आलेले आहेत त्यांनी आल्यावर सुध्दा कोणत्या प्रकारचे कागदपत्रे दाखल करावे लागते किंवा नाही याची माहितीही घेतली नाही आणि त्यांना कशाकरीता आलेलो आहोत याचीही काहीही कल्पना दिसून येत नाही. आजसुध्दा त्यांनी कोणतेही कागदपत्र दाखल करण्यासाठी किंवा माहिती दिल्याच्या खुलाशाकरीता दाखल करण्यासाठी आणलेले नाही. प्रथम अपीलीय अधिकारी हेसुध्दा गैरहजर असून गैरहजर राहण्यासाठी त्यांनी कोणत्याही प्रकारची अनुमती मागीतलेली नाही किंवा तसा अर्जसुध्दा दिलेला नाही. ‘‘माहितीचा अधिकार म्हणजे नेमके काय सामान्याच्या भाषेतील, उदाहरणासहीत शंका निरसन करणारी, मुळ कागदपत्रासह पहिले अधिकृत पुस्तक माहितीचा अधिकार अधिनियम 2005 ‘‘यशदाने‘‘ काढलेले पुस्तक पृष्ठ क्र. 30 वर माहिती आयुक्तांच्या अधिकाराबद्यल माहिती दिली आहे तसेच अर्जदाराने अपीलीय प्राधिकरणाच्या निर्णयाविरुध्द माहिती आयोगाकडे दुसरे अपील करावयाचे ठरवले, तर अपीलासाठी लागणारे सर्व कागदपत्रे अपीलीय अधिका–याने माहिती कार्यालयाला पुरवावयाचे आहेत असे लिहिलेले असले तरी त्याची माहिती शासकीय कार्यालयांमध्ये आहे असे दिसून येत नाही. आयोगाच्या पुढे गैरहजर राहणे किंवा कोणत्याही प्रकारे त्याची दखल न घेता हजर राहणे हा आयोगाचा अवमान आहे व त्याकरीता माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हे दोषी ठरतात.

2. अपीलकर्ता यांनी दि. 7.10.2006 रोजी माहिती मिळण्यासाठी 7 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. तसेच पुन्हा 18.10.2006 रोजी माहिती मागितली होती परंतु त्या अर्जाचा आता विचार केला जाणार नाही. माहिती अधिकारी यांनी माहिती विहित मुदतीत दिली नाही म्हणून दि. 21.11.2006 रोजी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दाखल केलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यास माहिती मिळाली नाही म्हणून व प्रथम अपीलाचा निर्णय दिला नाही म्हणून त्यांनी सदरचे द्वितीय अपील सादर केलेले आहे.

3. सदरच्या द्वितीय अपीलाच्या सुनावणीस वर नमुद केल्याप्रमाणे अपीलकर्ता व प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत. माहिती अधिकारी यांनी त्यांचे कार्यालयाचा रेकॉर्ड आणलेला आहे परंतु आयोगाकडे दाखल करण्याकरीता कोणताही खुलासा व अपीलकर्ता यास माहिती दिल्याच्या पुराव्याच्या प्रती दाखल करण्याकरीता आणलेल्या नाहीत. अर्जातील मुद्या क्र. 1, 2, 3 वर माहिती दिली असे सांगितले व त्याकरीता कार्यालयाच्या पत्रव्यवहारावर त्यांची पोच घेतलेली आहे. स्वतंत्रपणे कोणत्याही प्रकारे त्यांनी अपीलकर्ता यास माहिती दिली याबद्यलचा पत्रव्यवहार नाही. सदरचे पत्रसुध्दा लेखापाल शि. ली. 1 विभागीय कार्यालय भंडारा यांना प्रतिलिपी दिलेली आहे व अपीलकर्ता यास दिलेली प्रतिलिपी हातानी लिहिलेली दिसत आहे. यावरुन माहितीच्या अधिकाराच्या अधिनियमाच्या तरतुदींबाबत एकतर माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी माहिती करुन घेतलेली दिसत नाही किंवा याबाबत त्यांना माहिती करुन घेण्याची जरुरी वाटत नसावी. आणि ज्या पध्दतीने सुनावणीसाठी आलेले आहेत त्या पध्दतीने आयोगाच्या संदर्भात ते गंभीर आहेत असेही वाटत नाही. त्यांच्या सुदैवाने अपीलकर्ता हे गैरहजर आहेत. व त्यामुळे माहिती अधिकारी यांनी जे काही माहिती दिली त्या संदर्भातला पुरावा दाखवला आहे त्यावर विश्वास ठेवून माहिती अपीलकर्त्यास मिळाली असे गृहीत धरावे लागते.

4. असे असले तरी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदींच्या अंमलबजावणी बाबत जी उदासिनता व कागदपत्रे वाचण्याचीसुध्दा तसदी घेण्याची जरुरी नाही या प्रवृत्तीच्यासाठी सुध्दा त्यांच्या वरिष्ठांनी त्याची दखल घेणे आवश्यक आहे. यापुढे माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांची अशाच प्रकारची वर्तणूक राहिल्यास ते माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 प्रमाणे शास्तीस पात्र राहतील.

**<u>नि र्ण य</u>**

1) अपीलकर्ता गैरहजर असल्यामुळे व त्यास माहिती दिलेली आहे असे माहिती अधिकारी यांनी दाखविले असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.
2) उत्तरवादी यांनी आयोगाप्रती दाखविलेल्या उदासिनतेच्याप्रती मुख्य वनसंरक्षक यांनी त्यांचेवर योग्य ती कारवाई करावी व यापुढे आयोगाच्या बाबत अशा प्रकारची प्रवृत्ती योग्य नाही असा त्यांच्या कार्यालयातील कर्मचा–यांना समज देण्यात यावी व स्वतः सुध्दा याबाबतची जागरुकता दाखवावी. त्याकरीता सदरच्या निर्णयाची प्रत मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) नागपूर यांचेकडे पाठवण्यात यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
दिनांक 24.7.2007

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 223/2007.**

श्री कृष्णा दशरथराव पिंपळीकर
संभाजी कासाराच्या मंदिराजवळ, मेहंदीबाग रोड,
मस्कासाथ, इतवारी, नागपूर नं. 2. ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपसंचालक, भूमी अभिलेख नागपूर
आयुक्त कार्यालय, नागपूर.

2) जन माहिती अधिकारी तथा
अधिक्षक, भूमी अभिलेख नागपूर. ..... **उत्तरवादी**

**वि वे च न**

अपीलकर्ता यांनी दिनांक 15/1/2007 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 11.9.2006 रोजी कार्यालयात प्राप्त 20.9.2006 रोजी त्यांच्या सेवा पुस्तिकेबद्यल व सेवानिवृत्ती वेतनाच्या बद्यल माहिती मागितलेली होती. सदरची माहिती त्यांना दि. 5.10.2006 रोजी देण्यात आलेली आहे. परंतु सदरच्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी जिल्हाधिकारी नागपूर यांचेकडे दि. 15.11.2006 रोजी प्रथम अपील सादर केले होते. परंतु सदरच्या माहितीच्या संदर्भामध्ये जिल्हाधिकारी

यांचे अधिकार क्षेत्रात येत नसल्यामुळे सदरचे प्रथम अपील हे उपसंचालक भूमी अभिलेख यांचेकडे हस्तांतरण करण्यात येवून तसे अपीलकर्ता यास कळविलेले होते. सदरच्या अपीलाच्या संदर्भामध्ये सुनावणी दि. 20.3.2007 रोजी झालेली आहे. सदरची सुनावणीचे अगोदरच अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील सादर केलेले आहे.

3. अपीलकर्ता यास माहिती अधिकारी यांनी विहीत मुदतीत माहिती दिलेली आहे परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांचे सेवापुस्तक हे अद्यावत कां करुन देण्यात आले नाही व सेवानिवृत्ती वेतन हे कां सुरु करण्यात आले नाही याबद्यलची कारवाईची त्यांना माहिती आयोगाकडून अपेक्षा असल्यामुळे त्यांनी द्वितीय अपील सादर केलेले आहे. परंतु राज्य माहिती आयोगास कोणत्याही प्रकरणात किंवा तक्रारीच्या बाबत कारवाई करण्याचे आदेश देण्याचा अधिकार किंवा एखादी बाब कां करण्यात आली नाही याबद्यल आदेश देणे सुध्दा माहिती माहितीचा अधिकार अधिनियम 2005 प्रमाणे अपेक्षीत नाही. अर्जदाराने विचारलेली माहिती ज्या स्वरुपात त्या तारखेस उपलब्ध असेल त्या स्वरुपात ती उपलब्ध करुन देणे एवढेच अपेक्षीत आहे. व त्याप्रमाणे त्यांना विहित मुदतीत माहिती मिळालेली आहे. अपीलकर्ता यांनी पुन्हा विचारले की त्यांचा प्रश्न कसा सोडवायचा याकरीता त्यांना दि. 5.6.2006 च्या ''पत्रातून दि. 1.1.96 नंतरच्या वेतनवाढी देण्याबाबतचा प्रस्ताव मा. उपसंचालक भूमी अभिलेख नागपूर प्रदेश नागपूर यांचे मार्फत जमाबंदी आयुक्त व संचालक भूमी अभिलेख (म.रा.) पूणे यांना दि. 12.9.2006 रोजी सादर केलेला आहे'' त्याबद्यलचा कार्यवाहीचा तपशील त्यांनी त्या कार्यालयाकडे माहितीचा अर्ज दाखल करुन विचारणा केल्यास त्यांना त्याबद्यलची माहिती मिळू शकते.

## <u>नि र्ण य</u>

1) अपीलकर्ता यांना मागितलेल्या माहितीप्रमाणे विहित मुदतीत माहिती मिळालेली असल्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 24.7.2007

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 251/2007.**

श्री अमरनाथ बालाजी नारनवरे
192, कुकडे ले आउट, पो. पार्वतीनगर
ता. जि. नागपूर ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) जन माहिती अधिकारी तथा
प्राचार्य, साईनाथ कनिष्ठ महाविद्यालय
प्रगती नगर, नागपूर. ..... **उत्तरवादी**

<u>वि वे च न</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक 23/1/2007 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 18.12.2006 रोजी प्राचार्य साईनाथ कनिष्ठ महाविद्यालय, प्रगती नगर, नागपूर यांचेकडे माहिती मिळण्यासाठी अर्ज केला होता. सदरच्या अर्जामध्ये (कु. विणा राउत) सौ. विणा अमर नारनवरे हया सदरच्या कनिष्ठ महाविद्यालयात व्याख्याता म्हणून कोणत्या तारखेला रुजू झाल्यात, ती तारीख तर त्यांचे पगाराचे खाते क्रमांक पर्यंत या सात मुद्यांवर माहिती मागितलेली होती. सदरच्या अर्जाच्या सदर्भामध्ये दिनांक 23.12.2006 रोजी मुख्याध्यापिका यांनी सदरची माहिती गोपनिय असल्यामुळे देता येत नाही असे कळविलेले आहे. सदरचे पत्र अपीलकर्ता यांना मिळालेले दिसून येत नसल्यामुळे व प्रथम अपीलीय अधिकारी यांची माहिती नसल्यामुळे त्यांनी सदरचे द्वितीय अपील सादर केलेले आहे.

3. सदरच्या द्वितीय अपीलाच्या सुनावणीत उत्तरवादी यांनी विहित मुदतीत माहिती दिली आहे असे दिसते. त्याकरीता त्यांनी कुरीअरनी पत्र पाठविले व कुरिअरची पावतीची झेरॉक्स सादर केली आहे. परंतु अपीलकर्ता यांनी सदरचे कुरिअरचे पत्र मिळाले नाही असे त्यांचे म्हणणे आहे व त्यांनी त्यांच्या 18.12.2006 च्या अर्जामध्ये टपालाद्वारे नाही असे अर्जात लिहिलेले आहे व त्यामुळे उत्तरवादी यांना व्यवक्तीशः उत्तर त्यांना द्यावयास पाहिजे होते असे त्यांचे म्हणणे आहे. परंतु व्यक्तीशः माहिती द्यावी असे म्हटल्यावर उत्तरवादीने व्यक्तीशः माहिती घेण्याकरीता सार्वजनिक प्राधिकरणाकडे माहिती अधिकारीकडे द्यावयास पाहिजे. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की मी माहिती घेण्यासाठी गेलो होतो परंतु त्यावेळेस माहिती दिली नाही किंवा उत्तर दिले नाही. तसेच उत्तरवादी यांनी कु. विणा राउत यांचे पत्र दाखल केलेले आहे व त्यांनी त्या पत्रामध्ये त्यांची वैयक्तिक माहिती देण्यात येवू नये अशी विनंती प्राचार्यांना केलेली आहे. अर्जदाराने त्रयस्थ पक्षाची व्यक्तीगत माहिती मागितली असल्यास अधिनियमाच्या कलम 11 प्रमाणे त्रयस्थ पक्षाचे म्हणणे ऐकुन घ्यावे. त्याप्रमाणे सौ. विणा नारनवरे यांनी लिहून दिलेले दिसते व त्यामुळे त्यांची माहिती देता येत नाही असे उत्तरवादी यांनी पुन्हा सांगितले.

4. अपीलकर्ता यांनी अधिनियमाच्या कलम 4 प्रमाणे कनिष्ठ महाविद्यालयात माहिती अधिकारी, सहा. माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी यांचा फलक लावलेला नाही अशी तक्रार द्वितीय अपीलात केली आहे त्याबद्यल माहिती अधिकारी यांना विचारले असता त्यांनी सांगितले की सदरची माहिती ही खडूनी फळयावर लिहितो. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 4 प्रमाणे अपेक्षीत जी सर्व माहिती आहे ती सर्व माहिती बोर्डावर पेंट करुन दिली पाहिजे व ती दर्शनी भागास लावली पाहिजे असे बंधन आहे. त्यामुळे यापुढे सदरच्या सार्वजनिक प्राधिकरणामध्ये त्या प्रकारची कलम

4 प्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे व अधिनियमाच्या कलम 4 ची माहिती माहिती अधिकारी यांनी स्वतः वाचून घ्यावी. अपीलकर्ता यांनी दि. 27.2.2007 रोजी पुन्हा द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते त्यात त्यांनी वरील प्रमाणेच माहिती मागितलेली आहे व त्यामुळे त्या अपीलाच्या संदर्भात पुन्हा सुनावणी न घेता निर्णय सदरच्या अपीलासंबंधी द्यावा अशी त्यांना दि. 2.6.2007 रोजी विनंती केलेली आहे.

**नि र्ण य**

1) अपीलकर्ता यांनी विचारलेली माहिती त्रयस्थ पक्षाची असल्यामुळे सदरची माहिती गोपनिय म्हणून देता येत नाही असे उत्तरवादी यांनी विहित मुदतीत उत्तर दिलेले असल्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.
2) अपीलकर्ता यांनी दि. 27.2.2007 रोजी दाखल केलेले द्वितीय अपील त्यांचे विनंती प्रमाणे सुनावणीस घेतले व निकाली काढण्यात आले आहे.
3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 25.7.2007

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 251/2007.**

श्री सर्वोत्तम पुरुषोत्तम केळकर
प्लॉट नं. प्रस 20, हिमालय विश्व,
नागपूर रोड वर्धा 442 001 ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपिलीय अधिकारी तथा
अपर आयुक्त व विशेष निबंधक
सहकारी संस्था (वित्त) महाराष्ट्र राज्य पुणे

2) जन माहिती अधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था वर्धा
ता. जि. वर्धा ..... **उत्तरवादी**

**<u>वि वे च न</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक 19/1/2007 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे विभागीय सहनिबंधक नागपूर व माहिती अधिकारी वर्धा हे हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 14.8.2006 रोजी माहिती अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था वर्धा यांचेकडे त्यांनी पत्र दि. 1.8.2006 जावक क्र. जिउनी/आंडीट/वर्धा ना. बॅंक 7812/2006 प्रमाणे वर्धा नागरीक बॅंकेने 19 मुद्यासंबंधीची माहिती जिल्हा

उपनिबंधक म्हणून आपणाकडे दिली व त्याची प्रतिलिपी मला द्यावी कारण मी तक्रारकर्ता आहे. सदरची माहिती लोकल डाकद्वारे आवश्यक आहे असे अर्जामध्ये नमुद केले आहे. सदरच्या माहितीच्या अर्जाप्रमाणे अपीलकर्ता यांना कोणत्याही प्रकारची माहिती विहित मुदतीत मिळाली नाही म्हणून त्यांनी दि. 26.9.2006 रोजी प्रथम अपील दाखल केले व प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दि. 21.11.2006 रोजी जे उत्तर देण्यात आले त्या उत्तराने समाधान न झाल्याने अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील सादर केले आहे.

3. सदरच्या द्वितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळेस उत्तरवादी यांनी सांगितले की त्यांनी दि. 15.9.2006 रोजी अपीलकर्ता याना पोष्टाद्वारे जावक क्र. जिउनी/ऑडीट/ मा.अधि.05/9576/06 कार्यालय जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था वर्धा प्रमाणे कळविले आहे की ''संदर्भ आपला दि. 14.8.2006 चा अर्ज या कार्यालयास दि. 16.8.06 रोजी प्राप्त झालेला आहे. उपरोक्त विषयान्वये आपणास कळविण्यात येते की वर्धा नागरी सहकारी बॅंक मर्या. वर्धा या बॅंकेसंबंधी मा. सहकारी आयुक्त यांचे पत्र क्र. ना. बॅंका/डी–4/वर्धा बॅंक/तक्रार/चौकशी/06 दि. 25.5.2006 नुसार प्राप्त झालेल्या तक्रारी संबंधी या कार्यालयाने मुख्य कार्यकारी अधिकारी वर्धा नागरी बॅंक मर्या. वर्धा यांना या कार्यालयाचे पत्र क्र. 7812 दि. 1.8.2006 नुसार माहिती मागितलेली आहे त्याची प्रत आपणास सुध्दा दिलेली आहे. परंतु बॅंकेकडून अद्यापपर्यंत सदर विषयाची माहिती या कार्यालयास प्राप्त झालेली नसल्याने ती आपणास सद्या देता येणार नाही. बॅंकेकडून माहिती प्राप्त होताच आपणास ती देण्यात येईल सबब आपणास याबाबत कळविण्यात येते प्रत मुख्य कार्यकारी अधिकारी वर्धा नागरी सहकारी बॅंक वर्धा यांना कळविण्यात येते की उपरोक्त विषयाची माहिती या कार्यालयास त्वरीत सादर करावी. सदरचे पत्र हे लोकल डाकेनी अपीलकर्ता यांना पाठवले असे माहिती अधिकारी

सांगतात. परंतु सदरचे पत्र अपीलकर्ता यांना मिळाले नाही असे त्यांचे म्हणणे आहे व त्यामुळेच त्यांनी प्रथम अपील दाखल केले होते. प्रथम अपीलाचा जो निर्णय दिला आहे त्या निर्णयाची प्रत मात्र त्यांना लोकल डाकेनीच मिळालेली आहे ही बाब ते मान्य करतात. त्यानंतर दि. 28.11.2006 रोजी त्यांना माहिती ही माहिती अधिकारी यांनी हस्तबटवडयानी पाठविली व त्यांना मिळालेली आहे असे त्यांनी मान्य केले आहे. याबाबत अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की मला माहिती उशिरा मिळाली तिन महिन्यानी मिळाली हा एकच त्यांचा मुद्या आहे. पण वर नमुद केल्याप्रमाणे जर 15.9. 2006 रोजी अपीलकर्ता यांना पाठविलेले पत्राचा विचार करता माहिती अधिकारी यांचेकडे बॅकेकडून माहिती आलेली नाही त्यामुळे ती देवू शकत नाही व त्याबाबत दिनांक 1.8.2006 रोजी बॅकेला पत्र पाठविलेले होते त्याची प्रत अपीलकर्ता यांना दिलेली होती व 14.8.2006 ला माहितीचा अर्ज केलेला आहे. तरी या सर्व कालावधीचा विचार करता दि. 15.9.2006 पर्यंत माहिती ही माहिती अधिका–याकडे आली नसावी असा निष्कर्ष काढण्यास काहीच हरकत नाही. त्यामुळे दि. 15.9.2006 रोजी माहिती अधिकारी यांनी पत्राने अपीलकर्ता यांना कळविले हे ग्राहय धरावे लागते व त्या पत्रामध्ये बॅककडून माहिती प्राप्त होताच आपणास ती देण्यात येईल यामुळे विलंबाचा मुद्या हा निकाली निघतो.

## नि र्ण य

1) अपीलकर्ता यांना त्यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात विहित मुदतीत उत्तर दिलेले असल्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 25.7.2007

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती / नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 256 / 2007.**

श्री दिनेशकुमार बनारसीलाल अग्रवाल

मु.पो.ता. सडक अर्जुनी जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपिलीय अधिकारी तथा
   तहसिलदार, तहसिल कार्यालय सडक अर्जुनी
   ता. सडक अर्जुनी जि. गोंदिया

2) जन माहिती अधिकारी
   तहसिल कार्यालय सडक अर्जुनी
   ता. सडक अर्जुनी जि. गोंदिया ..... **उत्तरवादी**

**<u>वि वे च न</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक 11 / 12 / 2007 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दि. 26.7.2007 रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी गैरहजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 18.9.2006 रोजी मौजा वडेगाव येथिल केरोसीन परवानाधारकावर केलेल्या कारवाईत ऑगष्ट 2006 ते 18 सप्टेंबर 2006 परवानाधारकाच्या घरुन 44 बोगस रेशन कार्ड जप्ती करण्यात आले त्याबाबतची माहिती 6 मुद्यांमध्ये मागितलेली होती. सदरची माहिती विहित मुदतीत न मिळाल्यामुळे दिनांक 18.10.2006 रोजी अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचीपण सुनावणी न झाल्यामुळे त्यांनी सदरचे द्वितीय अपील सादर केले आहे.

3. प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार सडक अर्जुनी व जन माहिती अधिकारी तहसिल कार्यालय सडक अर्जुनी हे द्वितीय अपीलाच्या सुनावणीस कोणत्याही प्रकारची अनुमती न घेता गैरहजर आहेत ही गंभीर बाब असून ते शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र ठरतात. जन माहिती अधिकारी यांनी सदरचा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसात अपीलकर्ता यांनी दि. 18.9.2006 रोजी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात त्यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तीक राहिल. आतापर्यंत त्यांच्या माहितीचा अर्ज व प्रथम अपील याची दखल न घेतल्यामुळे माहिती अधिकारी हे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 प्रमाणे दोषी ठरतात व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाची सुनावणी न घेतल्यामुळे व सदरचे प्रकरणात आज हजर न राहिल्यामुळे ते सुध्दा शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र ठरतात.

**नि र्ण य**

1) अपीलकर्ता यांचे अपील मंजुर करण्यात येत असून सदरच्या माहितीच्या अर्जात अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही सदरचा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसात जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन द्यावी. तसा तो त्यांना उपलब्ध करुन न दिल्यास ते अधिनियमाच्या कलम 20 प्रमाणे शास्तीस पात्र राहतील.

2) जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी तहसिल कार्यालय सडक अर्जुनी हे जर अपीलाच्या सुनावणीस कोणत्याही प्रकारची अनुमती न घेता गैरहजर राहिल्यामुळे जिल्हाधिकारी यांनी त्यांचेवर त्यांना लागू असलेल्या सेवा नियमाप्रमाणे योग्य ती शास्तीची कारवाई करावी व तसा अहवाल कारवाई केल्या बरोबर 15 दिवसात सादर करावा. शास्तीची कारवाई करतांना जबाबदारी जिल्हाधिकारी यांनी निश्चित करावी.

3) अपीलकर्ता यांना निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसात माहिती न मिळाल्यास त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 18 प्रमाणे आयोगाकडे तक्रार करावी.

4) सदरच्या निर्णयाची प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी व जिल्हाधिकारी गोंदिया यांचेकडे पुढील कारवाईसाठी पाठविण्यात यावी.

नागपूर

दिनांक 26.7.2007

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 257/2007.**

श्री राजु किसन वानखेडे
रा. श्रीराम वार्ड, बल्लारपूर
ता. बल्लारपूर जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपिलीय अधिकारी तथा
अतिरिक्त विभागीय आयुक्त,
विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती,
नागपूर विभाग नागपूर.

2) जन माहिती अधिकारी
विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती,
नागपूर विभाग नागपूर. ..... **उत्तरवादी**

**वि वे च न**

अपीलकर्ता यांनी दिनांक 24/1/2007 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दि. 26.7.2007 रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समितीचे माहिती अधिकारी सदस्य सचिव व विभागीय समाज कल्याण अधिकारी हे हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 30.8.2006 रोजी माहिती अधिकारी यांचेकडे माहिती मागण्यासाठी अर्ज केला होता. माहितीच्या अर्जामध्ये त्यांनी सदरची माहिती ही व्यक्तीशः

स्विकारली असे लिहून दिलेले होते. परंतु त्यांना कोणत्याही प्रकारची माहिती मुदतीत मिळाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दि. 3.10.2006 रोजी दाखल केली. प्रथम अपीलाच्या संदर्भात त्यांना दि. 13.10.2006 रोजी माहिती मिळाली परंतु त्यांना ती विलंबाने माहिती कां मिळाली याविषयी उत्तरवादी यांना विचारले असता दि. 4.5.2006 रोजी अर्ज त्यांच्या कार्यालयात प्राप्त झालेला आहे. दि. 5.9.2006 रोजी त्यांना जाती पडताळणीच्या प्रमाणपत्राच्या करीता मुलाखतीस बालाविले असतांना ते कार्यालयात हजर होते. परंतु त्या दिवशी त्यांना माहिती देण्यात आली नाही. व त्यानंतर ते कार्यालयात व्यक्तीशः आले नसल्यामुळे त्यांना माहिती देता आली नाही असे माहिती अधिकारी यांनी सांगितले. अपीलकर्ता यांना विचारलेली माहिती दि. 15.9.2006 रोजीच तयार करुन ठेवण्यात आली होती. परंतु त्यांतर त्यांनी प्रथम अपील दाखल केल्यानंतर दिनांक 15.9.2006 रोजी तयार करुन ठेवण्यात आलेली माहिती ती दि. 13.9.2006 रोजी पोष्टने पाठविण्यात आलेली होती व ती त्यांना मिळाली आहे असे अपीलकर्ता यांनी मान्य केले. त्यामुळे ही माहिती त्यांना विलंबाने देण्यात आली असा निष्कर्ष काढता येत नाही.

3. दि. 11.9.2006 रोजी पुन्हा अपीलकर्ता यांनी माहिती मिळण्यासाठी अर्ज केला होता. परंतु मुद्दा क्र. 7 मध्ये मागितली होती. सात मुद्दयाच्या पैकी 1 ते 5 मुद्दामध्ये जातीचे प्रमाणपत्र पडताळून देण्याबाबत कार्यवाही सुरु आहे व कार्यवाही झाल्यानंतर माहिती देण्यात येईल. तसेच मुद्दा क्र. 6 मध्ये विचारलेली माहिती बाबत कोणसही विचारणा करण्यात आलेली नाही. मुद्दा क्र. 7 नुसार विचारण्यात आलेला मुद्दा संबंधित प्रकरणाशी आहे. तसेच विचारलेली माहिती बाबत निवडणूकपूर्व प्राप्त प्रकरणावर अंतिम निर्णय झाल्यावर उर्वरीत मुद्दाबाबत माहिती देण्यात येईल असे दि. 21.9.2006 रोजी रजिष्टर पोष्टने कळविण्यात आले होते. त्यामुळे दि. 11.9.2006 च्या अर्जानुसार त्यांना विहित मुदतीत माहिती मिळालेली आहे. व त्याबाबत विलंबाचा प्रश्न उपस्थित होत नाही. वर म्हटल्याप्रमाणे दि. 30.8.2006 च्या अर्जाच्या प्रमाणे सुध्दा माहिती उशिरा मिळालेली असली तरी दि. 13.10.2006 चे पत्र स्वयंस्पष्ट आहे. व त्याबाबत सुध्दा विलंबाचा मुद्दा निकाली निघतो त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**नि र्ण य**

1) अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 30.8.2006 व दि. 11.9.2006 च्या अर्जाप्रमाणे माहिती मिळालेली असल्यामुळे त्यांचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 26.7.2007

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 80/2007 आणि 197/2007.**

श्रीमती माधवी दामोदर मारोतकर

क्वा. नं. 48, नंदनवन कॉलनी

नागपूर 440 009 ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपिलीय अधिकारी तथा
   महाराष्ट्र लोकसेवा आयोग कार्यालय मुंबई
   बॅक ऑफ इंडियाची इमारत, 3 रा माळा,
   महात्मा गांधी मार्ग, हुतात्मा चौक, फोर्ट मुंबई 400 001.

2) जन माहिती अधिकारी
   सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग कार्यालय मुंबई (श्रीमती मिरजकर उपसचिव)
   बॅक ऑफ इंडियाची इमारत, 3 रा माळा,
   महात्मा गांधी मार्ग, हुतात्मा चौक, फोर्ट मुंबई 400 001...... **उत्तरवादी**

## वि वे च न

अपीलकर्ती यांनी दिनांक 21/6/2006 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केलेले आहे. तसेच दि. 21.7.2006 रोजी आणखी एक द्वितीय अपील सादर केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ती व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ती यांनी दि. 20.4.2006 रोजी लोकसेवा आयोगाच्या परिक्षेस परिक्षार्थी

राहिलेल्या श्रीयुत धायगुडे धनाजीराव काशिनाथ यांचे उत्तरपत्रिकेबद्यल माहिती मागितलेली होती. परंतु विहित मुदतीत माहिती न दिल्यामुळे त्यांनी दि. 30.5.2006 रोजी प्रथम अपील दाखल केलेले होते. परंतु दि. 19.7.2006 रोजी त्याना उत्तरपत्रिकेची प्रत देण्यात येत नाही असे कळवून उत्तरपत्रिकेच्या पृष्ठावरील सुचनांची माहिती पुरविण्यात आली. प्रथम अपीलाची सुनावणी घेतली नाही व दिलेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 21.7.2006 रोजी सदरचे द्वितीय अपील सादर केलेले आहे.

3. अपीलकर्ती यांनी पुन्हा त्याच परिक्षार्थीच्या बाबतीत माहिती मागण्याकरीता दिनांक 20.5.2006 रोजी अर्ज केला होता. सदरच्या अर्जाच्या संदर्भात विहित मुदतीत माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी दि. 4.7.2006 रोजी प्रथम अपील दाखल केले व प्रथम अपीलाचीही सुनावणी न झाल्यामुळे सदरचे अपील सादर केलेले आहे.

4. वरील दोनही अर्जांमध्ये एकाच परिक्षार्थीची माहिती मागितलेली असल्यामुळे दिनांक 19 जुलै 2005 रोजी वर म्हटल्याप्रमाणे माहिती दिलेली आहे. असे असले तरी सुध्दा परिक्षार्थी यांनी परिक्षेच्या वेळेस त्यांच्या उत्तर पत्रिकेत पाठपोठ लिहिल्यास शाई फुटते ही बाब परिक्षकांच्या निदर्शनास आणून दिली परंतु व त्याबाबतीत परिक्षकांना लिहुन दिलेले होते असे अपीलकर्ती यांनी सांगितले. परंतु पुरावा सादर केला नाही. परिक्षार्थी यांनी उत्तरपत्रिकेच्या संदर्भात असलेल्या सुचनांचा भंग केलेला असल्यामुळे त्यांनी दि. 28.12.2005 रोजी आयोगानी खुलासासुध्दा मागितलेला होता. व त्या संदर्भात अपीलकर्ती यांनी परिक्षार्थीच्या संदर्भामध्ये ही सर्व माहिती मागितलेली होती. उत्तरवादी यांनी दिनांक

19.7.2006 रोजी जे उत्तर दिलेले आहे ती त्रयस्थ पक्षाची माहिती आहे व ती उघड करता येणार नाही असे कळविले होते. सदरच्या आयोगानी दिलेले उत्तर हे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 11 प्रमाणे योग्य दिसते. उत्तर पत्रिकेच्या संदर्भामध्ये सुध्दा दिलेले उत्तर हे योग्य दिसते. परंतु अपीलकर्ती यांचा मुद्या असा आहे

की त्यांनी जे उत्तर दिलेले आहे ते विहित मुदतीत द्यावयास पाहिजे होते. म्हणजे त्याप्रमाणे त्यांना पुढिल कारवाई करता आली असती. असे जरी असले तरी उत्तरवादी यांनी सांगितले की याबाबत मा. उच्च न्यायालयामध्ये संपूर्ण निर्णय आतापर्यंत झालेला आहे. व अपीलकर्ती यांनीसुध्दा ही बाब मान्य केली. त्यामुळे त्यांना दोनही अपीलाची कामकाज पुढे चालविण्याच्या बद्यल आता स्वारस्य राहिलेले नाही. परंतु त्यांनी अशी विनंती केलेली आहे की आयोगानी अशा प्रकारे कोणत्याही उमेदवाराच्या संदर्भामध्ये माहिती विचारली असता ती विहित मुदतीत दिल्यास त्यांना विहित मुदतीत माहिती न दिल्यामुळे जो मनःस्ताप झालेला आहे तो इतर उमेदवारांना होवू नये. व याबाबतची दखल माहिती अधिकारी यांनी घेतल्यास मागितलेली माहिती ही विहित मुदतीत देण्याचा प्रयत्न करता येईल.

5. अपीलकर्ती यांनीसुध्दा एकच माहिती मागण्याकरीता दोन अर्ज केलेले आहेत तीच माहिती मागण्याकरीता पुन्हा परिक्षार्थी यांनी स्वतः दुसरा अर्ज सोलापूर येथील पत्ता देवून केलेला आहे त्यामुळे नागपूर येथील राज्य माहिती आयोगाच्या कक्षेत दोन अपीले व पुणे येथील माहिती आयुक्ताचे पुणे त्याच माहिती करीता तिसरे अपील हा सुध्दा माहितीच्या अधिकाराच्या अधिनियमाच्या तरतुदींचा अतिरेकी वापर आहे असा निष्कर्ष काढायला हरकत नाही. माहिती जो अर्जदार मागतो त्याची अशी कल्पना असते की त्या सार्वजनिक प्राधिकरणाकडे फक्त त्याचे एकटयाचेच काम आहे परंतु असे अनेक अर्ज केल्यामुळे प्रत्येक अर्जाच्या बाबतीमध्ये सार्वजनिक प्राधिकरणाच्या माहिती अधिका–या कार्यवाही ही करावीच लागते व त्यामुळेच माहिती देण्यासही विलंब होवू शकतो. एकीकडे माहितीच्या अधिकाराचा अर्ज करावयाचा व वर्तमानपत्रामध्ये त्याबाबतीत टिकाटिप्पणी करावयाची म्हणजे पुन्हा त्या सार्वजनिक प्राधिकरणास खुलासा करत बसावे लागणार त्यातही त्याचा वेळा जातो.

उत्तरवादी यांनी सदरच्या संदर्भात वर्तमानपत्रात प्रसिध्द केलेली खुले पत्र हे अपीलाच्या सुनावणीच्या संदर्भात आयोगापुढे सादर केले आहे. त्यात महाराष्ट्र लोक सेवा आयोगाकडून माहितीच्या अधिकाराची पायमल्ली अशा प्रकारचे आरोप करणारे पत्र प्रसिध्द केलेले आहे. त्यावरुन पुन्हा वर म्हटल्याप्रमाणे आयोगापुढे एकच एक प्रकरण हे अशा पध्दतीने धायगुडे धनाजीराव काशिनाथ यांचेबाबतीत ही सर्व अर्ज व अपीले यांच्या सुनावणीकरीता आयोगाची यंत्रणा फिरत आहे. असे असले तरी अपीलकर्ती यांना त्यांनी दिलेल्या खुलाशाच्या आधारे स्वारस्य नसल्यामुळे सदरची अपीले निकाली काढण्यात येत आहे. परिक्षार्थी यांने सोलापूर येथील पत्ता देवून जे स्वतः माहितीचा अर्ज करुन द्वितीय अपील आयोगापुढे सादर केलेले आहे त्याबाबतीत पुणे येथील आयुक्तांपुढे त्यांनी अर्ज देवून मागे घेता येईल.

**नि र्ण य**

1) अपीलकर्ती यांचे अपीले ही निकाली काढण्यात येत आहे.

2) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 30.7.2007

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 263/2007 व 264/2007.**

श्री विजय तुळशीराम डोये
मु. पो. नवेगावबांध ता. अर्जुनी मोरगाव
जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय अभियंता,
लघु पाटबंधारे (स्था. स्तर) सर्वेक्षण
उपविभागीय कार्यालय, देवरी जि. गोंदिया

2) जन माहिती अधिकारी
कार्यकारी अभियंता,
लघु पाटबंधारे (स्था. स्तर) विभाग गोंदिया
ता. जि. गोंदिया ...... **उत्तरवादी**

**वि वे च न**

अपीलकर्ती यांनी दिनांक 27/1/2007 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या द्वितीय अपीलांची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ती व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपील क्र. 263/2007 मध्ये अपीलकर्ती यांनी दि. 3.10.2006 कान्होली गट नं. 65 मध्ये रोजगार हमी योजनेअंतर्गत मजुरांचे मस्टर व इतर माहिती मागितलेली होती.

माहितीचा कालावधी 2004–05 व 2005–06 असा आहे. सदरच्या माहितीमध्ये अर्जदार हा दारिद्रय रेषेखालील आहे याबद्यल होय नमुद करुन (नं. 86) बी. पी. एल. असा उल्लेख केलेला आहे. सदरच्या अर्जासोबत त्याकरीता दाखला दिलेला होता. परंतु तो त्यांच्या वडिलांचा असल्याने माहिती अधिकारी यांनी त्यांना खुलावा विचारलेला होता. परंतु अर्जदार यांनी स्वतःचा दाखला दिला नसला तरी त्यांना दि. 18.10.2006 रोजी उपलब्ध माहिती पाठविली. सदरची माहिती पाठवतांना दारिद्रय रेषेखालील येत असल्याचा सबळ पुरावा मिळण्याकरीता आपणास लिहिले होते व त्याकरीता माहिती देण्या करीता कोणत्याही प्रकारची टाळाटाळ करण्यात आलेली नाही. व दोन पाने माहिती दिलेली आहे. सदरची माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक 27.11.2006 रोजीसुध्दा प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. दारीद्रय रेषेखालील दाखल्याच्या संदर्भामध्ये त्यांनी प्रमाणपत्र दाखल केलेले नसल्याने सदरचा त्याच्याशी पत्रव्यवहार केलेला दिसून येतो. अपीलकर्ता यांना दि. 18.10.2006 रोजी बहुतांश माहिती मिळालेली असूनसुध्दा पुन्हा त्याच माहितीचे संपूर्ण वर्णन हा त्यांनी द्वितीय अपीलात उल्लेख केलेला आहे.

3. अपील क. 264/2007 मध्ये पुन्हा दि. 3.10.2006 रोजी नवेगाव बांध गट नं. 1266 मध्ये पानघाट व वेस्टवेल अंदाजपत्रकाची माहिती सन 2005–2006 या कालावधीतील मागितली होती. सदरच्या अर्जाचा संदर्भ सुध्दा दारिद्रय रेषेखाली येत असल्याने सबळ पुरावा अपीलकर्ता यांनी दाखल करावा म्हणून वेळोवेळी त्यांना कळविले असूनसुध्दा त्यांनी प्रमाणपत्र दाखल केलेले नसले तरी त्याना दि. 18.10.2006 रोजी माहिती ही उपलब्ध करुन दिली. सदरच्या माहिती मुळे समाधान न झाल्यामुळे त्यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या संदर्भात माहिती पूर्वीच दिलेली असल्यामुळे

पुन्हा अपील सुनावणीस घेतलेली दिसून येत नाही परंतु अपीलकर्ता यांचेशी पत्रव्यवहार केलेला दिसून येतो. त्यानंतर सदरचे द्वितीय अपील हे अपीलकर्ता यांनी दाखल केलेले दिसून येते. सदरच्या द्वितीय अपीलात पुन्हा कान्होली गट क्र. 65/ नवेगावबांध येथिल गट क्र. 1266 चा उल्लेख करुन त्याबाबतची माहिती मिळणेबाबत माहिती केलेली दिसून येते.

4. अपीलकर्ता यांना त्यांच्या कान्होली गट क्र. 65/ नवेगावबांध येथील गट क्र. 1266 या संबंधात दि. 3.10.2006 रोजी केलेल्या दोन वेगवेगळया अर्जाच्या संदर्भात त्यांना दारिद्रय रेषेखालील स्वतःचे प्रमाणपत्र खुलासा मागवून सुध्दा न देता दि. 18.10. 2006 रोजी माहिती दिलेली आहे. ती अपीलकर्ता यांनासुध्दा मान्य आहे. परंतु मजुरांचे मजुरी रजिस्टर व धान्याचे कुपन याबाबतची माहिती त्यांना मिळाली नाही व म्हणून त्यांनी द्वितीय अपील सादर केले आहे असे तोंडी सांगितले. मजुराचे मजुरी हजेरीपत्रक व धान्यकुपनाची माहिती बद्यल उत्तरातच उत्तरवादीनी माहिती अधिकारी यांचेकडे हे उपलब्ध नसून विभागीय कार्यालयात पाठविली जाते व रजिस्टरमध्येच धान्यकुपनाची माहिती असते व ही माहिती विभागीय कार्यालयाकडूनच उपलब्ध होवू शकेल असे सांगितले. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की सदरची माहिती त्यांना आवश्यक आहे.

5. सदरची माहिती ही माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता याचे अर्ज विभागीय कार्यालयातील संबंधित माहिती अधिकारी यांचेकडे पाठवून अपीलकर्ता यांना त्यांनी विचारलेल्या कालावधीतील कान्होली व नवेगावबांध येथील मजुरांचे हजेरीपत्रकातील माहिती उपलब्ध करुन देणेस कळवावे. अपीलकर्ता यांनी दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र दाखल केल्यास त्याना ती माहिती विनामुल्य उपलब्ध करुन घेता येईल. परंतु तसे प्रमाणपत्र दाखल न केल्यास विभागीय कार्यालयातील माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांस हव्या असलेल्या माहितीचा अंदाज घेवून त्यास खर्चाचा तपशील

कळवावा. व अपीलकर्ता यांनी त्याप्रमाणे खर्चाचा भरणा करुन माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तीक होईल. किंवा मजुराच्या हजेरीपत्रकाच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांनी विभागीय कार्यालयात स्वतः जावून कोणत्या माहितीची झेरॉक्स त्यांना पाहिजे ते प्रत्यक्ष दाखवून घेतल्यास माहिती अपूर्ण मिळाली असे पुन्हा होणार नाही त्याबाबतचा पर्याय हा अपीलकर्ता यांनी स्विकारल्यास पुन्हा तक्रारीस जागा राहणार नाही.

**<u>नि र्ण य</u>**

1) अपीलकर्ती यांची दोनही अपीले अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता यांना कान्होली येथील गट क्र. 65 व नवेगांवबांध येथील गट क्र. 1266 मधिल मजुरांचे मजुरी मस्टर विचारलेल्या कालावधीतील विभागीय कार्यालयातील संबंधित माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन देणेसाठी माहिती अधिकारी देवरी यांनी त्यांचेकडे अपीलकर्त्याचे दि. 3.10.2006 चे दोनही अर्ज पाठवून माहिती उपलब्ध करुन द्यावी असे कळवावे. अपीलकर्ता यांनी दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र दिल्यास त्यांना सदरची माहिती विनामुल्य देण्यात यावी व न दिल्यास माहितीच्या खर्चाचा अंदाज त्यांना कळवून खर्चाचा भरणा केल्यानंतर त्यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी. माहिती उपलब्ध करुन घेतांना कोणत्याही प्रकारचा वाद पुढे उपस्थित होवू नये म्हणून अपीलकर्ता यांनी प्रत्यक्ष गोंदिया येथील विभागीय कार्यालयात उपस्थित राहून माहितीच्या बद्यल मागणी केल्यास त्याप्रमाणे त्यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी.

3) गोंदिया येथील विभागीय कार्यालयास कळवतांना अपीलकर्ता यांनासुध्दा कळवावे व महिती व्यक्तीशः घेण्याकरीता तारीख कळविण्यात यावी किंवा अपीलकर्ता यांनी माहिती कोणत्या तारखेस घेणार ते कळवावे.

4) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

5) सदरच्या निर्णयाची प्रत गोंदिया येथील विभागीय कार्यालयातसुध्दा पाठविण्यात यावी.

नागपूर

दिनांक 30.7.2007

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 267/2007 व 268/2007.**

श्री दादाराव तुलाराम सरोजकर
रा. गुजराथी कॉलनी, गुप्ता यांचे बगिच्याजवळ
भंडारा ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपवनसंरक्षक, वनविभाग, भंडारा

2) जन माहिती अधिकारी
सहाय्यक वनसंरक्षक, वनविभाग, भंडारा ...... **उत्तरवादी**

**<u>वि वे च न</u>**

अपीलकर्ती यांनी दिनांक 24/1/2007 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या दोन द्वितीय अपीलांची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. सुनावणीच्या करीता नोटिस दि. 23.5.2007 रोजी काढण्यात आली होती. दि. 30.6.2007 रोजी कागदपत्रे दाखल करणे व दि. 31.7.2007 रोजी म्हणजे आज सुनावणीस ठेवण्यात आली होती. अपीलकर्ती हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत. तत्कालीन माहिती अधिकारी व वर्तमान माहिती अधिकारी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 24.2.2006 रोजी माहिती अधिकारी यांचेकडे दोन मुद्यावर माहिती मिळणेसाठी अर्ज केलेला होता. सदरच्या अर्जाप्रमाणे माहिती विहित मुदतीत मिळाली नाही म्हणून दि. 31.3.2006 रोजी प्रथम अपील दाखल केले होते. प्रथम

अपीलाची सुनावणी आज होती तरीसुध्दा अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील सादर केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी पुन्हा दि. 16.8.2006 रोजी दुसरा अर्ज दाखल केलेला होता. सदरच्या दुस–या अर्जाच्या संदर्भामध्ये दि. 23.8.2006 रोजी पोष्टाने माहिती अर्जदारास पाठविली तसेच दि. 27.11.2006 रोजी समक्ष आले असता त्यांना समक्ष माहिती पुरवण्यात आले. मात्र माहिती विहित मुदतीत दिली नाही म्हणून त्यांनी दि. 10.10.2006 रोजी प्रथम अपील दाखल केले होते. सदरच्या प्रथम अपीलात सुध्दा निर्णय दिलेला असतांनाही त्यांनी सदरचे द्वितीय अपील माहिती विलंबाने मिळाली म्हणून दाखल केले आहे. अपील क्र. 267/07 व अपील क्र. 268/07 च्या सुनावणीच्या संदर्भात खुलासा देतांना अपीलकर्ता यांनी आता पर्यंत दि. 24.2.2006, 31.5.2006, 16.8.2006, 6.10.2006, 2.2.3007, 2.2.2007, व 12.4.2007 एवढे अर्ज माहिती मिळण्यासाठी सादर केलेले आहेत. सदरच्या माहितीच्या अर्जाच्या संदर्भामध्ये माहिती पुरविण्याचा प्रयत्न केलेला आहे. राज्य माहिती आयोगाच्या कार्यालयात कोणत्या प्रकरणात अपील दाखल केलेले आहेत याबाबतची अपील प्रत मिळाली नसल्यामुळे अपीलकर्ता यांना विचारले परंतु त्यांनी सुध्दा त्याबद्यलची माहिती सांगितली नाही. व त्यामुळे अर्जदारानी केलेल्या सर्व अर्जाच्या संदर्भामध्ये खुलासा व माहिती सादर करण्यात येत आहे असे नमुद केले आहे.

4. माहिती अधिकारी यांनी असेही खुलाशात नमुद केले आहे की माहिती अधिकारी म्हणून त्यांचेकडे जरी माहिती विचारली तरी ती कार्यालयात उपलब्ध असतेच असे नाही त्या वन विभागातील वन क्षेत्र अधिकारी यांचेकडून ती मागवावी लागते. उप वनक्षेत्राधिकारी यांचे स्वतंत्र कार्यालय असून ते कार्यालय प्रमुख असून डि.डि.ओ.सुध्दा आहेत. तसेच विभागीय कार्यालयातील आस्थापना, रो.ह.यो.शाखा, व्यय शाखा इत्यांदीकडून माहिती मागितली. माहिती अधिका–यास माहिती साठी इतरांवर अवलंबून

राहावे लागते व एकाच अर्जदाराचे अनेक अर्ज असल्यामुळे व असे अनेक अर्जदार असल्यामुळे माहिती विहित मुदतीत पुरवणे ब–याच वेळा शक्य होत नाही. माहिती पुरविल्याच्या नंतर पुन्हा प्रत्येक अर्जदार हा अर्धवट व चुकीची आहे असे म्हणतो परंतु त्याला ते सिध्द करता येत नाही. त्यामुळे कोणती माहिती अर्धवट आहे व कोणती चुकीची आहे हेही माहिती अधिकारी यांना कळणे शक्य नसते.

5. अपील क्र. 267 मधिल दि. 24.2.2006 चा माहितीचा अर्ज तपासल्यास असे दिसून येते की सदरची माहिती ही रजिस्टर पोष्टाने किंवा व्यक्तीशः व पुन्हा रजिस्टर पोष्टाने पाठवावी असे लिहिलेले आहे. तसेच कोर्टाच्या कामासाठी किंवा खाजगी कामासाठी हवी आहे असेही कारण दिलेले आहे. अशा प्रकारे अर्जात नमुद केलेले असल्यामुळे माहिती अधिकारी यांनी कशा पध्दतीने माहिती द्यावी असे कळणे दुरापस्थ होते. माहिती ही कोर्टासाठी हवी आहे किंवा खाजगी कामासाठी हवी आहे यांचा अर्थ त्यांनी सार्वजनिक हितार्थ त्यांनी मागितलेली नाही. अर्जदाराचा 24.2.2006 चा अर्ज हा माहिती अधिका–यास दि. 3.3.2006 रोजी प्राप्त झालेला आहे. सदरची माहिती पत्र क्र. 510 दि. 3.3.2006 अन्वये आस्थापना शाखेकडून माहिती मागितली. पत्र क्र. 4551 दि. 31.3.2006 अन्वये ही माहिती दि. 4.4.2006 रोजी प्राप्त झाली. परंतु अर्जदाराने दि. 31.3. 2007 रोजी त्यापूर्वीच अपील दाखल केले होते. व त्यामुळे अर्जदाराला अपीलीय अधिकारी यांनी कागदपत्रे पुरविली. दिनांक 27.4.2006 रोजी अपीलकर्ता यांना दि. 31.3. 2006 चे अपील अर्जाच्या संदर्भात बोलाविण्यात आले होते. सदरच्या 31.3.2006 च्या अपीलाच्या संदर्भात सुध्दा दि. 10.5.2006 रोजी अपीलार्थी यांचेशी चर्चा केली आहे.

6. उत्तरवादी यांनी दिलेल्या खुलाशावरुन व दाखल केलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की उत्तरवादी यांनी अपीलकर्ता यांचा दि. 24.2.2006 चा अर्ज दि. 3.3.2006 रोजी प्राप्त झाल्यावर माहिती मिळणेसाठी ज्या ज्या शाखेकडून माहिती उपलब्ध करुन

घ्यावी लागते त्यांचेशी पत्रव्यवहार केलेला दिसून येतो. व त्यामुळे माहिती उपलब्ध करुन देण्यास विलंब जरी झालेला असला तरी माहिती देण्याची टाळाटाळ केलेली आहे असा निष्कर्ष काढता येत नाही. अपीलकर्ता यांनी सुध्दा दि. 31.3.2006 रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. व त्यामुळे माहिती ही त्यांना अपीलाच्या सुनावणीतच देण्यात आलेली आहे. कारण त्यांनी व्यक्तीशः माहिती घेईल असे त्यांनी लिहुन दिलेले होते. त्यामुळे सदरचे अपील क्र. 267/2007 हे खारीज करण्यास पात्र आहे.

7. अपील क्र. 268/2007 मध्येसुध्दा अर्जदारानी दि. 16.8.2006 रोजी मागितलेल्या माहितीच्या अर्जाच्या संदर्भामध्ये द्वितीय अपील आहे. अपीलकर्ता यांचा अर्ज दि. 16.8. 2006 रोजी प्राप्त झाल्यावर पत्र क्र. 438 दि. 16.8.2006 अन्वये आस्थापना शाखेकडून विभागीय कार्यालयातून माहिती मागविण्यात आली. सदरची माहिती दि. 19.8.2006 ला प्राप्त झाली व पत्र क्र. 442 दि. 23.8.2006 रोजी स्वखर्चाने पोष्टाने माहिती अर्जदारास पाठविली तसेच दि. 27.11.2006 रोजी समक्ष आले असता त्यांना समक्ष माहिती पुरविण्यात आली असा खुलासा सादर करण्यात आलेला आहे व तसे त्यांनी दि. 28.11. 2006 ला माहिती प्राप्त झाल्याचे उपरोक्त संदर्भिय पत्रानुसार कळविले आहे असा उल्लेख उपवनसंरक्षक यांचे पत्रात दिसून येतो. वास्तविक पत्र क्र. 442 दि. 23.8.2006 अन्वये पोष्टाने माहिती पाठविली असे असतांना दि. 10.10.2006 रोजी अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते व त्यामुळे अपीलकर्ता यांना विलंबाने माहिती मिळाली असे ग्राहय धरता येत नाही त्यामुळे अपीलकर्ता यांचे दुसरे अपील क्र. 268/2007 हे सुध्दा खारीज करण्यास पात्र आहे.

## नि र्ण य

1) अपीलकर्ती यांचे अपील क्र. 268/2007 या मधिल माहिती विलंबाने मिळाली असली तरी माहितीचा अर्ज मिळाल्यापासून माहिती संकलित करण्याकरीता विलंब झालेला दिसून येतो व त्याबाबतचा खुलासा हा ग्राहय धरणे आवश्यक असल्यामुळे

व माहिती देण्याचा प्रयत्न केलेला असल्यामुळे माहिती देण्याची टाळाटाळ केलेली आहे असा निष्कर्ष काढता येत नसल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

2) अपील क्र. 268/2007 मध्ये माहिती अधिकारी यांचे खुलाशाप्रमाणे दि.23.8.2006 रोजी पत्र क्र. 442 अन्वये पोष्टाने माहिती पाठविली आहे व दि. 27.11.2006 रोजी ती माहिती अपीलकर्ता यांनी व्यक्तीशः स्विकारली आहे व त्याबाबत उपवनसंरक्षक अधिकारी यांना माहिती मिळाल्याचे कळविले असल्यामुळे सदरची माहिती विहित मुदतीत मिळाली असे गृहित धरुन सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

3) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 31.7.2007

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 271/2007 व 354/2007.**

श्री अतुल रमेश होले
चैतन्यवाडी शिवचैतन्य मंदिराजवळ, मलकापूर
ता. मलकापूर जि. बुलढाणा – 443101. ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद बुलढाणा
ता. जि. बुलढाणा.

2) जन माहिती अधिकारी
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती मलकापूर
ता. मलकापूर जि. बुलढाणा ...... **उत्तरवादी**

<u>वि वे च न</u>

अपीलकर्ती यांनी दिनांक 24/1/2007 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या द्वितीय अपीलांची सुनावणी आज दि. 31.7.2007 रोजी घेण्यात आली. अपीलकर्ती हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अनुपस्थित राहण्याकरीता अर्ज पाठविण्यात आलेला आहे. माहिती अधिकारी हे हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 28.12.2006 रोजी राज्य माहिती आयोग मुंबई यांचेकडे

द्वितीय अपील सादर केले होते. परंतु नागपूर येथे नागपूर अमरावती विभागासाठी राज्य माहिती आयोगाचे कार्यालय दि. 4.1.2007 रोजी सुरु झाल्यामुळे त्यांनी पुन्हा दि.24.1. 2007 रोजी द्वितीय अपील सादर केले आहे त्यामुळे दोनही अपीलांची सुनावणी एकत्रित घेवून निर्णय देण्यास अपीलकर्ता यांची हरकतत नाही असे त्यांनी सांगितले.

3. अपीलकर्ती यांनी दि. 7.6.2006 रोजी माहिती अधिकारी पंचायत समिती मलकापूर यांचेकडे पाणी टंचाई काळात पाणी पुरवठयासाठी करण्यात आलेल्या खर्चाचा तपशील ऑक्टोबर 2005 ते 21 एप्रिल 2006 या काळात कोणत्या गावाला टॅकरद्वारे पाणी पुरवठा झाला, कोणत्या गावाला कोणत्या क्रमांकाच्या टॅकरने किंती ट्रिप पाणी पुरवठा झाला, टॅकरचे लॉगबुक व डिझेल पावत्यांचे पुस्तक, पाणी पुरवठा टॅकरसाठी झालेल्या खर्चाचा पूर्ण तपशील देण्यात यावा. माहिती व्यक्तीशः घेणार म्हणून नमुद केले आहे. विहीत मुदतीत कोणत्याही प्रकारची माहिती दिली नसली तरी दि. 28.7.2006 रोजी उपलब्ध असलेल्या माहितीच्या खर्चासाठी रु. 2000/— चा भरणा करावा असे अपीलकर्ता यांस कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी दि. 18.9.2006 रोजी सदरच्या रकमेचा भरणा केलेला आहे. परंतु खर्चाचा भरणा केल्यानंतर सुध्दा माहिती न दिल्यामुळे दि. 11.10.2006 रोजी प्रथम अपील सादर केले होते. सदरच्या अपीलाची सुनावणी दिनांक 18.10.2006 रोजी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी घेतली. सुनावणीस अपीलकर्ता हजर होते, माहिती अधिकारी हजर होते. अपीलाची सुनावणी झाली त्यावेळेस माहिती अधिकारी यांनी माहिती आणली होती असे ते तोंडी सांगत आहे. नोटशिट वर नोंद केलेली दिसून येते परंतु नोटशिटच्या प्रती दाखल केल्या नाहीत. व माहिती अपुरी आहे असे अपीलकर्ता यांनी सांगितले असे प्रथम अपीलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी सांगतात. असे असले तरी अपीलकर्ता यांना मुदतीत माहिती मिळाली नाही हा मुद्या कायम राहातो. अपीलाचा निर्णय दिलेला दिसत नाही सुनावणी मात्र झालेली आहे माहिती द्या

एवढेच सांगितलेले दिसत आहे परंतु प्रत्यक्षात माहिती हि दिली गेली नाही. व त्यामुळे व्यथित होवून अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील दाखल केले आहे.

4. माहिती पुरविण्यात आलेली आहे किंवा नाही हे सिध्द करण्याची जबाबदारी माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांची आहे. दि. 7.6.2006 या माहितीच्या अर्जाच्या तारखेपासून विहीत मुदतीत 30 दिवसात माहिती कळवावयास पाहिजे होती. परंतु दि. 28.7.2006 रोजी माहितीच्या खर्चाचा भरणा करीता कळवण्यात आले. खर्चाचा भरणा करण्याच्या करीता कळवण्यात आल्यापासून ते खर्चाचा भरणा करीपर्यंतचा कालावधी हा वगळून मिळतो परंतु तरी सुध्दा खर्चाचा भरणा करण्याचे पत्र 30 दिवसा नंतर दिले आहे व त्याकरीता माहिती अधिकारी यांना विचारले असता त्यांनी सदरची माहिती ही स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक यांचेकडे उपलब्ध असते व त्यांनी वेळोवेळी म्हणजे दि. 12.6.2006, 17.6.2006, 27.6.2006, 24.7.2006, 30.9.2006, 5.10.2006 आणि 17.10.2006 रोजी असे पत्र माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात पाठविलेले आहे व ते कागदपत्रासोबत दाखल केलेले आहे. त्यानंतर दिनांक 13.12.2006 रोजी सदरची माहिती ही रजिस्टर पोष्टाने अपीलकर्ता यांना पाठविली होती त्यांनी ती घेण्याचे नाकारले असे माहिती अधिकारी यांनी सांगितले व त्याकरीता पोष्टाचा पुरावा दाखल केलेला आहे. माहिती जरी अपीलकर्ता यांना पाठविलेली असली तरी अपीलकर्ता ही माहिती व्यक्तीशः घेणार होते आणि त्यांना पोष्टाने पाठविली ती पण विलंबाने पाठविली. विहीत मुदतीत माहिती दिली नसल्यास अधिनियमाच्या कलम 20 प्रमाणे कलम 7 च्या पोटकलम (1) अन्वये विदिर्निष्ट केलेल्या वेळेत माहिती सादर केलेली नसल्यास व तसे आयोगाचे मत झाले असले तर माहिती देईपर्यंत प्रत्येक दिवसाला रु. 250/– इतकी शास्ती लादता येईल तथापी अशा शास्तीची एकुण रक्कम रु. 25000/– पेक्षा अधिक असणार नाही अशी तरतूद आहे. सदरच्या प्रकरणी माहिती

देण्यास विलंब झालेला आहे हे वर सिध्द झालेले आहे. त्यामुळे माहिती अधिकारी हे दोषी ठरतात परंतु प्रत्यक्ष माहिती ही माहिती अधिकारी यांचेकडे नसतांना ती स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक यांचेकडे होती व त्यामुळे त्यांना वेळोवेळी पत्र देवूनसुध्दा त्यांनी माहिती अधिकारी यांना अपीलकर्ता यास विहीत मुदतीत माहिती उपलब्ध करुन देण्या करीता दिली नसल्यामुळे स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक हे सुध्दा दोषी ठरतात. आज स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक कवाडे हजर आहेत. त्यामुळे स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक यांना माहिती विलंबाने कां देण्यात आली याबद्यल विचारणा केली असता त्यांनी दि. 10.7.2006 रोजीची नोटशिट मध्ये तयार केली अशी नोंद आहे असे दाखविले. असे असले तरी 12.6.2006 ते 27.6.2006 पर्यंत तिन पत्रे देवून कारणे दाखवा नोटिस सुध्दा त्यांना दिलेले दिसून येते व त्यामुळे माहिती देण्यास स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक हे प्रामुख्याने दोषी आहेत असे दिसते. त्यांना दि. 30.9.2006 च्या पत्राप्रमाणे दररोज /. 250/– दंड करण्यात येईल याची नोंद घ्यावी अशीही समज देण्यात आलेली आहे असे दिसून येते व त्यामुळे अधिनियम कलम 5 च्या पोटकलम (4) अन्वये अशी तरतूद आहे की माहिती अधिकारी यांस त्यांची योग्य प्रकारे पार पाडण्यासाठी त्याला किंवा तिला आवश्यक वाटेल असा अन्य कोणत्याही अधिका–याचे सहाय्य मागता येईल व पोट कलम (5) मध्ये ज्यांचे सहाय्य मागितले आहे असा कोणताही अधिकारी त्याचे किंवा तिचे सहाय्य मागणारे राज्य जन माहिती अधिका–यास संपूर्ण सहाय्य करील आणि या अधिनियमाच्या तरतुदींच्या कोणत्याही उल्लंघनाच्या प्रयोजनार्थ असा अन्य अधिकारी, हा यथास्थिती, हा राज्य जन माहिती अधिकारी असल्याचे समजण्यात येईल. असे विहित आहे. त्याप्रमाणे स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक यांचेकडून विहीत मुदतीत माहिती उपलब्ध झाली नसल्यामुळे त्यांना जन माहिती अधिकारी समजून कलम

20 प्रमाणे शास्ती लादणे हे संयुक्तीक होईल. शास्ती लादतांना प्रतिदिन रु. 250 किंवा रु. 25000/– ही तरतुद जरी असली तरी माहितीचे स्वरुप अतिशय व्यापक आहे संपूर्ण तालुक्यातून माहिती पुरवावयाची आहे व त्यामुळे माहिती संकलित करण्यास विलंब लागणे हे शक्य आहे. परंतु तरीसुध्दा दि. 12.6.2006 ते 6.7.2006 पर्यंतचा या कालावधीतील कामकाजाचा खुलासा श्री कवाडे करु शकले नाही. व त्यामुळे त्यांना रु. 5000/– ही शास्ती लादणे आवश्यक ठरेल.

**<u>नि र्ण य</u>**

1) अपीलकर्ती यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे. अपीलकर्ता यांना माहिती देण्यास विलंब झालेला असल्यामुळे सदरची माहिती त्यांना विनामुल्य देण्यात यावी व रु. 2000/– केलेला भरणा हा परत करण्यात यावा.

2) माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 5 (5) प्रमाणे स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक यांना माहिती अधिकारी समजून माहिती ही विलंबाने देण्याचे कारणा वरुन व दि. 12.6.2006 ते 6.7.2006 पर्यंतचा कालावधीचा खुलासा त्यांनी न केल्यामुळे त्यांना कलम 20 (1) प्रमाणे त्यांना रु. 5000/– ही शास्ती लादण्यात येत आहे व सदरची शास्तीची रक्कम ही दरमहा त्यांच्या वेतनातून वसूल करण्यात यावी व तसा अहवाल आयोगापुढे पाठविण्यात यावा.

3) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 31.7.2007

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 241/2007.**

श्री रविंद्रकुमार सिध्दनप्रसाद वर्मा
रा. प्लॉट नं. 13, गिरडकर ले आउट,
ग्रा.पं. वायगाव ता. उमरेड जि. नागपूर ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपिलीय अधिकारी तथा
खंड विकास अधिकारी,
पंचायत समिती उमरेड ता. उमरेड जि. नागपूर.

2) जन माहिती अधिकारी
मुख्याध्यापिका, उ.प.हिंदी पाठशाला, कोयला खदान,
पंचायत समिती उमरेड ता. उमरेड जि. नागपूर ...... **उत्तरवादी**

<u>वि वे च न</u>

अपीलकर्ती यांनी दिनांक 22/1/2007 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी दि. 21.7.2007 रोजी व आज दिनांक 31.7.2007 रोजी घेण्यात आली. अपीलकर्ती हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ती यांनी दि. 13.10.2006 रोजी माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका यांचेकडे ''किरपान राजेश शाहु (तेली) पहिला वर्ग वायगाव घोटुर्ली ता. उमरेड के जन्म दाखला जिसमे उनका जन्मतिथी 15/6/00 दर्शाया गया के प्रत मिलनेबाबत'' अर्ज केलेला आहे. सदरच्या अर्जाच्या संदर्भामध्ये दि. 26.10.2006 रोजी माहिती प्राप्त

होण्यासाठी प्रत्यक्षात शुल्क रु. 2 कार्यालयात जमा करुन माहिती घेवून जावी पोष्टाने पाहिजे असल्यास अतिरिक्त शुल्क रु. 25+2=27/- जमा करावी असे कळविण्यात आले होते परंतु त्याप्रमाणे अर्जदाराने दि. 9.12.2006 रोजी रक्कम रु. 2 जमा केल्याचे कळविलेले दिसते. दि. 3.1.2007 रोजी जन्म तारखेबाबत कोणतेही प्रमाणपत्र त्यांचेकडून प्राप्त झाले नाही आपणास आवश्यकता असल्यास वडीलांकडून दि. 3.7.2006 चे प्रमाणपत्र पुरवता येईल तसेच दि. 1.12.2006 ला सादर केलेल्या अर्जानुसार कळविण्यात येते की उच्च प्राथ. शाळा कायला खदान येथे माहिती अधिकारी असल्याने त्याबाबत माहिती अधिकारी यांनी माहिती मागवावी. दि. 8.8.2006 च्या अर्जाच्या संदर्भाप्रमाणे 10 रु. चा मुद्रांक लावलेला नाही व त्यामुळे आपण कार्यालयात रितसर अर्ज सादर केलेला नाही सबब उत्तर देता येत नाही. रितसर आलेल्या अर्जाचा विचार केला जाईल असा दि. 8.9.2006 रोजी अपीलकर्ता यांनी कळविलेले आहे व त्यांची सही आहे. दिनांक 11.8.2006 रोजी खंड विकास अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. दिनांक 11.10.2006 रोजी सुध्दा प्रथम अपील दाखल केलेले दिसून येत आहे. दिनांक 20.11.2006 अपीलकर्ता यांचे प्रमाणपत्राची प्रत दिलेली दिसून येत आहे परंतु रिसिव्हड म्हणून अपीलकर्ता यांनी सही केलेली असून तारीख टाकलेली असून ती पुन्हा खोडलेली आहे. दि. 27.1.2006 रोजी सहाय्यक माहिती अधिकारी पं. स. उमरेड हयांनी मुख्याध्यापक वायगाव यांना लिहिलेले पत्र आहे त्यामध्ये पुन्हा जन्मतारखेच्या दाखल्या बद्यल विचारणा करण्यात आलेली आहे. पुन्हा 27.11.2006 रोजी अपीलकर्ता यांना जनमतारखेच्या दाखल्याबद्यल कळविण्यात आलेले आहे. पुन्हा दि. 21.12.2006 रोजी सहाय्यक माहिती अधिकारी पं. स. उमरेड यांनी मुख्याध्यापक श्री किरपान राजेश शाहुचे प्रमाणपत्र देण्यात येत आहे अशी माहिती देण्यात आलेली आहे. ग्राम पंचायत वायगाव यांचे सचिवांचे दि. 6.11.2006 चे पत्र आले होते त्यामध्ये जन्म प्रमाणपत्राचे स्थळप्रत

ग्रामपंचायतीमध्ये नाही त्याच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत नोंदवही रजिस्टर मध्ये नाही करीता ते देता आले नाही असे अपीलकर्ता यांस कळविलेले दिसते. पुन्हा 2.12.2006 रोजी अपीलकर्ता यांनी सहाय्यक माहिती अधिकारी पं. स. उमरेड यांना स्मरणपत्राच्या स्वरुपात पत्र दिलेले आहे. पुन्हा 20.12.2006 रोजी सहाय्यक माहिती अधिकारी यांनी मुख्याध्यापक यांना स्मरणपत्र दिलेले दिसून येते. दि. 13.9.2006 रोजी अपीलकर्ता यांनी प्रमाणपत्र रिसिव्ह केलेले दिसून येते त्यांची सही आहे.

3. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की ज्या प्रमाणपत्राची छायांकित प्रत त्यांना दि. 13.9.2006 रोजी मिळालेली आहे ती नकली असून जन्माचे प्रमाणपत्र हे मुळ प्रमाणपत्र नाही व त्याकरीता दि. 21.7.2006 रोजी मुळ प्रमाणपत्रां बद्यल माहिती अधिकारी यांना विचारले असता विद्यार्थ्यांच्या मुळ प्रमाणपत्राचे अभिलेख हे शाळेत आहे त्यामुळे ते प्रत्यक्ष घेवून येवून अवलोकन करण्या करीता आज दि. 31.7.2007 ही तारीख देण्यात आली होती. माहिती अधिकारी यांनी विद्यार्थ्यांचे जन्म तारखेचे मुळ प्रमाणपत्रे आणली होती. त्यामध्ये अपीलकर्ता यास ज्या प्रमाणपत्राची छायांकित प्रत दिलेली आहे तेच प्रमाणपत्र आहे परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की ग्रामपंचायत सचिव यांचे हस्ताक्षरातील व सरपंच ठाकरे यांच्या सहीचे प्रमाणपत्र होते त्याची छायांकित प्रत त्यांना पाहिजे. त्याकरीता आज ग्रामपंचाचतचे जे सचिव श्री आर. बी. बावणे हे माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे करीता साक्ष देण्यास हजर झालेले आहेत त्यांना सदरच्या प्रमाणपत्राच्या बद्यल विचारले असता त्यांनी असे सांगितले व लिहुन दिले की ग्रामपंचायत मध्ये जन्माची नोंद नसल्यामुळे प्रमाणपत्र त्यांना देण्याचा प्रश्नच नाही व लिहुन देण्याचाही प्रश्न नाही कारण नोंद असल्यास त्यांनाच प्रमाणपत्र देण्याचा अधिकार आहे व त्यांनी असे कोणतेही प्रमाणपत्र लिहिलेले नाही असे त्यांचे म्हणणे आहे. या संपूर्ण प्रकरणामध्ये प्रत्यक्ष मुळ प्रमाणपत्रे तपासल्यामुळे व सचिव ग्रामपंचायत बावणे

यांची साक्ष घेतल्यामुळे असे दिसून येते की जे प्रमाणपत्र शाळेच्या अभिलेखात आहे त्याच प्रमाणपत्राची प्रत ही अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेली आहे. अपीलकर्त्याच्या म्हणण्याप्रमाणे ते नकली आहे हेच ग्राहय धरण्यास कोणताही पुरावा नसल्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती मिळाली असे समजुन त्यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**नि र्ण य**

1) अपीलकर्ता यांना त्यांनी माहितीच्या अर्जात मागितलेली माहिती ही मिळालेली असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

2) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 31.7.2007

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 240/2007.**

श्री रविंद्रकुमार सिध्दनप्रसाद वर्मा
रा. प्लॉट नं. 13, गिरडकर ले आउट,
ग्रा.पं. वायगाव ता. उमरेड जि. नागपूर ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपिलीय अधिकारी तथा
खंड विकास अधिकारी,
पंचायत समिती उमरेड ता. उमरेड जि. नागपूर.

2) जन माहिती अधिकारी
मुख्याध्यापिका, उ.प.हिंदी पाठशाला, कोयला खदान,
पंचायत समिती उमरेड ता. उमरेड जि. नागपूर ...... **उत्तरवादी**

## वि वे च न

अपीलकर्ती यांनी दिनांक 22/1/2007 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीला मध्ये त्यांना माहिती मिळालेली नाही असे त्यांचे म्हणणे आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. सुनावणीस अपीलकर्ती व उत्तरवादी हजर आहेत.

2. दि. 13.10.2006 रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका यांना शिक्षण शिक्षण विभाग द्वारा खर्च किया गया 2006–2007 का समर्पण विवरण व कॉम्पुटर खरेदीका मंजुरीका प्रस्ताव 2006–2007 तसेच शिक्षण विभाग द्वारा खर्च किया

गया रक्कम की मंजुरी प्रस्ताव प्रत व कॉम्पुटर खरेदी कोटेशन व मंजुर प्रस्ताव प्रत मिलनेबाबत माहिती मागितलेली आहे. सदरची माहिती ही त्यांना दि. 8.11.2006 रोजी दिलेली आहे असे दाखल केलेल्या पत्रावरुन दिसते परंतु अपीलकर्ता यांना माहिती मिळाली नाही म्हणून 1.12.2006 रोजी प्रथम अपील खंड विकास अधिकारी यांचेकडे दाखल करुन प्रथम अपीलात विस्तृत आणखी माहिती मागितली आहे. माहिती अधिकारी यांनी दि. 8.11.2006 ला कागदपत्रे दिली आहे त्यामुळे प्रथम अपील अधिकरी यांनी प्रथम अपीलाची चौकशी केली नाही असे सांगितले. परंतु कोणत्याही प्रकारची त्यांना माहिती मिळाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील सादर केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळेस अपीलकर्ता यांनी पुन्हा सांगितले की त्यांना कोणत्याही प्रकारचे कागदपत्र मिळाले नाही. मात्र माहिती अधिकारी यांनी दिनांक 8.11.2006 चे पत्र दाखविले आहे. त्याकरीता त्यांनी माहिती मिळाल्याचे लिहुन कां घेतले नाही हे विचारले असता त्यांनी सांगितले की ते शाळेत येतात व उपसरपंच असल्यामुळे जबरदस्तीने माहिती मागतात. व त्यामुळे त्यांचेकडुन लिहुन घेतले नाही. माहिती अधिकारी यांनी माहिती दिली ते पत्र उपलब्ध आहे. अपीलकर्ता माहिती मिळाली नाही असे म्हणतात त्यामुळे दोघांवर अविश्वास दाखवने हे योग्य नाही त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती मिळणे महत्वाचे वाटत असल्यास त्यांना आता माहिती उपलब्ध करुन देता येईल. माहिती पुरविल्याचे पत्र उपलब्ध असल्यामुळे माहिती अधिकारी यांना दोषी ठरविणे अन्यायकारक होईल परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांना माहिती हवी आहे परंतु माहिती मिळाली नसल्यामुळे कारवाई करुन मिळावी असे त्यांचे म्हणणे आहे. परंतु अपीलकर्ता यांना माहिती आता उपलब्ध करुन देणे शक्य आहे काय असे प्रथम अपीलीय अधिकारी यांना विचारले असता त्यांना माहिती पुन्हा देण्यास तयार आहे असे सांगितले.

## नि र्ण य

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून त्यांना पुन्हा त्यांनी मागितलेली संपूर्ण माहिती ही माहिती अधिकारी यांनी विनामुल्य द्यावी. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनीसुध्दा त्याबाबतीत माहिती उपलब्ध करुन देण्याचे पहावे व माहिती दिल्यावर तसा अहवाल आयोगास सादर करावा.
2) अपीलकर्ता यांना माहिती निर्णय मिळाल्यापासून 8 दिवसांचे आंत उपलब्ध करुन न दिल्यास माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहतील. व त्याकरीता अपीलकर्ता याने आयोगाकडे अधिनियमाच्या कलम 18 प्रमाणे तक्रार करावी.
3) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.
4) सदरच्या निर्णयाचे संपूर्ण विवेचन व निर्णय झाल्याच्या नंतर अपीलकर्ता यांनी निर्णयाच्या बद्यल असमाधान व्यक्त करुन आयुक्तांच्या विरुध्द कोणत्याही प्रकारची कारवाई करण्यास बाध्य करु नये असे धमकीवजा विनंती पत्रकार म्हणून दिलेली आहे. अशा पध्दतीने जर अपीलकर्ता हे आयोगास धमकीवजा विनंती देत असतील तर आयोगाचे कामकाज करणे व निर्णय देणे हे यापुढे अशक्य होणार आहे.

नागपूर
दिनांक 31.7.2007

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.